महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुखपत्र


# जनमानसाची शिदोरी

मासिक

वर्ष - सहावे | अंक - ०८ | फेब्रुवारी २०२६ | मूल्य रु. १०/-



# मनरेगा बचाओ संग्राम


महाराष्ट्राचे आराध्य दैवत
छत्रपती शिवाजी महाराज
यांना जयंतीनिमित्त
१९ फेब्रुवारी
मानाचा मुजरा
२
आ. राजेश राठोड
प्रतोद, विधानपरिषद
काँग्रेस पक्ष
मा. आ. प्राचार्य
धोंडीरामजी राठोड

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुखपत्र

जनमानसाची

# शिदोरी

मासिक

वर्ष : २६ वे, अंक : ८, फेब्रुवारी २०२६

# अनुक्रमणिका


- 'मनरेगा' बचाव ........ हर्षवर्धन सपकाळ ........ ५
- मनरेगाच्या हक्कात आणि संघर्षाची वाट ........ विजय वडेट्टीवार ........ ६
- 'मनरेगा'ची पुन्हा स्थापना होईपर्यंत लढा सुरूच राहणार! ........ मा. मल्लिकार्जुन खर्गे ........ ८
- 'मनरेगा' पुन्हा सुरू होण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करू या! ........ मा. राहुल गांधी ........ ११
- विकसित भारताच्या नावाखाली 'मनरेगा'चे नाव बदलणे ही लाजिरवाणी गोष्ट! ........ मा. प्रियंका गांधी ........ १३
- ही तर महात्मा गांधींची दुसऱ्यांदा हत्या ........ पी. चिदंबरम ........ १५
- 'व्हीबी – जी राम जी' मधील मुद्दा टाळण्याच्या प्रयत्नांविषयी टिप्पणी ........ श्री. योगेंद्र यादव ........ १७
- 'मनरेगा बचाओ संग्राम' ग्रामीण भारताच्या हक्काचे रक्षण आणि भविष्य सुनिश्चित करणारा लढा ........ अनंत मोहोड ........ १९
- 'मनरेगा' ऐवजी आता मनमानीचा राज ........ अश्विनी कुलकर्णी ........ २०
- मनरेगा बचाव संग्राम : ठळक मुद्दे ........ दत्तात्रय खांडगे ........ २२
- मनरेगा आणि व्हीबीजी राम जी (VBGRAMG) : रोजगार हमी आणि कायदेशीर योजनांचे घटनात्मक व कायदेशीर विश्लेषण ........ धनंजय रामकृष्ण शिंदे ........ २४
- अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राने धडाडीचे, कार्यक्षम व लोकाभिमुख नेतृत्व गमावले : हर्षवर्धन सपकाळ ........ २६
- अजित पवार नावाचे वादळ ........ उल्हासदादा पवार ........ २७
- दुर्दैवी पायंडा ........ पृथ्वीराज चव्हाण ........ २९
- विखंडित हिंदुत्वाचा खरा चेहरा ........ ॲड. गिरीराज [illegible] ........ ३१
- [illegible] राजनीती व नेतृत्वाच्या [illegible] ........ मा. पी. चिदंबरम ........ ३३
- मोदी सरकारच्या अर्थसंकल्पात फक्त मोठे आकडे आणि पोकळ आश्वासने जनतेच्या हाती तुरी : हर्षवर्धन सपकाळ ........ ३५
- अर्थसंकल्पाचे [illegible] ........ संजीव चांदोरकर ........ ३६
- महिलांचा विकास [illegible] अभियानात [illegible] : हरी शंकर गुप्ता ........ ३७
- मोदी सरकार व कॉर्पोरेट भांडवलदारांचे षड्यंत्र! ........ विश्वास उटगी ........ ३८
- हा तर भ्रष्टाचाराचा [illegible] ! ........ अनंत गाडगीळ ........ ४२



- **हर्षवर्धन सपकाळ**
  अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
- मुख्य संपादक
  विजय वडेट्टीवार
- संपादक
  उल्हास पवार
- मुख्य सल्लागार
  डॉ. रत्नाकर महाजन
- प्रकाशक संपादक
  अनंत मोहोड
- व्यवस्थापकीय समिती प्रमुख
  विश्वजित कदम
- व्यवस्थापकीय सदस्य
  आ. श्री. अभिजित वंजारी
  आ. श्री. राजेश राठोड
- कार्यकारी संपादक
  दत्तात्रय उर्फ सुनील रा. खांडगे

  संपादकीय सदस्य
  राजेंद्र शेलार
  न. मा. जोशी
  निरंजन टकले
  राज कुलकर्णी
  राज वाल्मीकी
  हनुमंत पवार
- मुद्रक, मालकी
  **प्रभिला प्रिंट प्रा. लि., भायखळा, मुंबई - २७.**
- **मुखपृष्ठ सजावट**
  [illegible]
- **मुख्य कार्यालय**
  टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर (प.) मुंबई - २५
  पक्षांतर्गत कार्यक्रम, प्रतिक्रिया, लेख
  shidoricongress@gmail.com सादर पाठवावेत

मूल्य रु. ४०/-
वार्षिक वर्गणी मूल्य : ५००/-

हे मासिक मालक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांच्यासाठी मुद्रक, प्रकाशक, दत्तात्रय रामचंद्र खांडगे यांनी प्रभिला प्रिंट प्रा.लि., १३, [illegible] बिल्डिंग, [illegible], एन.एम. जोशी मार्ग, भायखळा (प.), मुंबई - ४०० ०२७ येथे छापून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर (प.), मुंबई - ४०० ०२५ येथून प्रसिद्ध केले. MAHMAR/2010/33438

# 'मनरेगा' बचाव

ग्रामीण भारताच्या आर्थिक संरचनेला सुरक्षा कवच देणारा 'मनरेगा' कायदा बदलून त्याऐवजी 'जी राम जी' सारख्या नवीन कायद्याची अंमलबजावणी करणे, हे निव्वळ धोरणात्मक बदल नसून ती एक गंभीर सामाजिक चूक आहे. केवळ योजनांच्या गुणगानातून जमिनीवरच्या मजुरांचे कष्ट आणि त्यांचे कायदेशीर अधिकार धुळीला मिळवणे, हे कोणत्याही लोकशाही राज्याला भूषणावह नाही.

खरं तर, मनरेगा आणि 'जी राम जी' योजनेतील सर्वात मोठा आणि मूलभूत फरक हा 'हक्क' आणि 'योजना' या शब्दांमध्ये दडलेला आहे. मनरेगा हा संसदेने संमत केलेला कायदा आहे, जो मजुराला 'काम मागण्याचा अधिकार' देतो. काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची त्यातील तरतूद सरकारला मजुरांप्रती उत्तरदायी ठरवते. मात्र, 'जी राम जी' योजना ही केवळ प्रशासकीय आदेशावर आधारलेली आहे. यात मजुराला कामाची मागणी करण्याचा अधिकार नाही, तर सरकार जेव्हा काम काढणार, तेव्हाच त्याला रोजगाराची संधी मिळणार. हा बदल म्हणजे मजुराला त्याच्या हक्काच्या अधिकारापासून वंचित करून सरकारी मेहेरबानीवर जगणाऱ्या 'लाभार्थी'च्या रांगेत नेऊन उभा करणारा आहे.

मनरेगाचे मूळ तत्त्व 'अकुशल कामगारांना मजुरी' देणे हे होते. ज्यांच्याकडे केवळ शारीरिक कष्ट करण्याची ताकद आहे, अशा गावातल्या माणसाला रोजगार देणारी ती योजना होती. मात्र, 'जी राम जी' योजनेत कामाचे स्वरूप बदलून ते उत्पादकता आणि तंत्रज्ञानाशी जोडले गेले आहे. रस्ते बांधणी असो वा जलसंधारण, यंत्रांचा आणि अर्ध-कुशल कामगारांचा वापर वाढल्यामुळे, ज्या हातांकडे केवळ माती - धोंडे उचलण्याचे कौशल्य आहे, ते हात आता रिकामे पडले आहेत. गावातील कामांचे कंत्राटीकरण झाल्यामुळे स्थानिक मजुरांच्या जागी कंत्राटदारांची यंत्रे व मजूर मजुरांचा रोजगार हिरावून घेऊ लागली आहेत.


हर्षवर्धन सपकाळ,
अध्यक्ष,
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.

दुसरा कळीचा मुद्दा म्हणजे आर्थिक विकेंद्रीकरण. मनरेगामध्ये ग्रामसभेला कामांचे नियोजन करण्याचे आणि त्यांचा प्राधान्यक्रम ठरवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. निधी थेट ग्रामपंचायतीच्या माध्यमातून खर्च होत असल्याने स्थानिक गरजांना महत्त्व दिले जाई. 'जी राम जी' योजनेत निधीचे नियंत्रण आणि नियोजनाची सूत्रे जिल्हा किंवा राज्यस्तरावरील नोकरशाहीच्या हातात एकवटली आहेत. यामुळे गावातील मजुरांना आपल्या कामासाठी आता ग्रामपंचायती ऐवजी सरकारी कार्यालयांच्या पायऱ्या झिजवाव्या लागणार आहेत. पारदर्शकतेचा दावा कितीही केला जात असला तरी, सामाजिक परीक्षणाची जी व्यापकता मनरेगामध्ये होती, तिला या नवीन प्रक्रियेत हरताळ फासला गेला आहे.

जेव्हा हक्काच्या १०० दिवसांच्या कामाची हमी संपते, तेव्हा त्याचा थेट परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या क्रयशक्तीवर होतो. मनरेगामुळे गावातील मजुरीचे दर स्थिर राहण्यास मदत होत होती, ते दर आता कोसळू लागले आहेत. 'जी राम जी' योजनेतील मजुरी ही कामगिरी आणि आऊटपुटवर आधारित असल्याने, प्रत्यक्ष मजुराच्या हातात पडणारी रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदींच्या तुलनेत तोकडी ठरत आहे. याचाच परिणाम म्हणून, गेल्या काही महिन्यांत ग्रामीण भागातून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण कमालीचे वाढले आहे.


आधुनिकीकरण आणि विकासाच्या गतीला कोणताही विरोध असण्याचे कारण नाही. मात्र हे करत असताना ज्यांच्यासाठी विकास करायचा आहे, त्या घटकालाच प्रक्रियेतून बाद करणे हा आत्मघातकी प्रकार आहे. आधार आणि डिजिटल अटेंडन्स लागू करून सरकारने मनमानी पद्धतीने लाखो मजुरांना यादीतून बाहेर काढले आहे. 'जी राम जी' योजनेतील तांत्रिक सुधारणांचा समावेश मनरेगाच्या कायदेशीर चौकटीत करणे शक्य असताना, मूळ योजनेलाच खिळखिळे करणे म्हणजे मजुरांच्या हिताला तिलांजली देण्यासारखे आहे. ग्रामीण भागातील वाढता असंतोष हा केवळ मजुरी न मिळाल्याचा नसून, आपल्या हक्काचा संकोच होत असल्याच्या जाणिवेचा आहे.

'जी राम जी' योजनेत मजुरांना १२५ दिवस काम देणार असल्याचे सरकार सांगत आहे. मात्र १०० दिवसांच्या कामाचे पूर्ण पैसे हे सरकार देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. हे लोक १०० दिवसांत केवळ ४४ दिवस काम देत आहेत. त्यामुळे आपल्याला आपल्या अधिकाराचे रक्षण करणे गरजेचे आहे. शेवटी हा मजुरांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे आणि आरोग्याचा प्रश्न आहे. म्हणूनच आपल्या हक्कांना वाचवण्यासाठी आपण लढा देणे गरजेचे आहे.

भाजपची सर्व धोरणे ही श्रीमंतांना अधिक श्रीमंत करणारी धोरणे आहेत. या लोकांना गरीबांची जाणीव नाही. त्यांना मनरेगाची, फूड सिक्युरिटीची आवश्यकता काय आहे, हे माहिती नाही. पूर्वीचे सरकार गरिबांचे सरकार होते. त्यांनी लोककल्याणकारी राज्य या संकल्पनेतून नेहमी गरीब, वंचित, मागास आणि अल्पसंख्याकांचा विचार केला. त्यांच्यासाठी धोरणे राबवली. आता मोदी सरकारच्या काळात हे घटक पूर्णपणे दुर्लक्षित झाले आहेत. त्यामुळे या दुर्लक्षित घटकांना न्याय देणे गरजेचे आहे. जसे आपण शेतकऱ्यांवर अन्याय करणारे तीन कृषी कायदे हटवण्यासाठी काम केले, तसे काम आता मनरेगासाठी आपल्याला करायचे आहे.

काँग्रेस पक्षाने 'मनरेगा बचाओ' संग्राम सुरू केला असून हा संग्राम म्हणजे जगातील सर्वात मोठ्या सामाजिक कल्याण कार्यक्रम अर्थात 'मनरेगा'वर मोदी सरकारने केलेल्या हल्ल्याचा विरोध करण्यासाठी उभारलेले एक देशव्यापी आंदोलन आहे. या संग्रामाअंतर्गत काँग्रेस पक्षाच्या चार मागण्या आहेत. हमी दिलेले काम, हमी दिलेली मजुरी मिळाली पाहिजे आणि हमी दिलेली जबाबदारी स्वीकारली पाहिजे. मनरेगा मधील बदल रद्द करून पूर्वीप्रमाणेच मनरेगा पुन्हा सुरू केली पाहिजे. ग्रामसभेच्या घटनात्मक अधिकारांची संपूर्ण पुनःस्थापना केली पाहिजे आणि राष्ट्रीय पातळीवर ४०० रुपयांचे किमान दैनंदिन वेतन निश्चित केले पाहिजे.

'मनरेगा बचाओ संग्राम' हा १० जानेवारीला सुरू होऊन २५ फेब्रुवारी २०२६ रोजी संपणार आहे. काँग्रेस पक्षाने हा लढा देशातील प्रत्येक गावात आणि देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे ठरवले आहे. ग्रामसभा ठराव, प्रभाग स्तरावरील धरणे, जिल्हा स्तरावरील पत्रकार परिषदा व धरणे, प्रतिकात्मक निदर्शने, राज्य स्तरावरील विधानसभा घेराव आणि विभागीय स्तरावरील 'एआयसीसी मनरेगा बचाओ रॅली'च्या माध्यमातून आपल्याला हा लढा अधिक तीव्र करायचा आहे. हा लढा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे असे मी आवाहन करतो.



केंद्र सरकारने नुकताच केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर केला. सर्व सामान्य घटकांना निराश करणारा दिशाहीन अर्थसंकल्प असे या अर्थसंकल्पाचे वर्णन करता येईल. रोजगार निर्मितीसाठी कोणतीही ठोस योजना नाही. कृषी, मध्यम, लघु उद्योग व शेतकरी यांच्यासाठी काहीच नाही. १० वर्षांत २५ कोटी लोक गरीबीतून बाहेर काढले असा दावा सरकार करीत आहे. मात्र प्रत्यक्षात ८० कोटी जनतेला ५ किलो धान्य द्यावे लागत आहे. असे असताना २५ कोटी लोकांची गरीबी कशी संपली? हा मोठा प्रश्न आहे. ही संपूर्ण आकडेवारी फसवणुकीची आहे. सोन्याचा दर दीड लाख रुपये तोळा आणि चांदीचा दर ४ लाख रुपये किलोपर्यंत पोहोचला असतानाही या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने काहीही उपाययोजना केलेली नाही. महागाई आटोक्यात आणण्यासाठी सरकारचे कोणतेही ठोस धोरण दिसत नाही. केंद्र सरकार कर्जाच्या ओझ्याखाली दबले असून कर्ज काढून योजना राबवाव्या लागत आहेत. मात्र लोकांच्या दैनंदिन जीवनमानात यामुळे काहीही बदल झालेला दिसून येत नाही.

भारतात उत्पन्न आणि संपत्तीची विषमता ऐतिहासिक पातळीवर पोहोचली असताना देशाच्या उत्पन्नातील ५८ टक्के हिस्सा वरच्या १० टक्के लोकांकडे जात असून निम्न स्तरातील लोकांच्या वाट्याला केवळ १५ टक्के उत्पन्नाचा हिस्सा जात आहे. देशाच्या एकूण संपत्तीपैकी सुमारे ४० टक्के संपत्ती फक्त वरच्या १ टक्के लोकांकडे एकवटली आहे. ही आकडेवारी देशाच्या आर्थिक संरचनेतील गंभीर असंतुलन दर्शवणारी आकडेवारी आहे. ही असमानता दूर करण्यासाठी अर्थसंकल्पात काहीही तरतूद नाही. या अर्थसंकल्पाने सर्वसामान्य जनतेच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे. परिस्थितीत बदल करायचा असेल तर तळागाळातील समाजाला विश्वासात घेऊन काम करण्याची आवश्यकता आहे. आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपासून काम करायचे आहे. या निवडणुकांमधील विजयच आपल्याला पुढे विधानसभा आणि लोकसभेच्या विजयापर्यंत घेऊन जाणार आहे.


जनमानसाची शिदोरी फेब्रुवारी २०२६

# जनहिताचा हुंकार आणि संघर्षाची वाट

देशाचे माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांनी त्यांच्या 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' या पुस्तकात चीनने सीमेवर केलेल्या कारवायांबाबत सविस्तर लिखाण केले आहे. यातील गंभीर बाब म्हणजे जनरल नरवणे यांनी संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांना याबाबत माहिती दिली ती माहिती राजनाथसिंह यांनी पंतप्रधानांना दिली पण या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नी देशाचे पंतप्रधान दोन तास गप्प बसले होते, कोणताही निर्णय घेतला नाही. शेवटी 'तुम्हाला जे योग्य वाटेल ते करा', असे सांगून जबाबदारी झटकली. मा. विरोधी पक्षनेते राहुल गांधी जनरल नरवणे



विजय वडेट्टीवार,
मुख्य संपादक, काँग्रेस विधिमंडळ पक्ष नेते.



यांच्या पुस्तकातील ही माहिती माध्यमातून देशासमोर आणू पहात होते, पण लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलूच दिले नाही, सातत्याने त्यांना रोखण्यात आले, त्यांचा माईक बंद करण्यात आला.

एकीकडे चीनबाबत मोदी सरकार नरमाईची भूमिका घेत आहे तर दुसरीकडे अमेरिकेसमोर मोदी सरकारने साष्टांग दंडवत घातला आहे. अमेरिकेबरोबर मोदी सरकारला शेती करार करण्यास भाग पाडले आहे. हा करार अमेरिकेने त्यांच्या हितासाठी केला, त्यांच्या अटी भारतावर लादल्या आहेत. शेती संदर्भातील हा करार भारतातील शेतकरी व कृषी क्षेत्र उद्ध्वस्त करणारा आहे. हा करार झाल्याची घोषणाही अमेरिकेनेच केली हे आणखी गंभीर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा डोनाल्ड ट्रम्पसमोर शरणागत झाले. अधिवेशनात सभागृहात चर्चा होऊ दिली नाही. मा. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रहिताचे मुद्दे उपस्थित करण्याचा प्रयत्न केला पण त्यांना बोलू दिले नाही. मोदी सरकार विरोधकांची गळचेपी करत असून ही लोकशाहीची हत्या आहे.

विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत उत्तर न देता राज्यसभेत भाषण केले. भारतीय

लोकसभेच्या इतिहासात असे पहिल्यांदाच घडले आहे की, पंतप्रधानांनी लोकसभेत निवेदन केले नाही.

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जो 'खेळ' सुरू आहे, तो पाहिल्यावर लोकशाहीच्या भवितव्याबद्दल चिंता वाटावी अशी स्थिती आहे. सत्तेच्या साठमारीत सामान्य माणूस केंद्रस्थानी असण्याऐवजी, धनदांडग्यांचे राजकारण महत्त्वाचे ठरत आहे. या परिस्थितीत काँग्रेसची बांधिलकी ही कोणत्याही सत्तेशी नसून, ती या मातीतील शेतकरी, कष्टकरी आणि युवकांच्या स्वप्नांशी आहे. राज्यात आज निवडणुकांच्या तोंडावर सरकारच्या चुकीच्या धोरणांचा फटका बळीराजाला अधिक बसत आहे. शेतीचे नुकसान होताना, आश्वासने दिली जातात, पण प्रत्यक्ष मदत मात्र मंत्रालयातील लाल फितीत अडकून पडते. केवळ 'इव्हेंट' करून आणि जाहिरातींवर कोट्यवधी रुपये उधळून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. शेतकऱ्यांना हवी आहे ती ठोस कर्जमुक्ती आणि हमीभावाची सुरक्षा.

कोणत्याही भ्रमातून राज्याच्या प्रत्येक घराचा उंबरठा ओलांडत आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून समाजात आज फूट पाडण्याचा प्रयत्न काही शक्तींकडून सुरू आहे, तो अत्यंत दुर्दैवी आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता इतरांना न्याय मिळायला हवा, ही आमची स्पष्ट भूमिका आहे. समाजात तेढ निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजणे, हे आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीला साजेसे नाही. आज जिकडे तिकडे सत्तेचा उन्माद दिसून येत आहे. लोक भावना व जन सामान्यांच्या भावनांना अधिक किंमत आली आहे.

'सत्तेचा उन्माद जेव्हा वाढतो, तेव्हा जनतेच्या वेदना ऐकू येत नाहीत. पण इतिहासाचा साक्षीदार आहे की, जेव्हा सामान्य माणूस जागा होतो, तेव्हा मोठमोठी सिंहासने डळमळीत होतात.'

आज मतपेटीच्या लढाईत तत्त्वांना तिलांजली दिली जात आहे. तो तो आपल्या खोटीचे राजकारण करीत आहे. पण आम्ही संघर्षाची वाट निवडली आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून आम्ही जनतेचा आवाज बुलंद करत आहोत. आमचा लढा केवळ सत्ता मिळवण्यासाठी नाही, तर राज्याची अस्मिता आणि लोकशाही मूल्ये टिकवण्यासाठी आहे.

सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या नावाखाली जे काही सुरू आहे, ते पाहता राज्यात अघोषित आणीबाणी असल्यासारखी परिस्थिती आहे. निवडणुका येतील आणि जातील, पण या संकटाच्या काळात कोण लोकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते, हे जनता निश्चितपणे लक्षात ठेवणार आहे. आमचा संघर्ष हा सत्ता आणि पद मिळवण्यासाठी नसून, सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी आहे आणि तो शेवटपर्यंत सुरूच राहील.

महाराष्ट्र कधीही दिल्लीसमोर झुकला नाही, तर त्याने देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. पण आज राज्याचे निर्णय दिल्लीतून घेतले जात आहेत. महाराष्ट्राचे उद्योग राज्याबाहेर जात आहेत. बेरोजगारी वाढत आहे आणि सरकार मात्र उत्सव साजरा करण्यात धन्यता मानत आहे. केंद्रीय अर्थसंकल्पाने सर्वसामान्यांची निराशा केली आहे. या अर्थसंकल्पाने सामान्यांच्या पदरात काहीही टाकलेले नाही. अमेरिकेने भारतावर लादलेले भरमसाठ शुल्क, चीनसोबतची वाढती व्यापारी तूट, सकल स्थिर भांडवल निर्मितीचा अपुरा घसरलेला स्तर आणि खासगी गुंतवणूक करण्यामागील अनास्था, सततची महसुली तूट, वाढती महागाई, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग बंद होणे, यावर अर्थसंकल्पात काहीही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. दुसरीकडे सर्वसामान्य लोकांच्या संबंधित असा ग्रामीण विकास, शहरी विकास, सामाजिक कल्याण, कृषी, शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छ जीवन मिशन या क्षेत्राच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत सरकारने कपात करून लोकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे.

मनरेगा योजना पुन्हा पूर्वी सारखी सुरू व्हावी ही आमची मागणी आहे. मोदी सरकारने 'भारत - गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन - ग्रामीण (व्हीबी - जी - राम - जी) बिल २०२५' मंजूर करून मनरेगा योजनेवर घाला घातला आहे. मनरेगा योजनेच्या नावातून महात्मा गांधी यांचे नाव काढण्यासह इतर अनेक बदल या नव्या योजनेत करण्यात आले आहेत. या नव्या बदलामुळे रोजगाराची गॅरंटी मिळण्याचा अधिकारच रद्द होणार आहे. मनरेगात ग्रामसभांना त्यांच्या मागणीप्रमाणे १०० दिवसांचा रोजगार मागण्याचा अधिकार दिला गेला होता. म्हणजे जेथे जेथे मागणी होईल तिथे तिथे १०० दिवसांचा रोजगार देणे बंधनकारक होते. तसेच केंद्राकडून दिला जाणारा निधी देखील याच मागणीनुसार दिला जात होता. मात्र नव्या विधेयकानुसार आधीच कुठे किती निधी द्यायचा हे ठरवण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे. तसेच ग्रामसभांचा रोजगार मागण्याचा अधिकार कमकुवत केला जात आहे. या संदर्भात राज्यात सध्या 'मनरेगा बचाओ संग्राम' काँग्रेस पक्षातर्फे हाती घेण्यात आला आहे. हा लढा आपल्याला गावागावात आणि शहरांपर्यंत न्यायचा आहे.

राज्यात सध्या जिल्हापरिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका सुरू आहेत. तर काही निवडणुका पुढे ढकलल्या आल्या आहेत. या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी व काँग्रेसच्या उमेदवारांना बहुमताने विजय मिळण्यासाठी आपण सर्वांनी काम करावे असे मी सर्वांना आवाहन करतो. जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करणे हे काँग्रेसचे रक्त आहे. जनतेच्या हुंकाराला साद देणे हे आपले कर्तव्य आहे.

[illegible]

## जवाहर भवन, नवी दिल्ली येथे 'राष्ट्रीय मनरेगा मजूर संमेलन'ला संबोधित करताना केलेले भाषण

# 'मनरेगा'ची पुन:स्थापना होईपर्यंत लढा सुरुच राहणार!

"मनरेगा समाप्त करणे हा केवळ कमकुवत घटकांवर केलेला हल्लाच नसून महात्मा गांधींना जनस्मृतीतून हटवण्याचे बीजेपी - आरएसएसचे कारस्थान आहे. एवढेच नव्हे तर गांधीजींच्या ग्राम स्वराज्याच्या विचारावर केलेला हा हल्ला आहे. महात्मा गांधीजी हे राष्ट्रपिता आहेत, त्यांच्या सीमांच्या पलिकडे ते देशाचा आदर आणि सन्मान आहेत. ही पहिलीच अशी वेळ आहे, जेव्हा एखाद्या राष्ट्रपित्याच्या नावाने असलेल्या योजनेतून त्यांचे नाव हटवण्याचे धाडस केले आहे. हे धाडस भाजपने केले आहे. ज्यांनी गांधीजींची हत्या केली, ते आज आरएसएसच्या शाखेत जाऊन त्यांचे नामोनिशाण मिटवण्याचे कारस्थान करत आहेत. देश आणि देशाची जनता कदापीही हे सहन करणार नाही. ही लढाई कुठे एका जागी थांब नसून, सत्याग्रह करून थांबणारी नाही किंवा घोषणा देऊन घरी जाण्याची लढाई नाही. जोपर्यंत ते नवीन कायदा मागे घेत नाहीत आणि मनरेगाची जशीच्या तशी पुन:स्थापना करीत नाहीत, तोपर्यंत आम्ही लढत राहणार आहोत."




खा. मल्लिकार्जुन खर्गे,
अध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

मंचावर उपस्थित आपल्या सर्वांचे लाडके विरोधी पक्षनेते श्री राहुल गांधी जी, देशभरातून येथे आलेले मनरेगा ॲक्टिव्हिस्ट्स व कार्यकर्ते, कामगार नेते, मीडियाचे माझे मित्र, सर्व राज्यांतून आलेले काँग्रेस पार्टीचे मनरेगा स्टेट कोऑर्डिनेटर्स आणि उपस्थित सहकारी तसेच मंचावर बसलेले आमचे नेतेगण, सर्वांचे मनापासून स्वागत. आपल्या नेत्यांनी त्यांच्या अनुभवाच्या आधारावर खूप काही सांगितले आहे. तसेच तुम्ही ते काम करत आहात, हे पाहून राहुल गांधीजी खूप आनंदी झाले आहेत. तुम्ही ज्या पद्धतीने खेड्यापाड्यांत मनरेगा कार्यक्रम समजावण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच आपले मनरेगाचे पदाधिकारी करत असलेले काम पाहून, मी सर्वांचाच धन्यवाद देतो. आज लोकांना एकत्र करणे हे एक मोठे काम असून आपली लढाई खूप लांबची आहे. ही लढाई कुठे एका जागी थांब नसून, सत्याग्रह करून थांबणारी नाही किंवा घोषणा देऊन घरी जाण्याची लढाई नाही. जोपर्यंत ते नवीन कायदा मागे घेत नाहीत आणि मनरेगाची जशीच्या तशी पुनर्स्थापना करीत नाहीत, तोपर्यंत आम्ही लढत राहणार आहोत. मनरेगा बचाव मोर्चामध्ये देशाच्या विविध भागांतून आलेल्या सर्व मित्रांचे मी या निमित्ताने पुन्हा एकदा स्वागत करतो.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मोदी सरकारने 'मनरेगा' समाप्त करून नवीन कायदा बनवला आहे. आम्ही महात्मा गांधीजींचे नाव घेऊन 'मनरेगा' बनवला होता, त्याच्या मागेच हे लोक लागले आहेत. ग्रामीण भारतातील गरिबांवर आणि कमकुवत घटकांवर त्यांनी नव्या कायद्याच्या माध्यमातून हल्ला केला असून त्याचा देशभर विरोध होत आहे. लवकरच होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आम्ही या मुद्द्यावर लढणार असल्याचे वचन तुम्हाला देतो. काँग्रेस पार्टी देशाच्या सर्व भागांत विशेषत: गाव पातळीवर या गंभीर मुद्द्याला आंदोलनाच्या स्वरूपात घेऊन जात आहे.

मनरेगा समाप्त करणे हा केवळ कमकुवत घटकांवर केलेला हल्लाच नसून महात्मा गांधींना जनस्मृतीतून हटवण्याचे बीजेपी - आरएसएसचे कारस्थान आहे. एवढेच नव्हे तर गांधीजींच्या ग्राम स्वराज्याच्या विचारावर केलेला हा हल्ला आहे. महात्मा गांधीजी हे राष्ट्रपिता

आहेत. ज्यांच्या सीमांच्या पलीकडे ते देशाचा आदर आणि सन्मान आहेत. ही पहिलीच अशी वेळ आहे, जेव्हा एखाद्या पक्ष राष्ट्रपित्याच्या नावाने असलेल्या योजनेतून त्यांचे नाव हटवण्याचे धाडस करत आहे. हे धाडस भाजपने केले आहे. ज्यांनी गांधीजींची हत्या केली, ते आज आरएसएसच्या शताब्दी वर्षात त्यांचे नामोनिशाण मिटवण्याचे कारस्थान करत आहेत. देश आणि देशाची जनता कदापीही हे सहन करणार नाही.

मित्रांनो, १९ जानेवारी २०२६ रोजी मोदी सरकारच्या वतीने एक प्रेस कॉन्फरन्स घेण्यात आली होती. त्यामध्ये महात्मा आणि राहुलजींवर त्यांनी भरपूर टीका - टिप्पणी केली होती. आपल्या गोष्टी जेव्हा आम्ही बोलतो, त्यावर टीका-टिप्पणी करण्याचे काम हे लोक करतात. 'मनरेगा'च्या माध्यमातून ज्याला कामाची गरज आहे, त्याला थांबवण्याचे काम हे लोक करीत आहेत. दबलेल्या - पिचलेल्या समाजाच्या लोकांना अजून दाबणे आणि त्यांना बेरोजगार बनविणे हा त्यांचा हेतू आहे. आपल्याला आठवत असेल, वेठबिगारी बंद करण्यासाठी इंदिरा गांधींनी २० कलमी कार्यक्रम आणला होता. पण आज पुन्हा मोदीजी ही वेठबिगारी सुरू करून तुम्हाला श्रीमंतांकडे सोपवण्याचे काम करीत आहेत. जेवढे देतील तेवढेच पैसे घेऊन त्यांच्याकडे काम करणे, ही गुलामीचे पहाट पुन्हा आणण्याचा प्रयत्न ते करत आहेत.

आपल्याला पत्रिकेप्रमाणे लढावे लागेल. लोकांना १२५ दिवस काम देणार असल्याचे ते सांगत आहेत. १२५ दिवस! अरे शंभर दिवसांचे काम आम्ही मागत होतो. या कामाचे पूर्ण पैसे तुम्ही देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. पूर्वी १०० टक्के मजुरी आणि ७५ टक्के मटेरियल मध्ये जे सेंट्रल गव्हर्नमेंटचे काम होत असे, त्याला बंद करण्याची तयारी यांनी केली आहे. तुमच्या हातातून पैसे आणि मजुरी घेऊन तुम्हाला गुलामीमध्ये ढकलण्याचे काम ते करणार आहेत. म्हणूनच, तुम्हाला स्वतःसाठी लढायचे आहे. तुमच्या बरोबरीने तुमच्या हक्कांसाठी आम्ही लढत आहोत.

सोनिया गांधी यांनी आर्टिकल ४१ अंतर्गत जे राईट टू वर्क, राईट टू फूड सिक्युरिटी, राईट टू एज्युकेशन, राईट टू इन्फर्मेशन, हे सर्व कायदे सर्वसामान्य जनतेसाठी आणले आहेत. पण आज जर आपण लढाईसाठी तयार झालो नाही, तर आपला हक्क आपण गमावून बसू. उद्या असा एक दिवस येईल, ज्यांच्याकडे पैसे आहेत, जे आयकर भरतात, ज्यांच्याकडे जमीन आहे, ज्यांच्याकडे डिग्री आणि मोठे - मोठे उद्योग आहेत, त्यांनाच मतदानाचा अधिकार असे झाले तर आश्चर्य वाटायला नको. या लोकांचे देशासाठी काहीही योगदान नाही. ते फक्त आपल्यामध्ये ऐक्याचे काम करतात. लोक आहे त्या स्थितीत राहतील असे त्यांना वाटते. म्हणूनच ते तुमचे अधिकार हिरावून घेण्याचे काम करत आहेत.

आपल्याला आपल्या अधिकाराचे रक्षण करावेच लागणार आहे. अनेक पक्ष या संदर्भात बोलण्याचे टाळतात. खरे तर हा कोट्यवधी लोकांचे पोट भरण्याचा प्रश्न आहे, त्यांच्या मुलांचा प्रश्न आहे, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे आणि जगण्याचा प्रश्न आहे. आपल्या हक्कांना वाचवण्याची आता वेळ आली आहे. मला आठवते की माझे वडील त्यावेळी टेक्सटाईल मीलमध्ये काम करायचे आणि आमचे कुटुंब बीटभट्टीवर कामाला जायचे. मी एकटाच मुलगा होतो. घरचे मिळून काम केले तर शिक्षण होईल असे त्यांना वाटायचे. आम्ही दलीत असल्यामुळे पोट भरण्यासाठी आम्हाला लोकांकडे जावे लागे.

मात्र आता मनरेगा योजना सन्मानपूर्वक रोजगार द्यायचे काम करत असताना नाव बदलून ती बंद करण्याचा घाट सरकारने घातला आहे. म्हणूनच आपल्या हक्कांना वाचवण्याची वेळ आता आली आहे. अजून एक महत्त्वाची बाब अशी की आधार आणि डिजिटल अटेंडन्स लागू करून मनमानी करून लाखो मजुरांना यादीतून बाहेर काढले गेले आहे. एकीकडे एसआयआरचे काम करून, मतांना हटवण्यासाठी, आम्हाला संपवण्यासाठी, आमची विचारधारा संपवण्यासाठी एका बाजूला प्रयत्न केले जातात आणि दुसरीकडे मनरेगाच्या लोकांना मजुरी मिळू नये, त्यांचे नाव लिहून हटवले जावे, यासाठी ते काम करीत आहेत. मोदी सरकारने गेल्या ११ वर्षांत सर्वात मोठी रोजगार योजना हळूहळू संपवण्याचे काम केले आहे.





श्रीमती सोनिया गांधी यांनी जेव्हा २००९ मध्ये मला लेबर मिनिस्टर बनवले, तेव्हा मी आयएलओ कॉन्फरन्सला जायचो. तेथे सर्व लोक आपापल्या देशाच्या लेबरबद्दल, लेबर वेलफेअरबद्दल बोलायचे, कधी एम्प्लॉयमेंटबद्दल सांगायचे, तर कधी मजुरांच्या मिनिमम वेजेस बद्दल बोलायचे. पुढे मी अमेरिका, जपान, घाना, अशा १८ देशांमध्ये गेलो होतो. तेथे मी आपल्याकडील 'राईट टू वर्क' आणि वर्षाला १०० दिवस काम देण्याच्या कायद्याबद्दल सांगायचो. हे ऐकून तेथील लोकांना खूप आश्चर्य वाटायचे. ब्राझील, साऊथ आफ्रिका, केपटाऊन, जपान, चीन, जर्मनी, इटली, सर्व ठिकाणी फूड सिक्युरिटी ॲक्ट, मनरेगा आणि कंपल्सरी एज्युकेशन ॲक्ट, असे मोठे काम देशासाठी केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात आले. ते म्हणायचे की इतक्या लोकांना तुम्ही कसे काम देता? इतक्या लोकांना कसे अन्न देता? इतक्या लोकांना कसे शिकवता? आम्ही युपीएच्या लोकांनी हे सर्व करून दाखवले. पण बीजेपी याला कापण्याचे, दाबण्याचे आणि संपवण्याचे काम करीत आहे. म्हणून आपण सर्व लोकांनी यासाठी लढा द्यायचा आहे.

जेव्हा जग एखाद्या गोष्टीचे कौतुक करते, तेव्हा मोदी ते मानत नाहीत. कारण मोदींच्या आजूबाजूला, समोरसुद्धा, सर्व श्रीमंत लोक आहेत. त्यांना गरीबी काय आहे, हे माहीत नाही. त्यांना मनरेगाची आवश्यकता काय आहे, फूड सिक्युरिटीची आवश्यकता काय आहे, मुलांना शिकवण्याची आवश्यकता काय आहे? हे माहिती नाही. युपीएचे सरकार गरीबांचे सरकार होते. सोनिया गांधी आणि मनमोहन सिंग यांचे सरकार होते. आता मोदी आणि शहांचे सरकार असून त्यांना काहीही माहीत नाही. फक्त भाषण करणे आणि इलेक्शन प्रचारामध्येच फिरत राहणे एवढेच त्यांना माहिती आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मोठे - मोठे प्रोजेक्ट आणले, धरणांचा बंदोबस्त केला, भाक्रा बांधले. तुम्ही काय केले? तुमची बुलेट ट्रेन अजून आली नाही. पूर्वी रेल्वे नव्हती काय? लोक जात येत नव्हते काय? अरे आम्ही बनवलेल्या रुळांवर तुम्ही वंदे भारत पळवत आहात. आम्ही संपूर्ण देशात रेल्वे पसरवली. आता मोदीजी रेल्वे स्टेशनची उद्घाटने करतात, रस्त्यांची उद्घाटन करतात. पण चार दिवस तुम्ही मजुरी आणि मनरेगाचे काम करून पहा, तुम्हांला माहीत पडेल.


लोकांची मते घेण्यासाठी, मी चहावाला आहे असे सांगता. कधी चहा बनवला तुम्ही? उन्हात फिरून, किती भाव वाढला आहे काय? हे सर्व यांचे नाटक आहे. गरीबांना दाबण्याचाच यांचा समय आहे. हे लोक १०० दिवसांत ४४ दिवस काम देत आहेत. मोदी मोठ्या - मोठ्या करतात आणि बोलतात १२५ दिवस आम्ही काम देऊ. भाजपाने आपण मनरेगासाठी लढत आहोत. जसे आपण तीन कृषी कायदे हटवण्यासाठी काम केले, तेच काम आता मनरेगासाठी आपल्याला करायचे आहे.

या लढाईत राहुलजी, सोनियाजी आणि आमचा सर्व पक्ष तुमच्यासोबत आहे. म्हणून घाबरू नका, आपण लढत राहू आणि लढून - लढून जिंकू. इन्कलाब झिंदाबाद. जय काँग्रेस, जय हिंद!

### जवाहर भवन, नवी दिल्ली येथे 'राष्ट्रीय मनरेगा मजूर संमेलन'ला संबोधित करताना केलेले भाषण

# 'मनरेगा' पुन्हा सुरु होण्यासाठी एकजूटीने प्रयत्न करु या!

भारताचे आधुनिक मजूर त्यांना बदलायचे आहे. त्यांना शोषणाच्या एकत्र मार्ग आहे, तो म्हणजे ज्या प्रकारे मजुरांना शेतकऱ्यांनी रस्ता दाखवला आहे, त्या प्रकारे आपण सर्वजण एकत्र उभे राहिलो पाहिजे. हे लोक घाबरट असून मी त्यांना खूप चांगल्या प्रकारे ओळखतो. मी दुसरी एक गोष्ट सांगून देतो, ती म्हणजे लोकांमध्ये कशाची



खा. राहुल गांधी,
विरोधी पक्ष नेते, लोकसभा



कमतरता असेल तर ती एकजुटीची कमतरता आहे. गरीब लोक एकत्र उभे राहत नाहीत, पण त्यांना एकत्र यावे लागेल. मनरेगामध्ये जे आंदोलन आहे ही एक खूप मोठी संधी आहे. हिंदुस्थानातील जे सर्वच्या सर्व गरीब लोक 'आयडिया ऑफ इंडिया'च्या संकल्पनेवर विश्वास ठेवतात, संविधानावर विश्वास ठेवतात, लोकशाहीवर विश्वास ठेवतात त्यांनी हे ध्यानात घेतले पाहिजे की आपण जर एकत्र उभे राहिलो, तर मोदीजी मागे हटतील आणि 'मनरेगा' पुन्हा सुरू होईल.''

या ठिकाणी उपस्थित मा. खर्गेजी, मनरेगाचे कार्यकर्ते, मनरेगामध्ये सहभागी लोक, मीडियामधील आमचे मित्र, आपल्या सर्वांचे खूप खूप स्वागत आणि नमस्कार. खरे तर, मनरेगाची संकल्पना ही गरिबांना अधिकार देण्याची संकल्पना होती. हिंदुस्थानात ज्याला कोणाला कामाची गरज असेल, त्याने मागणी केल्यावर त्याला सन्मानाने काम मिळावे, हा त्यामागील विचार होता. ही योजना सरकारच्या तिजोरी बाहेर असलेल्या पंचायती राज व्यवस्थेच्या माध्यमातून चालवली जावी हा हेतू होता. यात लोकांचा तसेच मजुरांचा आवाज होता, त्यांचा सन्मान होता. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या योजनेने प्रत्येक गरीब व्यक्तीला रोजगाराचा अधिकार दिला.

नरेंद्र मोदीजी आणि भाजप आता ही संकल्पना संपवू इच्छितात. काही वर्षांपूर्वी त्यांनी शेतकऱ्यांवर आक्रमण करून काळे कायदे आणले होते. पण शेतकऱ्यांनी त्यांना रोखले. शेतकऱ्यांनी रस्त्यावर आणि आम्ही पार्लमेंटमध्ये नरेंद्र मोदींवर दबाव आणून ते कायदे रद्द करून घेतले. ती चूक त्यांनी शेतकऱ्यांसोबत केली होती, आता तीच मजुरांसोबत करण्याचा ते प्रयत्न करत आहेत.



या योजनेचा पैसा कोठे जाईल, हा पैसा कोणत्या राज्याला मिळेल, कोणत्या जिल्ह्याला मिळेल? हे आता दिल्लीचे सरकार ठरवेल. भाजपची सत्ता असलेल्या राज्यांना जास्त पैसा जाईल, विरोधी पक्षांच्या राज्यांना कमी जाईल. दिल्लीचे सरकार ठरवेल की कोणाला कशा प्रकारची मजुरी हवी आहे? आणि ते त्याची अंमलबजावणी केंद्रीकृत पद्धतीने करणार आहेत. मजुरांचा अधिकार संपवण्यात आला असून जो आधी मजुरांना मिळत होते, ते आता कंत्राटदारांना आणि नोकरशाहीला मिळेल.

भाजपच्या सर्वच्या सर्व योजनांचे लक्ष्य याच धर्तीवर असते. हिंदुस्थानचा पैसा, हिंदुस्थानची मालमत्ता काही निवडक लोकांच्या हातात असावी, सर्व काही त्यांनी ठरवावे, त्यांनी देश चालवावा, संपूर्ण पैसाच त्यांच्या हातात जावा अशी भाजपची विचारधारा आहे. गरीब लोक प्रामुख्याने आपले दलित, आदिवासी, ओबीसी हे लोक बीमोगाक, अदानी - अंबानीसारख्या लोकांवर पूर्णपणे अवलंबून राहावेत. त्यांनी त्यांचे ऐकावे आणि जर ऐकले नाही तर भुकेने मरावे, हे त्यांचे 'हिंदुस्थानचे मॉडेल' आहे.



शेतकरी विरोधी कायदे हे संविधानावर केलेले आक्रमण होते. नोटबंदी, चुकीचा जीएसटी आणि आता 'जी - राम जी' बिल यातून संविधान संपवण्याचे कारस्थान रचले जात आहे. 'एक व्यक्ती - एक मत'ची संकल्पना संपवा, लोकशाही संपवा आणि स्वातंत्र्यापूर्वी ज्याप्रमाणे राजा - महाराजा, एकच व्यक्ती सर्व निर्णय घेत असे, सर्व मालमत्ता त्यांच्या हातात असायची असा हिंदुस्थान त्यांना पुन्हा एकदा आणायचा आहे.

भारताचे आधुनिक स्वरूप त्यांना बदलायचे आहे. त्यांना रोखण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे ज्या प्रकारे मजुरांना शेतकऱ्यांनी रस्ता दाखवला आहे, त्या प्रकारे आपण सर्वजण एकत्र उभे राहिले पाहिजे. हे लोक घाबरट असून मी त्यांना खूप चांगल्या प्रकारे ओळखतो. मी तुम्हाला एक गोष्टही सांगून देतो, ती म्हणजे लोकांमध्ये कशाची कमतरता असेल तर ती एकजुटीची कमतरता आहे. गरीब लोक एकत्र उभे राहत नाहीत, पण त्यांना एकत्र यावे लागेल. मनरेगाचे जे आंदोलन आहे ही एक खूप मोठी संधी आहे. हिंदुस्थानातील जे सर्वच्या सर्व गरीब लोक 'आयडिया ऑफ इंडिया'च्या संकल्पनेवर विश्वास ठेवतात, संविधानावर विश्वास ठेवतात, लोकशाहीवर विश्वास ठेवतात त्यांनी हे ध्यानात घेतले पाहिजे की आपण जर एकत्र उभे राहिलो, तर मोदीजी मागे हटतील आणि 'मनरेगा' पुन्हा सुरू होईल.

तुम्ही सर्वजण लांबून आलात, मी तुमचे मनापासून आभार मानतो. संदीपने जे सांगितले आहे, त्याप्रमाणे जिथे कुठे काँग्रेस पक्ष देशातील मजुरांसोबत उभा राहू शकतो, तिथे तुम्हाला काँग्रेस पक्ष मजुरांसोबत उभा असलेला दिसेल. धन्यवाद.

दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी लोकसभेत केलेले भाषण

# विकसीत भारताच्या नावाखाली 'मनरेगा'चे नाव बदलणे ही लाजिरवाणी गोष्ट!



खा. प्रियंका गांधी,
सरचिटणीस, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी.

देशातील ग्रामीण जनतेला शंभर दिवस हक्काचे रोजगाराची हमी देणाऱ्या 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी' अर्थात 'मनरेगा' योजनेचे नाव आणि स्वरूप बदलणारं 'व्हीबी – जी राम – जी' विधेयक लोकसभेत मंजूर झाले आहे. दरम्यान, 'मनरेगा'च्या नाव बदलावरून खा. प्रियंका गांधी, सरचिटणीस, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी यांनी लोकसभेत तीव्र आक्षेप घेतला. "या विधेयकामुळे नागरिकांना रोजगाराचा असलेला कायदेशीर अधिकार कमकुवत होत आहे. 'विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) २०२५' अर्थात 'व्हीबी – जी – आरएएम – जी' विधेयक हे सत्तेचे केंद्रीकरण करणारे विधेयक आहे. ग्रामीण 'मनरेगा'च्या माध्यमातून आजपर्यंत मिळणाऱ्या रोजगार हमीच्या अधिकाराला कमकुवत करणारे आहे. या योजनेतून महात्मा गांधी यांचे नाव का हटवले जात आहे? महात्मा गांधी हे या देशाचे, जगाचे आणि इतिहासातील सर्वांत महान नेते असताना सरकार असे का करत आहे, हे कळत नाही. अशा अनावश्यक बदलांमुळे मोठ्या प्रमाणावर खर्च होतो आणि स्थानिक शासन कमकुवत होते. विकसित भारताच्या नावाखाली 'मनरेगा' योजनेचे नाव बदलणे ही लाजिरवाणी गोष्ट असून कोणाची तरी वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, लहरीपणा आणि पूर्वग्रहाच्या आधारावर ते सादर केले जावे, ना मंजूर केले जावे," असी मागणी त्यांनी सभागृहात केली.

आदरणीय अध्यक्ष महोदय जी, मी नियम ७२ (१) अंतर्गत हे विधेयक मांडण्याबाबत आपला तीव्र आक्षेप नोंदवत आहे. मनरेगा अर्थात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायदा हा गेल्या २० वर्षांपासून ग्रामीण भारताला रोजगार देण्याबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे काम प्रभावीपणे करीत आहे. हा क्रांतिकारी कायदा बनवला गेला तेव्हा सभागृहातील सर्व राजकीय पक्षांनी याला पूर्ण संमती दिली होती. देशातील गरिबातील गरीब जनतेसाठी १०० दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देणारा हा कायदा आहे.

महोदय, आपल्या सर्व लोकप्रतिनिधींना



त्यांच्या क्षेत्रातील मनरेगाचा मजूर कोण आहे, हे लांबून देखील ओळखता येते. अर्थात गरीब असलेला, चेहऱ्यावर सुरकुत्या आलेला आणि त्यांच्याशी हात मिळवला तर हात दगडासारखा असणारा हा मजूर असतो. सातत्याने मजुरी आणि प्रचंड कष्ट करत असल्याने या मजुरांचे हात दगडासारखे कठीण झालेले असतात. रोजगाराची हमी देणाऱ्या 'मनरेगा' कायद्यातून आपल्या गरीब बंधू भगिनींना रोजगाराची कायदेशीर हमी मिळते. त्यांना हा अधिकार मागणीच्या आधारावर मिळतो. याचा अर्थ जिथे जिथे रोजगाराची मागणी आहे, तिथे या योजनेद्वारे १०० दिवसांचा रोजगार देणे अनिवार्य आहे. यासोबतच या योजनेसाठी केंद्राकडून जो निधी दिला जातो, तो देखील मागणीवर आधारित असतो. म्हणजेच, या योजनेसाठी किती पैसे कुठे पाठवायचे आहेत, हे जमिनी स्तरावरील परिस्थितीवर अवलंबून असून ते मागणीच्या आधारावर निर्धारित केले जाते.

महोदय, या विधेयकाच्या अनुसूची १ मधील उपनियम ४ (१) आणि ४ (२) द्वारे किती निधी कुठे पाठवायचा, हे आधीच निर्धारित करण्याचे अधिकार केंद्र सरकारला देण्यात आले आहेत. यामुळे संविधानातील ७३ व्या घटनादुरुस्तीकडे दुर्लक्ष केले जात आहे, हा माझा आक्षेप आहे. खरं तर जुन्या कायद्यामध्ये या योजनेसाठी निधीची मागणी जमिनीवरील परिस्थितीच्या आधारे ठरवण्याचा ग्रामसभांना पूर्ण अधिकार दिला जात असे. आज या विधेयकाद्वारे तो अधिकार कमकुवत करण्याचे काम केले जात आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या हातात शक्ती असली पाहिजे, ही आपल्या संविधानाची मूळ भावना आहे. तीच मूळ भावना पंचायती राज व्यवस्थेमध्ये असून येणारे विधेयक त्या मूळ भावनेच्या विरोधात आहे. या विधेयकात अशा तरतुदी आहेत, ज्यामुळे लोकांचा कायदेशीर रोजगाराचा अधिकार कमकुवत होत आहे. ही बाब आपल्या संविधानातील तरतुदींच्या विपरीत आहे. महोदय, याच सभागृहाने हा कायदा बनवला आहे आणि याच सभागृहाने हा अधिकार जनतेला दिला आहे, हे ध्यानात घेण्याची गरज आहे.


महात्मा गांधी 'मनरेगा' योजनेमध्ये ९० टक्के अनुदान हे केंद्राकडून येत असे. मात्र या नव्या विधेयकाद्वारे आता बहुतांश राज्यांमध्ये ते ६० टक्के येणार असून त्यात कपात करण्यात आली आहे. यामुळे ज्या राज्यांची अर्थव्यवस्था आधीच केंद्राकडून येणाऱ्या जीएसटीच्या थकबाकीच्या प्रतीक्षेवर अवलंबून आहे, त्यांच्या अर्थव्यवस्थेवर मोठा भार पडणार आहे. केंद्राचे नियंत्रण वाढवणारे आणि जबाबदारी कमी करणारे हे विधेयक आहे. या विधेयकातून १०० दिवसांचा रोजगाराचा अधिकार १२५ करण्याचा शब्द देण्यात आला आहे, परंतु, त्यामध्ये वेतन वाढ, तसेच मजुरीतील वाढीबाबत कुठेही नमूद नाही. वास्तव हे आहे की आतापर्यंतची जी थकबाकी आहे ती देखील अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाही.

प्रत्येक योजनेचे नाव बदलण्याचे सरकारला जे वेड आहे, ते का आहे? हे समजत नाही. जेव्हा जेव्हा हे केले जाते, तेव्हा केंद्र सरकारला अधिक पैसे खर्च करावे लागतात. माझे म्हणणे आहे की, चर्चेविना तसेच या सभागृहाचा सल्ला न घेता, अशा प्रकारे घाईघाईत विधेयक मंजूर केले जाऊ नये. हे विधेयक मागे घेतले पाहिजे आणि त्याऐवजी सरकारने नवीन विधेयक सादर केले पाहिजे. त्याबरोबर सखोल तपासणी आणि व्यापक चर्चेसाठी हे विधेयक किमान स्थायी समितीकडे तरी पाठवण्याची गरज आहे. कोणतेही विधेयक हे कोणाच्याही वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, लहरीपणा आणि पूर्वग्रहांच्या आधारावर ना सादर केले जावे, ना मंजूर केले जावे; अशी माझी मागणी आहे.

**ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या स्थानिक मागणीनुसार रोजगाराची हमी देणाऱ्या मनरेगा या योजनेचे नामांतर, स्वरूपांतर करून सरकारने रोजगाराचा 'हक्क' लोकांपासून हिरावून घेतला आहे...**

# ही तर महात्मा गांधींची दुसऱ्यांदा हत्या...

महात्मा गांधींची ३० जानेवारी १९४८ रोजी हत्या झाली. गांधीजींच्या मारेकऱ्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणी आणि प्रचारातून प्रेरणा मिळालेली नाही आणि म्हणून संघावर तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी घातलेली बंदी अन्याय आहे; असा संघाचा दावा होता. आपण सध्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या या म्हणण्यावर विश्वास ठेवू या आणि संघ आणि त्याच्या पुढच्या पिढीला, म्हणजेच भाजपला, प्रश्न विचारू या की तुम्ही महात्मा गांधींच्या नावे असलेल्या एकमेव सामाजिक – आर्थिक कार्यक्रमातून त्यांचे नाव का काढून टाकले?




महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS, थोड लघुरूप 'मनरेगा') या महात्मा गांधी यांच्या नावाने असलेल्या योजनेला त्यासंदर्भातील कायद्याचा आधार आहे. मात्र नुकत्याच झालेल्या संसदेच्या २०२५ च्या अधिवेशनात विधेयक क्रमांक ११७ मंजूर करून घेऊन केंद्र सरकारने तो कायदा आणि योजना रद्द केली. अलीकडेच मंजूर झालेल्या विधेयकातील कलम ३७(१) मध्ये स्पष्टच म्हटले आहे: 'कलम १० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, केंद्र सरकारने या संदर्भात अधिसूचित केलेल्या तारखेपासून... 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम – २००५', त्याअंतर्गत करण्यात आलेले सर्व नियम, अधिसूचना, योजना, आदेश व मार्गदर्शक तत्त्वांसह, रद्द करण्यात येईल.



पी. चिदम्बरम,
माजी केंद्रीय अर्थमंत्री.

हे विधेयक पुढे म्हणते: कलम ८ (१) अंतर्गत प्रत्येक राज्य सरकारवर त्या त्या आर्थिक वर्षात संबंधित राज्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देणारी योजना तयार करण्याची जबाबदारी राज्यांवरच आहे. ही योजना विधेयकाच्या अनुसूची – १ मध्ये नमूद केलेल्या किमान वैशिष्ट्यांशी सुसंगत असली पाहिजे.

आणि अनुसूची – १ मधील पहिले किमान वैशिष्ट्य असे आहे.

'या अधिनियमाच्या कलम ८ अंतर्गत सर्व राज्यांनी अधिसूचित केलेल्या योजनेला 'विकसित भारत – रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण): व्हीबी– जी राम जी योजना' असे म्हटले जाईल.'

हे नाव केवळ उच्चारायलाच अवघड आहे, असे नाही, तर हिंदीभाषक नसलेल्या नागरिकांना त्यातून कसलाच अर्थबोध होऊ शकत नाही. आणि असा नागरिकांचा तो अपमान आहे.

### गरिबांसाठी जीवनरेखा

ग्रामीण भागातील नागरिकांना वर्षातील १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देणारी 'मनरेगा' ही योजना देशातील १२ कोटी कुटुंबांसाठी जीवनरेखा होती. ही कुटुंबे

उपासमार, अशोपोटी अवस्थेत झोपणार नाहीत. याची हमी या योजनेमुळे मिळाली होती. ही योजना गरिबांसाठी, विशेषत: ज्यांना नियमित रोजगार मिळत नाही अशा महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी वरदान ठरली होती. या योजनेमुळे घराघरातील महिलांच्या हातात पैसा खेळू लागला आणि त्यांच्या आधीच्या पिढीतील महिलांनी कधीही अनुभवली नसेल इतकी स्वातंत्र्याची जाणीव त्यांना मिळाली. गरिबांसाठी आर्थिक सुरक्षेचे एक जाळे निर्माण झाले. हे नवे विधेयक हे सर्व लाभ त्यांच्यापासून निर्दयपणे हिरावून घेणारे आहेत.

### यूपीए सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात (२००४-०५) मी म्हटले होते:

'आमच्या विकास दृष्टीनुसार... अर्थसंकल्पातील संपूर्ण योजना खर्चावर सगळ्यात पहिला हक्क गरिबांचा असेल... राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियमानुसार काम सुरू झाले आहे. प्रत्येक गरीब कुटुंबातील एका सक्षम व्यक्तीस वर्षाला १०० दिवसांचा रोजगार हमखास मिळावा हा त्यामागचा उद्देश आहे...'

रोजगाराची हमी हा या कायद्याचा आत्मा होता आणि त्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती :

- ही योजना सार्वत्रिक होती, ग्रामीण भागातून येणाऱ्या मागणीवर आधारित होती आणि वर्षभर उपलब्ध होती.
- मजुरीची हमी केंद्र सरकारकडून दिली जात होती.
- या योजनेचा खर्च केंद्र सरकार करत होते; राज्यांचा वाटा केवळ साहित्य खर्चाच्या २५ टक्के इतकाच होता.
- काम नाकारले गेल्यास, संबंधित व्यक्तीस बेरोजगारी भत्ता मागण्याचा हक्क होता.
- ही योजना जसजशी विकसित होत गेली तसतसा तिला महिलांकडून उत्तम प्रतिसाद मिळत गेला.

### मनरेगाच्या आत्म्याला सुरुंग

हे विधेयक आणि ही नवी योजना वरील प्रत्येक गोष्ट उद्ध्वस्त करतात. नवी योजना राज्यनिहाय असेल आणि तिचा खर्च केंद्र आणि राज्य यांच्यात ६०:४० या प्रमाणात वाटला जाईल. केंद्र सरकार प्रत्येक राज्याला निधीचे 'मानक वाटप' करेल; या वाटपापेक्षा अधिकचा खर्च त्या त्या राज्याने उचलायचा आहे. आणि ही योजना कोणत्या भागात राबवायची ते केंद्र सरकार ठरवेल. अशा रीतीने ती पुरवठ्यावर आधारित योजना बनवली जाईल. राज्याने १२५ दिवसांच्या रोजगाराची 'हमी' द्यायची आहे, हे केवळ मृगजळ आहे. पावसाळी शेतीच्या हंगामातील एकूण ६० दिवसांत कोणतेही काम दिले जाणार नाही. बेरोजगारी भत्ता ठरलेल्या मजुरीच्या केवळ २५ टक्क्यांपर्यंत असू शकतो आणि त्यावरही राज्याच्या आर्थिक क्षमतेनुसार अशाच अटी घालण्यात येतील. सर्व बाबींमध्ये केंद्र सरकारचाच निर्णय अंतिम असेल.

या सगळ्यामुळे हे विधेयक संघराज्यविरोधी ठरते. प्रत्यक्षात, हे विधेयक आणि प्रस्तावित योजना रोजगाराच्या हमीची मूळ संकल्पनाच उलथवून टाकतात. विशेषत: भाजप-शासित राज्ये आर्थिक असमर्थतेचा हवाला देतील, कमी मानक वाटप आणि अंमलबजावणीसाठी लहान लहान भागातील आणि हळूहळू ही योजना मारून टाकतील.

### स्मृतीतून पुसण्याचा आटापिटा

प्रत्यक्षानुसार मिळाल्यावर, २८ फेब्रुवारी २०१५ रोजी नरेंद्र मोदी यांनी संसदेत म्हटले होते : 'माझी राजकीय समज मला सांगते की मनरेगा कधीही रद्द करू नये. ती तुमच्या (यूपीएच्या) अपयशाचे जिवंत स्मारक आहे.' गेली काही वर्षे मनरेगाकडे दुर्लक्ष झाले. १०० दिवसांचा रोजगार देण्याचे आश्वासन असूनही, प्रत्यक्षात सरासरी रोजगार प्रति कुटुंब सुमारे ५० दिवसांपर्यंतच मर्यादित राहिला आहे. २०२४-२५ मध्ये ८.६१ कोटी जॉब कार्डधारकांपैकी अवघ्या ४०.७५ लाख कुटुंबांनाच पूर्ण १०० दिवस काम मिळाले तर २०२५-२६ मध्ये फक्त ६.७४ लाख कुटुंबांना. राज्य सरकारची जबाबदारी असलेला बेरोजगारी भत्ता क्वचितच दिला जातो. निधीची तरतूद अपुरी आहे आणि २०२०-२१ मध्ये एक लाख ११ हजार १७० कोटी रुपये असलेली अर्थसंकल्पीय तरतूद २०२५-२६ मध्ये ८६ हजार कोटी रुपयांपर्यंत खाली आली आहे. काम करणाऱ्या कुटुंबांची एकूण संख्या २०२०-२१ मधील ७.५५ कोटींवरून २०२४-२५ मध्ये ४.७१ कोटींवर आली आहे. मजुरीची थकबाकी १४,३०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

विधेयकातील त्रुटींपलीकडे जाऊन देशाच्या स्मरणातून महात्मा गांधींना पुसून टाकण्याचा हा एक जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न आहे आणि तो निंदनीय आहे. भाजपच्या मते, स्वतंत्र भारताचा इतिहास २६ मे २०१४ रोजीपासूनच सुरू झाला. त्यामुळे भूतकाळ पुसून टाकण्याचा त्यांचा आटापिटा दिसतो. जवाहरलाल नेहरू यांच्यापासून जे सुरू झाले, ते आता महात्मा गांधींपर्यंत येऊन पोहोचले आहे. भाजपच्या या गंभीर चुका भारतातील जनता कधीही माफ करणार नाही.

लेखक भारताचे माजी अर्थमंत्री आहेत.
संकेतस्थळ : pchidambaram.in
ट्विटर : @Pchidambaram_IN

दै. लोकसत्तामधून साभार

# 'व्हीबी - जी राम जी'
# गांधींना पुसून टाकण्याच्या प्रयत्नापेक्षाही वाईट




मनरेगाच्या रोजगार हमीपासून मजुरांना दूर ठेवण्याचा प्रयत्न म्हणून, केंद्र सरकार काम मागण्याचा अधिकार देखील रद्द करण्याची योजना तयार करीत आहे. मनरेगा कायद्याच्या जागी सरकारकडून आणल्या जाणाऱ्या नवीन कायद्याचा मसुदा पाहून वाटते की, या नवीन योजनेतून महात्मा गांधींचे नाव पुसून टाकून सरकारने ठीकच केले आहे. जेव्हा या योजनेचा आत्माच उरला नाही, आणि जेव्हा तिच्या मूळ तरतुदीच संपवल्या जात आहेत, तेव्हा या योजनेचे नाव बदलून काय फायदा? म्हणूनच गांधीजींच्या विचारांवर प्रेम करणाऱ्यांना संसदेत या विधेयकाविरोधात लढावे लागेल. तसेच त्यांना मनरेगाच्या हमी बाबतची माहिती देशात सर्व वाड्यांपर्यंत पोहोचवावी लागेल आणि त्या करता, शेतकऱ्यांप्रमाणे रस्त्यावर उतरून लढावे लागेल.

मनरेगाचे नाव का बदलले जात आहे? याबाबत विरोधकांचा आक्षेप आहे. ज्या ऐतिहासिक योजनेला देश 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' या नावाने ओळखत आला आहे, तिच्या नावातून महात्मा गांधींना का हटवले जात आहे? मलाही सुरुवातीला थोडे दुःख झाले. सरकारने प्रस्तावित केलेले 'विकसित भारत - रोजगार आणि उपजीविका हमी मिशन (ग्रामीण) विधेयक' हे नवीन नाव खूपच विचित्र वाटले. आधी इंग्रजीतील संक्षिप्त नावाचा विचार करून मग हिंदी शब्द तयार करण्याच्या या पद्धतीत नवा मौलिक काम येतो. परंतु मनरेगा कायद्याच्या जागी सरकारकडून आणल्या जाणाऱ्या नवीन कायद्याचा मसुदा पाहून वाटते की, या नवीन योजनेतून महात्मा गांधींचे नाव पुसून टाकून सरकारने ठीकच केले आहे. तेव्हा या योजनेचा आत्माच उरला नाही आणि तेव्हा तिच्या मूळ तरतुदीच संपवल्या जात आहेत, तेव्हा नाव बदलून काय फायदा?



**श्री. योगेंद्र यादव,**
राजकीय विश्लेषक.

'मनरेगा' नावाचा हा कायदा ऐतिहासिक का होता? हे प्रथम समजून घेऊ या। स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुमारे साठ वर्षे उलटल्यानंतर भारत सरकारने प्रथमतः या कायद्याच्या

माध्यमातून आपल्या घटनात्मक कर्तव्याचे पालन करण्याच्या दिशेने एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले होते. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांतर्गत अनुच्छेद ३९(अ) आणि ४१ सरकारला प्रत्येक व्यक्तीसाठी उपजीविकेची साधने आणि रोजगाराचा अधिकार सुनिश्चित करण्याचे निर्देश देतात. २००५ मध्ये यूपीए सरकारने संसदेत 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' मंजूर केला आणि पहिल्यांदाच देशातील शेवटच्या माणसाला या संदर्भात एक हक्क प्रदान केला. हा कायदा संपूर्ण अर्थाने रोजगाराची हमी नव्हता, परंतु त्यातील तरतुदी इतर कोणत्याही सामान्य सरकारी रोजगार योजनेपेक्षा वेगळ्या होत्या.

सरकारकडे रोजगाराची मागणी करण्याची हमी हा कायदा ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला देतो. यामध्ये सरकारी अधिकाऱ्यांना 'जर - तर' किंवा टाळाटाळ करण्यासाठी फारसा वाव ठेवलेला नव्हता. या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणतीही तांत्रिक अशी पात्रता नव्हती. कोणताही ग्रामीण व्यक्ती आपले 'जॉब कार्ड' बनवून याचा लाभ घेऊ शकत होता. रोजगार मागण्यासाठी कोणतीही अट नव्हती. जेव्हा जेव्हा रोजगार मागितला जाईल, त्याच्या दोन आठवड्यांत सरकार एकतर त्या व्यक्तीला काम देईल किंवा नुकसान भरपाई देईल. या योजनेची अनोखी तरतूद ही आहे की यात अर्थसंकल्पीय तरतुदीची कोणतीही मर्यादा नव्हती. जेव्हा जेव्हा, जेवढे लोक हवे असतील, ते काम मागू शकत होते. आणि केंद्र सरकारला पैशांची व्यवस्था करावी लागायची. अशा प्रकारे अपूर्ण का असेना, पण पहिल्यांदाच रोजगाराच्या अधिकाराला कायदेशीर स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला होता. म्हणूनच जगभरात या योजनेची चर्चा झाली होती.

सुरुवातीला हा कायदा आपल्या मूळ स्वरूपानुसार फक्त काही जिल्ह्यांत लागू होऊ शकला होता. मनरेगाची मजुरी खूप कमी होती आणि सरकारी निधी खूप अपुरा होता. तरीही डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारने त्याचा विस्तार केला. यूपीएचे सरकार गेल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तर या कायद्याची खिल्ली उडवली होती. 'यूपीएच्या 'अपयशाच्या' धोरणांचे स्मारक म्हणून हा कायदा जिवंत ठेवला जाईल,'' असे मोदीजी म्हणाले होते. पहिल्या काही वर्षांत मोदी सरकारने या योजनेचा गळा घोटण्याचा प्रयत्न केला. परंतु कोविड आपत्तीच्या वेळी त्यांना या योजनेचा आधार घ्यावा लागला. एकूणच सरकारचा हलगर्जीपणा, नोकरशाहीची कार्यपद्धत आणि स्थानिक भ्रष्टाचाराच्या तक्रारी असूनही मनरेगा योजना ही ग्रामीण भारताच्या शेवटच्या माणसासाठी आधार ठरली. गेल्या १५ वर्षांत या योजनेमुळे सुमारे ४,००० कोटी मजुरीचे दिवस इतका रोजगार दिला गेला. ग्रामीण भागात या योजनेमुळे एकूण ९.५ कोटी कामे पूर्ण झाली. दरवर्षी सुमारे ५ कोटी कुटुंबे या योजनेचा फायदा घेत राहिली. या योजनेमुळे ग्रामीण भागातील मजुरी वाढली. कोविडसारखे राष्ट्रीय संकट किंवा दुष्काळासारख्या स्थानिक आपत्तीच्या वेळी मनरेगाने लाखो कुटुंबांना उपासमारीपासून वाचवले, तसेच करोडो लोकांना स्थलांतरापासून रोखले.

परंतु आता मोदी सरकारने या ऐतिहासिक योजनेला 'दफन' करण्याचा मनसुबा रचला आहे. साहजिकच, अशी कोणतीही योजना औपचारिकपणे बंद केल्यास राजकीय नुकसान होण्याची भीती असते. म्हणूनच या योजनेत 'सुधारणा' केली जात असल्याची घोषणा करण्यात आली आहे. दिशाभूल करण्यासाठी असेही सांगण्यात आले आहे की आता १०० दिवसांऐवजी १२५ दिवस रोजगाराची हमी दिली जाईल. पण जेव्हा ही योजना लागू होईल, जेव्हा त्याअंतर्गत रोजगार दिला जाईल, तेव्हा त्याची खरी पोलखोल सुरू होईल. खरे वास्तव हे आहे की, सरकारने संसदेत सादर केलेले 'विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी मिशन (ग्रामीण) विधेयक' हे एका अर्थाने रोजगार हमीच्या विचारालाच संपवून टाकण्याचे काम करीत आहे. आता ही योजना म्हणजे 'प्रत्येक हाताला काम देण्याच्या अधिकारा'ऐवजी निवडक लाभार्थ्यांना 'मजुरीचे काम देणारी' योजना बनून जाईल.

सरकारने सादर केलेल्या मसुद्यानुसार, आता या योजनेची प्रत्येक महत्त्वाची तरतूद बदलली जाईल. कोणत्या राज्यात आणि त्या राज्याच्या कोणत्या भागात रोजगाराच्या संधी दिल्या पाहिजेत हे आता केंद्र सरकार ठरवील. केंद्र सरकार त्या करता प्रत्येक राज्यासाठी अर्थसंकल्पीय मर्यादा निश्चित करेल. शेतीतील मजुरीच्या हंगामात कोणत्या दोन महिन्यांत ही योजना स्थगित करावी याचा निर्णय आता राज्य सरकार घेईल. तसेच स्थानिक पातळीवर काय काम होईल, याचा निर्णय दिल्लीहून बनून आलेल्या निर्देशानुसार होईल. सर्वांत धोकादायक गोष्ट ही आहे की, आता या योजनेतील कामांसाठी खर्च उचलण्याची जबाबदारी राज्य सरकारांवर देखील टाकण्यात आली आहे. पूर्वी केंद्र सरकार ९० टक्के खर्च उचलत असे, आता ते फक्त ६० टक्के देईल. त्यामुळे परिस्थिती अशी येईल की, ज्या गरीब असलेल्या भागात रोजगार हमीची सर्वांत जास्त गरज आहे, तिथल्या गरीब सरकारांकडे इतका निधी नसेल आणि केंद्र सरकार मात्र आपले हात झटकून घेईल. म्हणजेच 'नऊ मण तेल ही असेल आणि राधाही नाचणार नाही'. आणि हो, जर एखाद्या राज्यात निवडणूक जिंकण्याची मजबुरी असेल, तर तिथे अचानक रोजगार हमीचा निधी येईल. जिथे विरोधकांचे सरकार आहे, तिथे ही योजना व्यवस्थित लागू केली जाणार नाही किंवा तिच्यावर कडक अटी लादल्या जातील. म्हणूनच अशा योजनेतून महात्मा गांधींचे नाव हटवले हे प्रतीकात्मक झाले आहे. गांधीजींच्या विचारांवर प्रेम करणाऱ्यांना संसदेत या विधेयकाविरोधात लढावे लागेल. तसेच त्यांना भारताच्या हमी बाबतची माहिती देशात सर्व पातळीवर पोहोचवावी लागेल आणि त्या करता, शेतकरी-कामगारांना रस्त्यावर उतरून लढावे लागेल.


योगेन्द्र यादव

# 'मनरेगा बचाओ संग्राम'

## गरिबांच्या हक्कांचे संरक्षण आणि कल्याण सुनिश्चित करणारा लढा

काँग्रेस पक्षाने 'मनरेगा बचाओ' संग्राम सुरू केला असून हा संग्राम म्हणजे जगातील सर्वात मोठा सामाजिक कल्याण कार्यक्रम अर्थात 'मनरेगा' ला मोदी सरकारने केलेल्या हल्ल्याचा विरोध करण्यासाठी उभारलेले एक देशव्यापी आंदोलन आहे. 'मनरेगा' योजना रद्द करणे, तिचे नाव बदलणे आणि त्याऐवजी नवा कायदा 'व्हीबी जी राम जी' योजना आणणे हा देशातील प्रत्येक गरीब कामगारावर आणि या क्रांतिकारी योजनेमागील प्रेरणा असलेल्या महात्मा गांधींच्या आदर्शांवर केलेला थेट हल्ला आहे. महात्मा गांधींनी कामाची प्रतिष्ठा, स्थानिक स्वराज्य आणि गावाचे स्वावलंबन यांचे प्रतिबिंबित केले. या ऐतिहासिक योजनेतून महात्मा गांधींचे नाव हटवणे हा त्यांचा वारसा आणि भारतासाठी असलेली त्यांची दृष्टी पुसून टाकण्याचा एक नियोजित प्रयत्न आहे.

सन २००५ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने लागू केलेली 'मनरेगा' योजना ही गेल्या वीस वर्षांपासून ग्रामीण कुटुंबांसाठी जीवनवाहिनी ठरली आहे. २००६ पासून आतापर्यंत 'मनरेगा' अंतर्गत सुमारे १८० कोटींहून अधिक मनुष्यबळ दिवसांचे कामाचे दिवस निर्माण झाले आहेत. मोदी सरकारने कोविड - १९ महामारीच्या काळात नियोजनशून्य लॉकडाऊन लादून लाखो कामगारांना असहाय्य सोडून त्यांना स्थलांतर करण्यास भाग पाडले. त्या काळात ही योजना त्यांच्या जगण्यासाठी सर्वात मजबूत सुरक्षा कवच बनल्याचे आपण पाहिले आहे. या काळात मनरेगाने सुमारे ४.६ कोटी कुटुंबांना काम दिले होते.



**अनंत मोहोड**
प्रकाशक संपादक, जनमानसाची शिदोरी

अलिकडे मोदी सरकारने 'मनरेगा' कशाप्रकारे उद्ध्वस्त केली हे सर्वांनी पाहिले आहे.

**१) कामाचा घटनात्मक हक्क संपवणे:**

मनरेगा अंतर्गत, ग्रामीण कुटुंबाला दरवर्षी किमान १०० दिवसांच्या कामाची कायदेशीर हमी होती. ही योजना भारतातील प्रत्येक गावात उपलब्ध होती. पण आता सरकारच्या नवीन कायद्याने हे हक्क काढून घेतले आहेत. कामगारांना आता कामाची कोणतीही कायदेशीर हमी राहिलेली नाही. मोदी सरकार जेव्हा ठरवेल तेव्हाच कामगारांना काम मिळू शकेल आणि मोदी सरकारने निवडलेल्या भागांमधील लोकांना काम दिले जाईल.

**२) कामगारांच्या वेतनाच्या हक्कांवर हल्ला:**

'मनरेगा' मध्ये कामगार वर्षभर कामाची मागणी करू शकत होते. त्यांना किमान वेतनाची कायदेशीर हमी होती. पण आता नवीन कायद्यातील तरतुदींनुसार, त्यांना पुरेशा काळात काम मिळणार नाही. त्यांचे वेतन मोदी सरकारद्वारे मनमानीपणे निश्चित केले जाईल.

**३) पंचायत राज व्यवस्थेवर हल्ला :**

'मनरेगा' ने पंचायतींना विकास प्रकल्पांना, कामगारांना काम देण्याचा प्राधान्यक्रमानुसार सक्षम केले होते. त्यांना 'ग्राम सेवक' आणि रोजगार सहाय्यकांची देखील मदत मिळत होती. तथापि, आता 'व्हीबी जी राम जी' अंतर्गत, कामगार कुठे आणि काय काम करतील हे मोदी सरकार आणि त्यांचे आवडते कंत्राटदार ठरवणार आहेत. तसेच, 'ग्राम सेवक' आणि रोजगार सहाय्यकांसाठी आता कोणतीही तरतूद ठेवण्यात आलेली नाही.

**४) राज्यांच्या अर्थव्यवस्थेवर हल्ला:**

पूर्वी, केंद्र सरकार मनरेगा अंतर्गत वेतनाचा ९० टक्के हिस्सा देत असे आणि राज्य सरकार केवळ १० टक्के वाटा उचलत असे. त्यामुळे कोणत्याही अडथळ्याशिवाय काम उपलब्ध करून दिले जात असे. नवीन कायद्यानुसार राज्य सरकारांना वेतनाचा ४० टक्के हिस्सा देणे बंधनकारक आहे. पण आता राज्य सरकार हे खर्च उचलण्यासाठी अतिरिक्त कर्ज घेणार आहे किंवा त्यासाठी त्यांना शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील निधी कपात करावा लागू शकतो.

'मनरेगा बचाओ संग्राम' हा १० जानेवारीला सुरू होऊन २५ फेब्रुवारी २०२६ रोजी संपणार आहे. काँग्रेस पक्षाने हा लढा देशातील प्रत्येक गावात आणि देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे ठरवले आहे. यामध्ये पंचायत स्तरावरील चौपाल, ग्रामसभा ठराव, प्रभाग स्तरावरील धरणे, जिल्हा स्तरावरील कार्यकर्ता परिषद व धरणे, प्रतिकात्मक निदर्शने, राज्य स्तरावरील विधानसभा घेराव आणि विभागीय स्तरावरील रॅलींसोबतच मनरेगा बचाओ रॅलीचा समावेश असणार आहे.

आमच्या मागण्या स्पष्ट आहेत

- मनरेगा त्वरित पुनर्स्थापित करा.
- कामाचा घटनात्मक हक्क पुन्हा बहाल करा.
- वेतनाचा हक्क आणि उत्तरदायित्वाचा हक्क सुनिश्चित करा.
- अकुशल भारतीय मजुरांना दैनिक किमान ४०० रुपये वेतन सुनिश्चित करा.

हा राजकीय कार्यक्रम नसून तो भारतातील प्रत्येक गरीब कामगार, शेतकरी तसेच मजुरांचे हक्क, उपजीविका आणि भविष्य वाचवण्यासाठी दिला जाणारा लढा आहे. काँग्रेस पक्ष त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत लढा देणार आहे. मनरेगा वाचवण्यासाठी, आमच्यासोबत जोडले जा आणि तुमचा आवाज उठवा!

भेट द्या :

https://www.mgnregabachao.in

# 'मनरेगा' ऐवजी आता मनमानीला वाव

'विकसित भारत करता इन्फ्रास्ट्रक्चर स्टॅक' या केंद्र सरकारच्या तयार होणार असलेल्या कामांच्या यादीतलीच कामे नव्या 'व्हीबी - जी राम जी' तून करता येतील. थोडक्यात, जी कामे खरे तर सरकारने केलीच पाहिजे होती, ती आता ग्रामीण अकुशल मजुरांकडून करवून घेऊन 'हीच रोजगार हमी' असे चित्र निर्माण केले जाणार...



– अश्विनी कुलकर्णी,

प्रगती अभियानच्या संस्थापक

'विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार ॲण्ड आजीविका मिशन - ग्रामीण' (व्हीबी-जी राम जी) हा नवा कायदा आणि 'मनरेगा' यांच्यात प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी कोणता फरक दिसेल, विशेषतः महाराष्ट्रावर त्याचा काय परिणाम होईल, याची चर्चा होणे अधिक गरजेचे आहे. नव्या कायद्यातही बायोमेट्रिक हजेरीवर आधी कायम ठेवण्यात आलेले आहे, तसेच अन्य अनेक तरतुदी जुन्याच्या तशाच आहेत. पण नवा कायदा राज्य सरकारांना अधिक निधी खर्च करायला लावणार आहे.

केंद्र सरकार एकूण खर्चाच्या ६० टक्के खर्च देणार आणि ४० टक्के राज्य सरकारांनी करायचा. 'मनरेगा'त अकुशल मजुरीचा पूर्ण खर्च केंद्र सरकारचा आणि साधन सामग्रीच्या खर्चात राज्याचा वाटा २५ टक्के अशी जबाबदारी होती. केंद्र सरकारने निधी उपलब्ध करून द्यायचा आणि राज्य सरकारने अंमलबजावणी यंत्रणा उभारून व्यवस्थित राबवायची. आता हे बदलले आहे. कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येकाला काम देणे ही केंद्र आणि राज्य सरकारची 'जबाबदारी' होती, तेही बदलले आहे.

नव्या कायद्यामुळे केंद्र सरकार ठरवणार कोणत्या राज्याला किती निधी लागेल, त्यातला ६० टक्के निधी द्यायचा. दुसरे म्हणजे, काम कोठे काढायचे तेही केंद्र सरकार नोटिफाय करणार. प्रत्येक राज्याला केंद्र सरकार किती निधी देणार तेही केंद्रच ठरवणार. कारण त्याचे निकष केंद्र सरकार ठरवणार. म्हणजे मनरेगा मागणीवर आधारित होती ते आता असणार नाही का? १०० टक्के अकुशल खर्चाची जबाबदारी केंद्राकडे होती तेव्हा, प्रतिकुटुंब सरासरी ५० दिवसांचे काम मिळायचे. आता केंद्राचा निधी कमी केल्यावर व वर्षातून ६० दिवस (शेतीतील पेरणी आणि कापणीच्या काळात) काम काढायचे नाही असे बंधन घालून मग '१०० ऐवजी १२५ दिवस प्रतिकुटुंब' असे आश्वासन नवीन कायद्यात आहे - त्यांपैकी किती दिवस प्रत्यक्ष काम मिळेल ही शंका रास्त आहे.

महाराष्ट्राची गोष्ट वेगळी आहे. आपल्याकडे १९७८ पासूनचा रोजगार हमी योजना (रोहयो) कायदा अद्याप अस्तित्वात आहे. आपल्या कायद्याप्रमाणे प्रतिकुटुंब ३६५ दिवसांची हमी आहे. महाराष्ट्र राज्य 'मनरेगा'साठी फक्त साधन सामग्रीचा खर्च करतेय, पण कुटुंबाचे काम १०० दिवसांपेक्षा जास्त दिवस झाले तर तो खर्च आपल्या रोहयो तरतुदीनुसार खर्च केला जातो. मागील पाच वर्षांच्या खर्चाची आकडेवारी घेऊन गणित मांडण्याचा प्रयत्न केला तर असे दिसते की, मनरेगासाठी केंद्र सरकारच्या निधीतून झालेला खर्च आणि 'रोहयो'तून राज्याचा झालेला खर्च असा एकंदर खर्चात महाराष्ट्राच्या खर्चाचे प्रमाण किंवा वाटा २५ टक्के ते ४५ टक्क्यांच्या दरम्यान असायचा आहे. आता पुढे केंद्र सरकार ६० टक्केच देणार आणि बाकी महाराष्ट्राने करायचे, म्हणजे राज्याचा खर्च आणखी वाढेल.

प्रत्येक गावातील उपजीविकेची साधने आणि तेथील नैसर्गिक संसाधने यांची सद्यःस्थिती आणि त्यावर गरजा वेगळ्या आहेत म्हणून तेथे कोणती कामे, केव्हा आणि कशी करायला हवी हे स्थानिक समूहालाच माहीत असते. या कामांचे नियोजन हे स्थानिक समूहच चांगले करू शकतात, त्यामुळेच तर 'विकास कामांचे आकलन गावात होऊन कामे ग्रामसभेत ठरावीत' असे मनरेगाच्या कायद्यात आहे. जे ग्रामसभेत ठरेल ते मनरेगा कायद्याच्या उद्दिष्टांना धरून आहे ना, एवढेच

तपासण्याचे काम पंचायत समितीने करावे असे अपेक्षित होते. तरी देखील बरीच कामे वरून लादलेली असायची... आता नवीन कायद्यात तर सर्वच कामांसाठी 'वरचे' आदेश ऐकण्याची पद्धत रुजू होईल असे आखणी आहे.

नवीन कायद्यात कागदोपत्री तरी, 'गावात सहभागी पद्धतीने नियोजन करून कामांची यादी तालुका पंचायतीत जमा करून, तसेच जिल्हा आणि राज्य पातळीवर एकत्रित करायची' आहे. पण महत्त्वाचा बदल असा की, त्यातील कामे ही 'विकसित भारत रूरल इन्फ्रास्ट्रक्चर स्टॅक' या केंद्र सरकारतर्फे तयार होणार असलेल्या कामांच्या यादीतील असावीत. या 'स्टॅक'मधली कामे 'राष्ट्रीय प्राथमिकता' पाहून केंद्र सरकार ठरवणार, तसेच 'प्रधानमंत्री गती शक्ती नॅशनल मास्टर प्लान'मधील कामांशी जुळणारी कामे घ्यावीत' असेही नव्या कायद्यात सुचवले आहे. ग्राम पातळीवरची नियोजित कामे आणि केंद्राच्या 'स्टॅक'मधली कामे यांची सांगड कशी घालणार हे आता तरी कुणालाच माहीत नाही.

### सरकारचाच लाभ, मजुरीला नकार!

उदाहरण घेऊ या – ग्रामीण आवास योजना, शौचालय बांधकाम ही कामे ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत होती, ती 'मनरेगा'शी जोड केली जायची. या कामातील साधन सामग्रीचा खर्च राज्य सरकार ग्रामविकास विभागाच्या निधीतून देणार आणि अकुशल मजुरांच्या मजुरीचा खर्च मनरेगातून केंद्र सरकार करणार असे काही वर्षांपूर्वी सुरू झाले. याचा अर्थ ग्रामविकास विभागातील मजुरीच्या मजुरीसाठीचा (राज्याचा) खर्च वाचला – पण त्या मजूर कुटुंबाला आवास योजनेच्या बांधकामाचे काम आणि 'मनरेगा'तेही काम मिळत होते ते दोन्ही कमी झाले.

हे तपशीलवार समजून घेण्याचे कारण असे की, आता ज्या कामांची यादी नवीन कायद्याप्रमाणे दिली आहे, त्यात बहुतेक कामे ही सरकारला करायच्याच असलेल्या बांधकामांशी संबंधित आहेत. शाळा इमारत, खोल्या वाढवणे, अंगणवाडी इमारत, ग्रामपंचायत भवन, पक्के रस्ते, समाज मंदिर इमारत, कल्व्हर्ट, आधीच्या कामांची दुरुस्ती, जल जीवन मिशनच्या कामांची दुरुस्ती, प्रशिक्षण घेण्यासाठी इमारती, धान्य गोदामे अशी अनेक कामे. या सर्व कामांमध्ये बांधकाम हे एक सूत्र आहे. म्हणजे मशीन, यंत्र यांचा वापर जास्त. ही सर्व कामे साधन सामग्रीचा खर्च ज्या त्या विभागातून आणि त्यातील अकुशल मजुरांच्या मजुरीचा खर्च 'व्हीबी - जी राम जी' मधून अशी आखणी समोर येते आहे. ही सर्व कामे आधीही कोणत्या ना कोणत्या मार्गाने होत होती तेव्हा मजुरांना या कामावर जाऊन ठेकेदाराकडून मजुरी कमावता येऊ शकत होती आणि मनरेगातूनही काम करायला मिळत होते. पण आता मजुरांना एकूण काम मिळण्याची शक्यता कमी होणार.

### पैसा गावातच हवा

जेव्हा गावातून कामाची मागणी येईल तेव्हा 'विकसित भारत रूरल इन्फ्रास्ट्रक्चर स्टॅक' मध्ये बसू शकतील अशीच त्यांना कामे काढावी लागतील. यामुळे 'मिळेल त्याला / तिला काम, मागेल तेव्हा काम आणि गावाने ठरवलेले काम' ही मनरेगाच्या गाभ्यात ठरलेली त्रिसूत्री विस्कळीत होणार आहे.

मनरेगाचा एक महत्त्वाचा नियम 'जास्तीत जास्त खर्च अकुशल मजुरीवर आणि कमीत कमी खर्च यंत्रसामग्रीवर' या तत्त्वावर आधारित आहे. पण आता नवीन कायद्यातल्या तरतुदींनुसार ठेकेदारांना आणण्याचे प्रयत्न झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होऊ शकते. मनरेगामध्ये स्थानिक मजूर काम करतात, म्हणून त्या कामांचा दर्जा व्यवस्थित असतो. कारण त्या कामांचा फायदा त्यांनाच होणार असतो. स्थानिक मजुरांच्या हातात पैसा आल्याने तो पैसा गावातच फिरतो आणि ग्रामीण बाजारपेठ जिवंत राहते. जर साधनसामग्री आणि यंत्रावरचा खर्च वाढला तर हा पैसा पुन्हा शहरांकडे वळेल.

भारतासारख्या कृषिप्रधान देशात, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा या शेती आणि कृषिपूरक उपजीविकेशी थेट जोडलेल्या आहेत. या परिस्थितीत 'मनरेगा' केवळ रोजगाराचे साधन नसून ग्रामीण विकासात सर्वात मोठे योगदान देणारा कार्यक्रम होता. भारतातील आणि महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकरी कुटुंब हे अल्पभूधारक म्हणजे पाच एकरांपेक्षा कमी शेतजमीन असलेले, पावसाच्या पाण्यावर कोरडवाहू शेती करणारे आणि पशुपालन, फळबाग, मत्स्यशेती, कुक्कुटपालन अशा जोडधंद्यांतून वर्षभराची गरज भागवणारे आहे. त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न हा रस्ते / इमारतींइतकाच पाणी साठवण, मृद संधारण, कुरण व्यवस्थापन अशा नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षण आणि संवर्धनावर अवलंबून आहे. ही सर्व कामे 'मनरेगा' मधून करणे शक्य झाले.

'आयआयएससी'च्या महाराष्ट्रातील अभ्यासानुसार, मनरेगाच्या ८६ टक्के कामांचा दर्जा उत्तम असून ९७ टक्के कामे प्रत्यक्ष जमिनीवर अस्तित्वात आहेत. आमच्या अनुभवात 'मनरेगा'मुळे महाराष्ट्रातील अनेक गावे टँकरमुक्त झाली आहेत, महिलांच्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा उतरला आहे आणि शेतमजुराचे रूपांतर बागायतदार शेतकऱ्यात झाले आहे. 'मनरेगा'चा अभ्यास जगभरातील अनेक नामवंत विद्यापीठांनी केला आहे. ग्रामीण विकासासाठी ही अत्यंत प्रभावी योजना असल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. नुकतेच काही अर्थतज्ज्ञांनी ही योजना आहे तशी सुरू ठेवणे गरजेचे आहे असे पत्र लिहिले आहे.

अशा वेळी ही योजना कमकुवत करणे म्हणजे ग्रामीण भारताचा कणा मोडण्यासारखे आहे.

दै. लोकसत्ताच्या सौजन्याने

# मनरेगा बचाव संग्राम : ठळक मुद्दे




मोदी सरकारचा 'मनरेगा' मधील प्रस्तावित बदल हा तुमच्या कामाच्या घटनात्मक अधिकारांवर केलेला एक नियोजित असा हल्ला आहे.

१. तुमच्या कामाचा अधिकार चोरला जात आहे:

**पूर्वी** : मनरेगा अंतर्गत, संपूर्ण भारतातील प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला कामाची कायदेशीर हमी होती. संपूर्ण भारतातील कोणत्याही ग्रामपंचायत क्षेत्रात काम मागणाऱ्या कोणत्याही कुटुंबाला १५ दिवसांच्या आत काम देणे बंधनकारक होते.

आता : मोदी सरकारने केलेल्या नव्या बदलांनुसार, आता काम हा अधिकार राहणार नसून सरकार ठरवेल तशी ती वाटली जाणारी ती 'रेवडी' असेल. कोणत्या ग्रामपंचायतींना काम मिळेल हे आता मोदी सरकार स्वतः ठरवणार आहे.

२. तुमचा मजुरीचा अधिकार चोरला जात आहे:

**पूर्वी** : मनरेगा अंतर्गत, अधिसूचित अशा किमान मजुरीवर काम दिले जात असे आणि त्यात दरवर्षी वाढ केली जात असे.



**दत्तात्रय खांडगे**
कार्यकारी संपादक
जनमानसाची शिदोरी

तसेच वर्षातील ३६५ दिवस काम उपलब्ध असे. त्यामुळे कुटुंबांना त्यांच्या आवडीच्या कोणत्याही वेळी काम मिळण्याचा पर्याय नेहमी उपलब्ध असे.

आता : मोदी सरकारच्या बदलांनुसार, मजुरी ही अनियंत्रितपणे निश्चित केली जाणार आहे. ज्यामध्ये किमान मजुरीची कोणतीही हमी नसून वार्षिक वाढीचीही शाश्वती नसणार आहे. कापणीच्या हंगामात कामाला परवानगी दिली जाणार नसल्यामुळे या काळात इतर मालकांकडून योग्य मजुरीची मागणी करणे कामगारांना शक्य होणार नाही. परिणामी कोणत्याही किमान मजुरीशिवाय मिळेल ते काम त्यांना स्वीकारावे लागणार आहे.

३. तुमच्या ग्रामपंचायतीचे अधिकार आता कंत्राटदारांच्या हातात येणार:

**पूर्वी** : मनरेगा अंतर्गत, ग्रामपंचायतींना त्यांच्या स्वतःच्या गावांच्या विकास कामांसाठी विविध प्रकल्पांवर कामगारांना नियुक्त करण्याचा अधिकार होता. विकास कामांचे नियोजन आणि शिफारस ही ग्रामपंचायती आणि ग्रामसभांद्वारे केली जात असे. कंत्राटदारांना काम करण्यास बंदी होती. मनरेगाचे काम हे गावांच्या विकासासाठी होते. कामगारांना स्थानिक 'मनरेगा मेट्स' आणि रोजगार सहाय्यकांकडून मदत मिळत असे.

आता : मोदी सरकारने केलेल्या बदलांनुसार, सर्व निर्णय हे दिल्लीतून रिमोट कंट्रोलद्वारे घेतले जाणार आहेत. विकास प्रकल्प काही [illegible] मर्यादित असून नियोजनाचे महत्त्वाचे निर्णय देखील

मोदी सरकारच घेणार आहे. अशा प्रकारे ग्रामपंचायती आपले अधिकार गमावणार असून त्या मोदी सरकारच्या आदेशाची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था होणार आहेत. काम करण्यासाठी कंत्राटदारांना आणले जाणार असल्यामुळे नफ्यासाठी मजूर पुरवठा म्हणून कंत्राटदाराकडून कामगारांचा उपयोग केला जाणार आहे. विशेष म्हणजे स्थानिक जबाबदारी मदत करण्यासाठी कोणतेही 'मनरेगा मेट्स' किंवा रोजगार सहाय्यक नसणार आहेत.

४. राज्य सरकारची अधोगती केली जात असून त्यांच्यावर आर्थिक ओझे टाकले जात आहे.

पूर्वी : केंद्र सरकार हे मनरेगा अंतर्गत कामांसाठी मजुरीचा १०० टक्के खर्च उचलत असे. त्यामुळे राज्य सरकारे कोणत्याही अडचणीशिवाय कामगारांना काम देऊ शकत होती.

आता : आता मजुरीचा ४० टक्के हिस्सा हा राज्य सरकारांकडून दिला जाणार आहे. परिणामी त्यांचा खर्च वाचवण्यासाठी, राज्य सरकारे आता कायदेशीर तुम्हाला काम देखील देणार नाहीत.

मागील २० वर्षांपासून 'मनरेगा' भारताची जीवनरेखा

• कोविड - १९ महामारीच्या काळात, मोदी सरकारने अचानक लादलेल्या लॉकडाऊनमुळे लाखो स्थलांतरित मजुरांना त्यांच्या घरी परतण्यास भाग पाडण्यात आले होते. त्या परिस्थितीत त्यांच्याकडे काम नसताना 'मनरेगा'ने सुमारे ४.६ कोटी कुटुंबांना रोजगार मिळवून दिला होता.

• मनरेगा योजनेची २००६ मध्ये अंमलबजावणी झाल्यापासून देशात एकूण १८० कोटी पेक्षा जास्त कामाचे दिवस निर्माण झाले आहेत.

• गावातील तलाव आणि ग्रामीण रस्ते यांसारख्या उपलब्ध १० कोटी मालमत्ता देशामध्ये मनरेगा अंतर्गत बांधल्या गेल्या आहेत.

• मनरेगा ही सर्वात मजबूत आणि यशस्वी योजनांपैकी एक योजना असल्याचे 'फिफा'सह २०० हून अधिक अभ्यास संस्थांनी त्यांच्या अहवालातून दाखवून दिले आहे.

मोदी सरकारच्या मागील ट्रॅक रेकॉर्ड मधून त्यांचा हेतू अपेक्षित होता.

• मोदी सरकारच्या अकरा वर्षांच्या काळात 'मनरेगा' योजनेअंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या मजुरीत फारशी वाढ झालेली नाही.

• उच्चांकी महागाई असूनही मनरेगा बजेटमध्ये ३ वर्षांपासून वाढ करण्यात आलेली नाही.

• कामगारांची मजुरी मोठ्या प्रमाणावर विलंबाने दिली जात आहे. विलंबाने पेमेंट केल्यामुळे मागील वर्षांची थकबाकी भागवण्यासाठी वार्षिक मनरेगा बजेटचा सुमारे २० टक्के भाग खर्च होत आहे.

• डिजिटल पडताळणी करण्यासाठी नॅशनल मोबाईल मॉनिटरिंग सिस्टम ॲपची सक्ती आणि आधार - आधारित पेमेंट सिस्टमच्या अनिवार्य अवलंबामुळे २ कोटी कामगारांना कामाच्या आणि हक्काच्या मजुरीच्या अधिकार हिरावून घेण्यात आला आहे.

• कामगारांचे शोषण रोखण्यासाठी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'मनरेगा' योजनेतून मजुरांना मिळणारा कामाचा अधिकार आता मोदी सरकारने संपवला आहे.

• त्यामुळे '१२५ दिवसांची' तरतूद हा आता एक जुमला झाला असून मोदी सरकारचा हेतू केवळ योजना मोडीत काढण्याचा आहे. हे त्यांच्या मागील ट्रॅक रेकॉर्ड वरून दिसून आले आहे.

'मनरेगा' योजना बदलण्याच्या नवीन कायद्याचे धोके

• बेरोजगारीत वाढ होणार.

• लोकांना किमान वेतन न दिल्यामुळे मजुरांचे शोषण होणार.

• शहरांकडे होणाऱ्या सक्तीच्या त्रासदायक स्थलांतरात वाढ होणार.

• पंचायतींचे अधिकार, सत्ता आणि प्रासंगिकता संपुष्टात येणार.

मनरेगा बचाव संग्रामाच्या चार मागण्या

• हमी दिलेले काम, हमी दिलेली मजुरी मिळाली पाहिजे आणि हमी दिलेली उत्तरदायी व्यवस्था राहिली पाहिजे.

• मनरेगा मधील कलम १६ करून पूर्वीप्रमाणेच मनरेगा पुन्हा सुरू करावी.

• कामाच्या घटनात्मक अधिकाराची पूर्ण पुनर्स्थापना करावी.

• राष्ट्रीय पातळीवर ४०० रुपयांचे किमान दैनंदिन वेतन निश्चित करावे.

१२ जानेवारी ते २९ जानेवारी, २०२६ दरम्यान राबविण्याच्या कामांची यादी

• प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामप्रधान, ग्रामपंचायत सदस्य, मनरेगा मेट्स आणि रोजगार सहायक यांचा सहभाग असलेले पंचायत - स्तरीय चौपाल आयोजित करावे.

• काँग्रेस अध्यक्ष आणि विरोधी पक्षनेते (लोकसभा) यांनी स्वाक्षरी केलेले पत्र ग्रामप्रधान, माजी ग्रामप्रधान, रोजगार सेवक आणि मनरेगा कामगारांना पोहोचवावे.

• प्रत्येक गावात मनरेगा कामगारांना श्रीमती सोनिया गांधी यांचा व्हिडिओ संदेश सार्वजनिकरित्या दाखवावा.

• विधीक योजनेचे पोस्टर लावावे. या योजना समन्वय समितीद्वारे जारी केल्या जातील.

• २९ जानेवारी रोजी कामाचा अधिकार आणि मनरेगाचे रक्षण करण्याची मागणी करणारे ग्रामसभा ठराव मंजूर करावे. एआयसीसीची समन्वय समितीने दिलेल्या सूचनेनुसार 'काम मांगो अभियान' राबवावे.

• मनरेगाच्या समर्थनार्थ घोषणांसह गावपातळीवर प्रभात फेरी काढावी.

• मनरेगा कामगारांकडून भारताच्या राष्ट्रपतींना मनरेगा पुन्हा सुरू करण्याची मागणी करणारे स्वाक्षरी केलेली पोस्टकार्ड पाठवावे.

• विधानसभा स्तरीय जुमला सभा घेणे.

सूचना - एआयसीसीची समन्वय समिती ठरवेल त्याप्रमाणे आगामी काळात उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# मनरेगा आणि व्हीबीजी राम जी (VBGRAMG) : रोजगार हमी आणि कार्यकारी योजनांचे घटनात्मक व कायदेशीर विश्लेषण






- धनंजय रामकृष्ण शिंदे,
सरचिटणीस
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
संयोजक- रोजगार व स्वयंरोजगार विभाग

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ (मनरेगा) हा भारतातील सर्वात महत्त्वपूर्ण सामाजिक कल्याणकारी कायद्यांपैकी एक होता, ज्याने प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला आर्थिक वर्षात १०० दिवसांच्या अकुशल मजुरीच्या कामाची कायदेशीर हमी दिली. इतर सामान्य सरकारी योजनांपेक्षा वेगळे, मनरेगाने नागरिकांना कायदेशीर हक्क दिला आणि राज्यावर रोजगार देण्याची किंवा बेरोजगारी भत्ता देण्याची जबाबदारी निश्चित केली. सव्वादोन दशके हा कायदा दरवर्षी सुमारे आठ कोटी ग्रामीण कुटुंबांना आधार देत आला असून ग्रामीण गरिबांसाठी एक महत्त्वाचे सामाजिक सुरक्षा कवच ठरला आहे.

अलीकडे केंद्र सरकारने मनरेगाच्या अंमलबजावणीमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत आणि त्याऐवजी व्हीबीग्रामजी (Village - Based Growth and Resource Management Scheme) ही नवी योजना पुढे आणली आहे. यामुळे गंभीर घटनात्मक आणि कायदेशीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या लेखात मी या बदलाचे विश्लेषण भारतीय संविधानाच्या चौकटीत, विशेषतः अनुच्छेद २१ (जीवन व उपजीविकेचा हक्क) च्या संदर्भात केले आहे आणि मनरेगा कमजोर करून [illegible]

कायदेशीर बंधनकारक पर्यायी योजना न देणे हे गरीब नागरिकांवर कमी अन्यायकारक ठरेल, हे स्पष्ट केले आहे.

### मनरेगा: हक्काधारित नागरिक कायदा

मनरेगा हा अद्वितीय कायदा होता कारण त्याने नागरिकांचे कल्याण हा केवळ सरकारी कृपादृष्टीचा विषय न ठेवता 'कायदेशीर हक्क' बनवला. कायद्याच्या कलम ३ नुसार रोजगाराची हमी होती, तर कलम ७ नुसार १५ दिवसांच्या आत काम न दिल्यास बेरोजगारी भत्ता देणे बंधनकारक होते. त्यामुळे राज्याच्या अपयशाविरुद्ध नागरिकांना न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार मिळाला.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद २१ अंतर्गत जीवनाच्या हक्कात 'उपजीविकेचा हक्क' अंतर्भूत असल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे. मनरेगाने या न्यायिक भूमिकेला आधार देऊन ग्रामीण भारतातील नागरिकांना किमान रोजगार व उत्पन्न सुरक्षा दिली. मनरेगा कमजोर करणे म्हणजे थेट अनुच्छेद २१ मधील मूलभूत हक्कांवर आघात आहे.

### बदल आणि 'व्हीबीजीरामजी' ची ओळख

मनरेगामध्ये करण्यात आलेल्या बदलामुळे त्याची परिणामकारकता कमी झाली आहे. यामध्ये अर्थसंकल्पीय तरतुदी कमी करणे, मजुरी देण्यास विलंब, गुंतागुंतीची मंजुरी प्रक्रिया आणि आधार-लिंक्ड पेमेंट प्रणालीवर वाढती अवलंबित्व यांचा समावेश आहे. या उपायांमुळे ग्रामीण मजुरांना हमीचे रोजगार मिळणे अधिक कठीण झाले आहे.

'व्हीबी जी राम जी' योजना गाव-स्तरीय विकास, कौशल्य विकास आणि मालमत्ता निर्मितीवर लक्ष केंद्रित करते. मात्र ती मनरेगापेक्षा मूलभूतपणे वेगळी आहे कारण, ती 'रोजगाराचा कायदेशीर हक्क देत नाही', अंमलबजावणी न झाल्यास नागरिकांना "न्यायालयीन उपाय उपलब्ध नाहीत", ती कायद्याऐवजी प्रशासकीय निर्णयांवर आधारित आहे.

म्हणजेच, हक्काधारित योजनेऐवजी विवेकाधीन (discretionary) कार्यकारी योजना आणणे म्हणजे मनरेगाच्या मूलभूत चौकटीत बदल करून 'हक्काधारित शासनाऐवजी प्रशासकीय कृपेवर आधारित शासन' निर्माण करणे होय.

### व्हीबीजीरामजी योजनेमुळे निर्माण होणारे घटनात्मक प्रश्न 'अनुच्छेद २१ - उपजीविका व सन्मानाचा हक्क'

सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद २१ मध्ये सन्मानाने जगण्याचा हक्क समाविष्ट केला आहे. मनरेगा रोजगार व वेळेवर मजुरी देऊन हा घटनात्मक आदर्श प्रत्यक्षात उतरवत होता. ही सुरक्षा कमी करून तितकीच बंधनकारक पर्यायी व्यवस्था न देणे हे राज्याचे घटनात्मक कर्तव्यभंग आहे.

### अनुच्छेद १४ - समानता व मनमानीविरोधी तत्त्व

वेतन देण्यास होणारा विलंब, तांत्रिक अडचणींमुळे होणारी वगळणी आणि कामाच्या उपलब्धतेतील घट यांचा सर्वाधिक फटका ग्रामीण मजूर, महिला व उपेक्षित समुदायांना बसतो. हे भेदभावपूर्ण व मनमानी स्वरूपाचे असून अनुच्छेद १४ चे उल्लंघन आहे.

### राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे (DPSP)

अनुच्छेद ३८, ३९(अ) आणि ४१ मध्ये राज्याने सामाजिक न्याय व कामाचा हक्क प्रोत्साहित करण्याची जबाबदारी दिली आहे. मनरेगा कमजोर करणे म्हणजे या घटनात्मक उद्दिष्टांना हरताळ फासणे आहे.

### न्यायनिवाड्यांचा आदर (Doctrine of Precedent)

न्यायालयांनी उपजीविकेला मूलभूत हक्क मानले आहे. त्यामुळे कार्यकारी सरकारवर त्या तत्त्वांचा आदर करण्याचे बंधन आहे. मनरेगासारखी वैधानिक हमी योजना कमकुवत करून ती प्रशासकीय योजनेत बदलणे म्हणजे स्थापित घटनात्मक न्यायशास्त्राला धक्का देणे आहे.

### ग्रामीण भारतावर परिणाम

मनरेगाने आर्थिक संकट, दुष्काळ आणि कोविड महामारीदरम्यान मोठा आधार दिला. यामुळे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी झाले, ग्रामीण क्रयशक्ती वाढली आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळाला (सहभाग ५० टक्के पेक्षा जास्त).

व्हीबीग्रामजीला कायदेशीर आधार नसल्याने ती मनरेगासारखी सुरक्षितता देऊ शकत नाही. ग्रामीण गरीबांसाठी कामाची निश्चितता आणि वेळेवर मजुरी ही जगण्यासाठी अत्यावश्यक आहे. विवेकाधीन योजना कायदेशीर हक्कांची जागा घेऊ शकत नाही.

### कल्याणकारी राज्य विरुद्ध दानधर्मावर आधारित राज्य

भारतीय संविधानानुसार भारत हे कल्याणकारी राज्य (Welfare State) आहे, दानधर्मावर आधारित राज्य नाही. नागरिक हे हक्कधारक आहेत, लाभार्थी नाहीत. मनरेगाने हा घटनात्मक आदर्श प्रत्यक्षात आणला. मनरेगा कमकुवत केल्यास शासन व्यवस्थेत दानधर्मावर अवलंबून राहण्याचा धोका निर्माण होतो.

### निष्कर्ष

मनरेगातील बदल आणि त्याऐवजी व्हीबीग्रामजीसारख्या कार्यकारी योजना आणणे हे भारताच्या सामाजिक-आर्थिक न्यायाच्या घटनात्मक बांधिलकीला गंभीर धक्का आहे. मनरेगा केवळ कल्याणकारी योजना नसून अनुच्छेद १४, २१ आणि मार्गदर्शक तत्त्वांना अर्थ देणारा कायदेशीर हक्क आहे.

ग्रामीण गरीबांच्या रोजगार सुरक्षेत कपात करून तितकीच बंधनकारक कायदेशीर व्यवस्था न देणे म्हणजे कायद्याचे राज्य कमजोर करणे होय. घटनात्मक लोकशाहीत शासन हक्कांवर आधारित असले पाहिजे, प्रशासकीय विवेकाधिकारावर नाही. विकास हा मानवी सन्मान व जगण्याच्या किमतीवर होऊ शकत नाही. मनरेगासारखे हक्काधारित कायदे मजबूत करणे हे घटनात्मक नैतिकता जपण्यासाठी अत्यावश्यक आहे.

# अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राने धडाडीचे, कर्तबगार व लोकाभिमुख नेतृत्व गमावले : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई** : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अकाली निधनाची बातमी अत्यंत धक्कादायक व सुन्न करणारी आहे. स्पष्टवक्तेपणा, प्रशासनावर मजबूत पकड, जनतेच्या प्रश्नांची सखोल जाण आणि ते सोडवण्याची क्षमता असलेल्या अजित दादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राने धडाडीचे कर्तबगार व लोकाभिमुख नेतृत्व गमावले आहे, अशा शोकभावना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केल्या.

उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अजित दादा पवार यांना राजकारणाचे बाळकडू त्यांचे काका, ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्याकडून मिळाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत अजित दादांनी राजकारणात स्वतःचा वेगळा ठसा उमटवला. कामाच्या बाबतीत ते अत्यंत स्पष्ट, वक्तशीर, कणखर आणि निर्णयक्षम भूमिका घेत असत. कोणत्याही पक्षातील कार्यकर्ता असो, त्यांच्या मदतीसाठी ते सदैव तत्पर असत.

आपल्या राजकीय कारकिर्दीत अजित पवार यांनी आमदार, खासदार, विविध खात्यांचे मंत्री तसेच उपमुख्यमंत्री अशा अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या आणि प्रत्येक पदाला त्यांनी पूर्ण न्याय दिला. राजकारणासोबतच सामाजिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, कला व क्रीडा क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. बारामतीसह पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामे करून त्यांनी या शहरांचा चेहरामोहरा बदलून टाकला. सर्वसामान्य लोकांची कामे झाली पाहिजेत, हीच त्यांची कायम भूमिका होती. शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता.

अजित दादा पवार यांची प्रशासनावर मजबूत पकड होती. राज्याचे नेतृत्व करत असताना त्यांनी संस्थात्मक बांधणी केली, नेतृत्वाची पुढील पिढी घडवली आणि सहकार क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर विशेष भर दिला. विरोधी पक्षातील नेत्यांशीही त्यांचे सौहार्दपूर्ण संबंध होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी राजकीय हानी झाली आहे. स्व. विलासराव जी देशमुख, गोपीनाथ जी मुंडे यांच्याप्रमाणेच अजित पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे.

अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी पवार कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# अजित पवार नावाचे वलय...

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विषयीचे कुतूहल कायमस्वरूपी आणि अनंत वेधकारी आहे. अजितदादांनी राजकारणात आपल्या कृतीतून ठसा उमटवला. त्याद्वारेच प्रशासनात एक दरारा निर्माण केला. प्रशासनावर त्यांची उत्तम पकड होती. बाकी सत्ताधारी नेत्यांमध्ये विषयाच्या आकलनाचा अभाव दिसतो. मात्र, एखादा विषय तत्काळ समजून घेऊन त्याची पूर्तता करण्याचे कसब अजितदादांकडे होते. ही क्षमता दिवंगत मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, विलासराव देशमुख आणि शरद पवार यांच्याकडे असल्याचे मी पाहिले आहे. ही मंडळी आपल्या अफलातून आकलनशक्तीच्या जोरावर कोणताही विषय मार्गी लावायची. विषय कोणताही असेल, तो त्वरित समजून घेण्याची कला अजितदादांच्या अंगी होती. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीपर्यंत काम करण्याची त्यांना संधी मिळाली. त्यातून हे व्यक्तिमत्त्व घडले होते.

अगदी सुरुवातीच्या काळात तरुण वयात ते खासदार झाले. त्यांना राजकीय वारसा असला, तरी आपले वेगळेपण जपणे महत्त्वाचे असते. अजितदादांनी त्यांच्या कर्तृत्वातून हा वारसा आणि वेगळेपणा जपला. बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती आणि आकलन शक्तीच्या जोरावर जी माणसे आपला ठसा उमटवतात, त्यामध्ये अजितदादांचे नाव घ्यावेच लागेल.





**उल्हासदादा पवार,**
संपादक
जनमानसाची शिदोरी

अजितदादांचे आणखी एक वेगळेपण म्हणजे वक्तशीरपणा. मंत्रिमंडळाची बैठक असेल, प्रशासनातील भेटीची वेळ दिली असेल किंवा त्यांच्या खात्याची बैठक असेल, तर वेळेच्या अगोदर ते पोहोचायचे. अनेक समारंभांमध्ये हे त्यांचे वेगळेपण मी पाहिले आहे. अनेक राजकारणी हे कार्यक्रमाच्या ठिकाणी वेळेवर जात नसल्याचा अनुभव नागरिकांना येतो. मात्र अजितदादा हे कोणत्याही कार्यक्रमाला वेळेवर किंवा वेळेच्या अगोदर जायचे. सध्याच्या काळात ही गोष्ट दुर्मीळ झाल्यासारखी झाली आहे. मात्र अजितदादा हे कायमच वेळेत जायचे. अजितदादांनी शरद पवार यांचे काही गुण आत्मसात केले. त्यापैकी हा एक होता. शरदराव हे सकाळी साडेसात वाजता तयार असतात. रात्री कितीही जागरण झाले तरी ते सकाळी नागरिकांच्या भेटीसाठी तयार असतात. शरदरावांच्या सानिध्यामध्ये १९७० ते १९७८ पर्यंत मी सावलीसारखा त्यांच्याबरोबर फिरलो आहे. त्यांचा हा गुण मी जवळून पाहिला आहे.

अजितदादांना मी पहिल्यांदा पाहिले तो १९७० चा काळ असेल. तेव्हा ते १० ते ११ वर्षांचे होते. शरद पवारांबरोबर माझा मुक्कामही पवारांकडे असायचा. मी आठवड्यामध्ये एक दोनदा तिथे राहत होतो. तेव्हापासून मी अजितदादांना पाहत आलो. बारामतीला अनेक वेळा मी शरदरावांबरोबर गेलो, अंबाबाईच्या पूजेला घरी मी अजितदादांना पाहत आलो. अजितदादांचे वडील, त्यांना घरातील सर्व जण 'तात्या' म्हणायचे. अजितदादांच्या वडिलांचे शरदरावांवर अतिशय प्रेम. या कुटुंबात सामंजस्य आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्रातील हे आदर्श कुटुंब म्हटले पाहिजे. मोठे कुटुंब असतानाही हा संपूर्ण परिवार एकत्र राहतो.

महिला राजकारणात फारशा नसायच्या, त्या काळात शरदरावांच्या आई तेव्हाच्या लोकल बोर्डाच्या सदस्या होत्या. तेव्हापासूनच

विचारसरणीची माणसे कुटुंबात असली तरी त्यांच्यात प्रेम आणि सामंजस्याची भावना आहे. संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि सत्यशोधक समाज यांचा वारसा या कुटुंबामध्ये आहे. त्यामुळे धर्मांधता, जातीयता हा विषय त्यांच्या कुटुंबात नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कुटुंबात प्रत्येकाला मत मांडण्याचे स्वातंत्र्य आणि निर्णय घेण्याचा अधिकार आहे. अजितदादा हे थोडे आक्रमक होते. पण त्याचा अर्थ कोणाचा तरी अपमान करणे असा नव्हता. आक्रमकतेचा अर्थ ठरलेली गोष्ट न थांबता अमलात आणणे. ही पद्धतही त्यांच्यामध्ये कायम होती.

अजितदादांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कर्तृत्व आणि स्वाभिमानाची जडणघडण. शरद पवार यांनी जसे स्वातंत्र्य राखले, त्याचप्रमाणे अजित पवार यांनी स्वतःचे स्वाभिमान राखले. एखादे स्वाभिमान हे विशेष घेऊन विकसित करता येत नाही. त्यासाठी आतल्याची पात्रता करावी लागते. ते शरद पवार यांनी केले, तसेच अजित पवार यांनी केले.

अजितदादांना आवाजाची देणगी होती. त्यांचा आवाज पहाडी होता. तेच त्यांचे वैशिष्ट्य होते. अशा आवाजातून बोललेले कधी कधी समोरच्याला रुक्ष वाटते. पण मनात अजितदादांबाबत अनेकांचा गैरसमज व्हायचा. ते कोणाचाही अपमान करत नसत. पण एखादी गोष्ट होणार नसेल तर ते स्पष्टपणे सांगायचे. तसेच काम होणार असेल तर तेही स्पष्टपणे सांगायचे, हे मी पाहिलेले आहे. त्यांनी एखादे काम करायचे ठरवले तर ते शंभर टक्के करून दाखवायचे. 'करतो', 'बघतो', हे शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हते. तो त्यांचा स्वभावच नव्हता.

त्यांनी राज्य सहकारी बँक अत्यंत यशस्वीपणे चालवली. राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. भूविकास बँकेच्या माध्यमातूनही मदत केली. राज्य सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँक आणि विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून ते काम करत राहिले. कित्येक वर्षे त्यांनी पुण्याचे नेतृत्व केले. ते करताना काही कठोर निर्णय घ्यावे लागतात. पण शेतकऱ्यांचे दुःख पाहिल्यानंतर, थोडेसे नियमात बदल करून ते मदत करत राहिले. त्यासाठी त्यांनी कधीही हात मागे घेतला नाही, हे या ठिकाणी सांगितले पाहिजे. अनेक सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या अशा सहकारातल्या विविध संस्था जिवंत ठेवणे, त्यांना पाठबळ देणे आणि सहकार टिकवण्याचे काम अजितदादांनी केले.

महाराष्ट्राचे वैशिष्ट्य म्हणजे सहकाराचे असलेले जाळे. देशात महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि काही प्रमाणात आंध्र प्रदेश अशी तीन - चार राज्ये सोडली तर अन्य ठिकाणी सहकार प्रभावी दिसत नाही. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, कांतराव नाईक यांनी सहकार क्षेत्र हे केवळ वाढवले नाही, तर ते लोकांमध्ये आणि ग्रामीणभागांच्या दृष्टीने महत्त्वाचे केले. त्यांना योग्य तो न्याय देण्याचे काम आणि योग्य ते संतुलन ठेवण्याचे काम पाहण्याचे ज्या योजना लोकांनी केले त्यामध्ये अजितदादांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागेल.

अजित पवार यांनी राज्य सरकारमध्ये विविध खाती सांभाळली. जी जी खाती त्यांनी अतिशय सक्षमपणे सांभाळली. कुणी कितीही टीका - टिप्पणी केली, तरी ते निर्विवाद उत्तम असायचे. अर्थसंकल्पामध्ये ज्या तरतुदी आहेत, त्या प्राधान्याने त्यांनी काम केले. निर्णय घेण्याची अत्यंत कठोर क्षमताही अजितदादांमध्ये होती. कोणतेही खाते असले, तरी विषय समजून घेऊन निर्णय घ्यायचे, हे त्यांचे विशेष होते.

बोलण्याची कला त्यांनी आत्मसात केली होती. अलीकडे त्यांची भाषणे ऐकताना ते अधिकाधिक प्रगल्भ झालेले दिसून यायचे. शैलीदार वक्तृत्व, मार्मिक टिप्पणी करत विनोदाची झालर देऊन बोलण्यातून आपलेसे करायचे. निवडणुकीची सभा असली, तर त्या ठिकाणी कसे बोलायचे, गंभीर प्रश्न असल्यास कोणती भूमिका मांडायची, प्रशासनाशी कसा संवाद साधायचा हे त्यांनी अतिशय उत्तम प्रकारे जाणले. अनेक नेत्यांमध्ये अभावाने ही गोष्ट आढळते. एखाद्या नेतृत्वाबद्दल आदर व्यक्त करणे किंवा मूल्यमापन करताना आपले मत व्यक्त करणे, यामध्ये त्यांनी कधीच माघार घेतली नाही.

तुमचे आवडते मुख्यमंत्री कोण, असा प्रश्न विचारताच ते तात्काळ म्हणायचे, विलासराव देशमुख! त्यांनी हे अनेकदा सांगितले. ते खासगीत कधी कधी म्हणायचे, मुख्यमंत्र्यांना सहकार समजला पाहिजे, मुख्यमंत्र्यांना शेती समजली पाहिजे, मुख्यमंत्र्यांना उद्योग समजला पाहिजे, मुख्यमंत्र्यांना शैक्षणिक वातावरण कसे आहे, हे समजले पाहिजे, प्रत्येक गोष्टीची थोडी तरी माहिती हवी. विलासरावांकडे नेमकेपणाने ते एका आदर्श म्हणून बघत. विलासरावांबद्दल त्यांना व्यक्तिगत खूप आदर होता. अलीकडच्या काळात, एका नेत्याने निवडणुकीच्या दरम्यान विलासरावांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले, तेव्हा लातूरमध्ये जाऊन तिथे आपला उमेदवार असतानाही ते विलासरावांबद्दल स्पष्ट बोलले. लोकशाहीमध्ये हे फार महत्त्वाचे आहे.

कधी कधी एखादा शब्द चुकून गेला, तर माफी मागण्याचे नैतिक धाडस त्यांच्यामध्ये होते. चूक झाल्यावर ते यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीजवळ बसले होते. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल खरंच सलाम केला पाहिजे. ते रोखठोक बोलायचे. त्यांच्यात खोटेपणा नव्हता. योग्य व्यक्तीबद्दल त्यांच्या मनात अपार आदर होता.

नक्की असलेले नेते खूप झाले. मला नेहमी वाटायचे की, अजित दादा हे भविष्यात दिल्लीत स्थान निर्माण करतील. नितीश कुमार, लालू प्रसाद यादव, मुलायम सिंह यादव, अखिलेश यादव यांच्याप्रमाणे दिल्लीत अजित पवार नावाचे वलय निर्माण होऊ लागले होते.

पुण्यात माजी न्यायाधीश अप्पा देशपांडे यांच्या संस्थेच्या वतीने रत्नवर्षी पुरस्कारसोहळ्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात अजित पवारांच्या हस्ते माझा सत्कार करण्याचे ठरले होते. मात्र, कामाच्या व्यापामुळे दोन वेळा हा कार्यक्रम त्यांना पुढे ढकलावा लागला. आता मात्र, तो सत्कार राहूनच गेला...

# इंडिगोची मक्तेदारी

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वैमानिकांना पुरेशी विश्रांती मिळावी यासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA) जानेवारी २०२४ मध्ये नवीन FDTL (Flight Duty Time Limitations) नियम प्रथम सुचवले. मात्र इंडिगोने या सूचनेला दुर्लक्ष केले आणि राजकीय प्रभावाचा वापर करून ना नवीन वैमानिकांची भरती केली, ना विद्यमान वैमानिकांचे प्रशिक्षण दिले, तसेच नवीन सुरक्षा नियमांनुसार उड्डाण वेळापत्रकातही कोणताही बदल केला नाही.






पृथ्वीराज चव्हाण,
माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

वैमानिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले, प्रवाशांच्या गैरसोयीचे आरोप पुढे आले आणि वैमानिकांनी न्यायालयात धाव दाखल केली. असे असतानाही DGCA ने विशेषतः इंडिगोसाठी नियमांमध्ये सवलती देणे सुरूच ठेवले. परिणामी ५ डिसेंबर २०२५ रोजी इंडिगोच्या १,००० हून अधिक उड्डाणे रद्द करावी लागली आणि संपूर्ण भारतभर हजारो प्रवासी अडकले. इंडिगोला लाभ मिळावा म्हणून वारंवार मुदत वाढविल्यानंतर अखेर न्यायालयाच्या आदेशानुसार DGCA ने १ जुलै आणि १ नोव्हेंबर २०२५ पासून नवीन FDTL नियम लागू करण्याचा निर्णय घेतला. हे नियम प्रथम सुचविल्यानंतर तब्बल दोन वर्षांनी अमलात आले.

मंत्री नायडू यांनी असे सांगितले होते की पुढील १५ वर्षांत भारतात सुमारे ३०,००० नवीन वैमानिकांची आवश्यकता भासणार आहे. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी अदानी समूहातील कंपनी अदानी डिफेन्स सिस्टिम्स अँड टेक्नॉलॉजीज आणि प्राइम एरोसर्व्हिसेस यांनी फ्लाइट सिम्युलेशन ट्रेनिंग सेंटर (FSTC) मधील बहुसंख्य हिस्सा विकत घेतला. त्यामुळे भारताच्या वैमानिक प्रशिक्षण व्यवसायात अदानी समूहाचा मोठा वाटा निर्माण झाला. यानंतर केवळ पाच दिवसांत, म्हणजे १ डिसेंबर रोजी, इंडिगोचे अभूतपूर्व संकट आपण पाहिले. या घटनांमध्ये काही संबंध आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

आज भारतीय विमान वाहतूक बाजारात इंडिगोचा सुमारे ६५ टक्के हिस्सा आहे, तर टाटा समूहाच्या एअर इंडियाचा हिस्सा ३० टक्क्यांपेक्षा कमी आहे. २०१४ मध्ये वार्षिक प्रवासी संख्या ४ कोटी होती आणि आठ विमान कंपन्या कार्यरत होत्या. २०२५ मध्ये प्रवासी संख्या ४० कोटींवर पोहोचली आहे. मात्र केवळ दोनच विमान कंपन्या उरल्या आहेत. ही परिस्थिती म्हणजे नियामक पकडीचे (Regulatory Capture) क्लासिक उदाहरण आहे, जिथे नियामक संस्था सार्वजनिक हिताऐवजी खासगी नफ्याची खातरजमा करते.

इतर विकसित देशांतील अनुभव पाहण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी फार दूर पाहावे लागणार नाही. अमेरिकेतील साउथ वेस्ट एअरलाइन्समधील अलीकडील संकट हे याचे उत्तम उदाहरण आहे. डिसेंबर २१, २०२२ च्या सुमारास अमेरिकेच्या पश्चिम आणि मध्य भागात तीव्र हिवाळी वादळ आले. त्यानंतरच्या काही दिवसांत, २१ ते २८ डिसेंबर दरम्यान, साउथ वेस्टच्या ५,५०० हून अधिक उड्डाणे रद्द झाली. एकूण मिळून १६,००० पेक्षा जास्त उड्डाणे रद्द करावी लागली, जी अमेरिकेच्या विमान वाहतूक इतिहासातील सर्वांत मोठी अडचण निर्माण करणारी घटना ठरली. जवळपास २० लाख प्रवासी अडकले. जरी वादळामुळे सुरुवातीचा धक्का बसला असला, तरी अंतर्गत तांत्रिक आणि कार्यपद्धतीतील त्रुटींमुळे ही घटना पूर्णपणे नियंत्रणाबाहेर गेली.

साउथ वेस्टने उड्डाण नियोजन आणि कर्मचारी व्यवस्थापनासाठी जुनी व तर्कविसंगत अशी प्रणाली वापरली होती. ती इतका व्यवसाय हाताळण्यास सक्षम नव्हती. एकदा प्रणाली विस्कळीत झाल्यावर, मॅन्युअल प्रक्रियांद्वारे परिस्थिती सांभाळणे अशक्य झाले. वैमानिक संघटनांनी अनेकदा या प्रणालीत कमतरता व धोकादायक असल्याचा इशारा दिला होता, मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या संकटानंतर अमेरिकेच्या सिनेट समितीने चौकशी सुरू केली. सुमारे एका वर्षाच्या तपासणीनंतर, डिसेंबर २०२३ मध्ये अमेरिकेच्या परिवहन विभागाने साउथ वेस्टवर १४० दशलक्ष डॉलरचा दंड ठोठावला, जो आजवरचा सर्वात मोठा ग्राहक संरक्षण दंड होता. याशिवाय कंपनीला ६०० दशलक्ष डॉलर पेक्षा अधिक रक्कम प्रवाशांना परत द्यावी लागली. दंड आणि आर्थिक तोट्यांचा एकूण अंदाज जवळपास १ अब्ज डॉलर इतका होता. साउथ वेस्टने आपल्या प्रणालीचा पुनर्विचार करून मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची बांधिलकी घेतली. २०२५ च्या सुरुवातीस त्यांनी पुन्हा वेळेवर सेवा देण्याची क्षमता मिळवली आणि विश्वासार्ह सेवा पुनर्स्थापित झाल्याचा दावा केला. २०२२ मधील साउथ वेस्ट संकट हे चुकीच्या व्यवस्थापन पद्धतीने कसे राष्ट्रीय आपत्तीत रूपांतर घेतले, याचे ठळक उदाहरण आहे.

मग इंडिगो संकटाबाबत काय केले पाहिजे? सर्वप्रथम जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. प्रवाशांना जबर त्रास सहन करावा लागला असून त्यांना न्याय मिळायला हवा. प्रवाशांच्या सुरक्षिततेशी तडजोड होईल इतका काळ सुरक्षा नियमांची अंमलबजावणी लांबवल्याबद्दल नागरी विमान वाहतूकमंत्री नायडू यांना पदावरून हटवले पाहिजे. तसेच नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचे सचिवही बदलले पाहिजेत. ही जबाबदारी त्यांची असून त्यांनी ती स्वीकारली पाहिजे.

DGCA चे महासंचालक आणि वरिष्ठ नेतृत्व हटवले पाहिजे. इंडिगोचे CEO पीटर एल्बर्स यांची सेवा समाप्त केली पाहिजे, कारण या कार्यपद्धतीतील अपयशासाठी ते थेट जबाबदार आहेत. इंडिगोशी संबंधित प्राथमिक सर्वांनी माफी मागितली आहे, मात्र मालक राहुल भाटिया यांनी अद्याप माफी मागितलेली नाही, हे आश्चर्यकारक आहे.

DGCA मार्फत औपचारिक चौकशी करण्यात यावी आणि तिचा अहवाल १५ दिवसांत सादर केला जावा. उड्डाणे रद्द झाल्यामुळे बाधित प्रवाशांसाठी भरपाई निधी निर्माण करण्याच्या उद्देशाने इंडिगोवर आर्थिक दंड आकारण्यात यावा. स्पर्धा कायद्याच्या कलम २७ अंतर्गत सरकारला कंपनीच्या मागील तीन वर्षांच्या सरासरी उलाढालीच्या १० टक्क्यांपर्यंत दंड ठोठावण्याचा अधिकार आहे. मक्तेदारीचा गैरवापर रोखण्यासाठी हे सरकारकडे असलेले अत्यंत प्रभावी साधन आहे.

ग्राहक संरक्षण कायद्याच्या कलम १८ (२) अंतर्गत स्वतःहून (suomotu) कारवाई सुरू करून दंड आकारण्यात यावा. इंडिगोचे काही स्लॉट इतर विमान कंपन्यांना वितरित करण्यात यावेत. इंडिगो (इंटरग्लोबएव्हिएशन) यांनी मुख्यत्वे भाजपसह विविध राजकीय पक्षांना निवडणूक बाँड्सद्वारे दिलेल्या ५८ कोटी रुपयांच्या देणग्यांमुळे काही राजकीय - संस्थात्मक संगनमत झाले का, याची चौकशी करण्यासाठी संयुक्त संसदीय समिती (JPC) स्थापन करण्यात यावी. या देणग्यांमुळे इंडिगोला DGCA चे FDTL सुरक्षा नियम पाळण्यास सवलत आली का, नवीन वैमानिकांची भरती पुढे ढकलून नफा वाढवला जात का आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेशी तडजोड झाली का, याचा तपास होणे आवश्यक आहे.

३१ ऑगस्ट २०२२ रोजी तत्कालीन नागरी विमान वाहतूकमंत्री ज्योतिरादित्य शिंदिया यांनी विमान भाड्यावरची मर्यादा काढून टाकली, त्यामुळे विमान कंपन्यांना मनमानी दर आकारण्याची मुभा मिळाली. ओडिशा रेल्वे अपघातानंतर चेन्नई ते भुवनेश्वर तिकिटासाठी काही वेळा १ लाख रुपयांपर्यंत भाडे आकारले गेल्याचे दिसले होते. इंडिगो संकटानंतर सरकारने ६ डिसेंबर रोजी पुन्हा भाडे मर्यादा लागू केली. अनेक विकसनशील देशांमध्ये विमान भाड्यावर मर्यादा आहेत. मात्र नागरी विमान वाहतूकमंत्र्यांनी संसदेत गेल्या आठवड्यात कायम स्वरूपी भाडे मर्यादा शक्य नसल्याचे सांगितले. मक्तेदारीच्या परिस्थितीत भाड्यावर मर्यादा किंवा किमान पट्टा असायलाच हवा. सरकारने भाडे मर्यादा का काढून टाकली आणि कंपन्यांना प्रवाशांची लूट करण्याची मुभा का दिली, याची चौकशी JPC मार्फत झाली पाहिजे.

भारतीय विमान वाहतूक क्षेत्राचे नियमन पूर्णपणे पुनर्रचित करण्याची गरज आहे. यासाठी विद्यमान DGCA बरखास्त करण्यात यावी. ही संस्था विमान कायदा १९३४ अंतर्गत कार्यकारी आदेशाने स्थापन झाली होती. अमेरिकेच्या फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन प्रमाणे संसद कायद्याद्वारे स्वायत्त व स्वतंत्र नागरी विमान वाहतूक प्राधिकरण (CAA) स्थापन करण्यात यावे, अशी प्रस्तावना डिसेंबर २०१२ मध्ये मनमोहन सिंग सरकारने केली होती.

स्पर्धा कायद्याच्या कलम २८ अंतर्गत सरकारला मक्तेदारी मोडण्यासाठी संरचनात्मक उपाय करण्याचा अधिकार आहे. अमेरिकेतील शर्मन ॲंटी - ट्रस्ट कायद्याप्रमाणे इंडिगोचे दोन पूर्णपणे स्वतंत्र विमान कंपन्यांमध्ये विभाजन करण्याचा विचार सरकार करू शकते. त्यामुळे प्रत्येकी सुमारे ३२ टक्के बाजार हिस्सा असलेल्या तीन समान कंपन्या अस्तित्वात येतील. हा इतर उदयोन्मुख मक्तेदारांसाठी एक ठोस इशारा ठरेल.

# दिखाऊ हिंदुत्वाचा खरा चेहरा

काशी हे हिंदू धर्माचे पवित्र केंद्र असून हजारो वर्षांपासून श्रद्धेवर उभे आहे; पण आज 'विकास' आणि 'कॉरिडॉर'च्या नावाखाली चालणाऱ्या बुलडोझर प्रकल्पांमुळे तिचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा धोक्यात आला आहे.

काशी हे केवळ एक शहर नाही, तर ती हिंदू संस्कृतीचा श्वास, अध्यात्माचा गाभा आणि मोक्षाची संकल्पना आहे. 'काशी हि काशी काशी' असे मानणारी ही नगरी हजारो वर्षांपासून अखंड श्रद्धेवर उभी आहे. इतिहासाच्या प्रदीर्घ प्रवासात आक्रमणे झाली, सत्ता बदलली, राजे गेले; पण काशीचा आत्मा टिकून राहिला. कारण तो कोणत्याही राज्यसत्तेच्या कृपेवर नव्हे, तर हिंदूंच्या श्रद्धेवर आधारलेला आहे. काशीचा हा आत्मा बाह्य आक्रमणामुळे नव्हे, तर 'विकास', 'सौंदर्यीकरण' आणि 'कॉरिडॉर' नावाच्या



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



ॲड. श्रीनिवास बिक्कड,
माध्यम समन्वयक
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

आकर्षक शब्दांच्या आडून सरकारकडून सुरू असलेल्या प्रकल्पांमुळे संकटात सापडला आहे. हे प्रकल्प काशीच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक रचनेवर घाव घालत आहेत. श्रद्धा, परंपरा आणि स्मृती उद्ध्वस्त करणारा हा विकास कोणासाठी केला जातोय, असा प्रश्न काशीच्या गल्लीबोळांतून विचारला जातोय.

कॉरिडॉरच्या नावाखाली मंदिरांचा संहार

केंद्रात आणि उत्तर प्रदेशात भाजपचे सरकार आल्यानंतर काशी विश्वनाथ कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरू झाले. त्यात शेकडो लहान - मोठी मंदिरे, पुरातन वास्तू, प्राचीन गल्ल्या प्रशासनाने 'अतिक्रमण' ठरवून तोडली. ती वाचवण्यासाठी साधू, संत, महंत यांच्यासह शंकराचार्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पण त्यांच्या बुलडोझरखाली चिरडून प्रकल्प रेटला. तोडलेली मंदिरे अधिकृत नव्हती; ती काशीच्या धार्मिक रचनेचा अविभाज्य भाग होती. पुराणांमध्ये त्यांचा उल्लेख आहे. शेकडो - हजारो लोकांची उपजीविका यावर अवलंबून होती. काशीची परंपरा ही एकाच भव्य मंदिराभोवती केंद्रित नाही, तर ती असंख्य छोट्या देवालयांमध्ये, गल्लीबोळात आणि घाटांमध्ये विखुरलेली आहे. हा आत्मा समजून न घेता केवळ सिमेंट - काँक्रीटचा भव्य देखावा उभा करणे म्हणजे काशीचे रूप बदलणे नव्हे, तर तिचे अस्तित्वच पुसून टाकणे होय. आता 'कॉरिडॉर - २'च्या नावाखाली पुन्हा एकदा तोच प्रकार सुरू आहे. मंदिरे, मूर्ती, घाट, ऐतिहासिक रचना पुन्हा एकदा बुलडोझरखाली जात आहेत.

### मणिकर्णिका घाट : मोक्षाची आशा की पर्यटन प्रकल्प?

मणिकर्णिका घाट हा हिंदू धर्मातील मोक्ष - संकल्पनेचा केंद्रबिंदू आहे. या घाटावर ज्यांचे अंत्यसंस्कार होतात त्यांची जन्म - मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्तता होते, असे हिंदू धर्मीय मानतात. त्यामुळे देश - विदेशात मृत्यू झालेल्या लाखो हिंदूंच्या इच्छापत्रात 'आपले अंत्यसंस्कार मणिकर्णिका घाटावर व्हावेत', असे लिहिलेले असते. हजारो वर्षांपासून येथे अखंड पेटलेली चिता, तारक मंत्राची परंपरा



पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी जीर्णोद्धार केलेल्या मणिकर्णिका घाट मढी – योगी प्रशासनाने बुलडोझर चालवून पाडली

आणि अंत्यसंस्कारामध्ये डोम समाजाची भूमिका या सगळ्यामुळे मणिकर्णिका घाट अद्वितीय ठरतो. पण मणिकर्णिका घाटावर जीर्णोद्धाराच्या नावाखाली बुलडोझर चालवून विध्वंस सुरू आहे. प्राचीन रचना पाडल्या, शिवलिंगे काढली, मंदिरे तोडली गेली. स्मशानभूमीला पर्यटनस्थळात रूपांतरित करण्याची ही संकल्पना हिंदू तत्त्वज्ञानाच्या विरोधी आहे. मोक्ष ही भावना आहे, ती फोटोसेशन किंवा व्ह्यू - पॉइंटसाठी नसते याचे भान सत्ताधाऱ्यांना राहिले नाही.



### अहिल्यादेवींच्या नावाचा वापर, कार्याचा अपमान

भारतीय इतिहासात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. त्यांनी देशभरात हजारो मंदिरांचा जीर्णोद्धार केला. काशी विश्वनाथ मंदिर मणिकर्णिका घाटाचा जीर्णोद्धारही त्यांनीच केला होता. राज्यकारभारात त्यांनी विध्वंसापेक्षा सन्मान, जीर्णोद्धार आणि पुनर्निर्माणाला महत्त्व दिले. पण अहिल्यादेवींनी जीर्णोद्धार केलेला मणिकर्णिका घाट आज मोदी - योगी सरकारच्या बुलडोझरखाली गेला. इतकेच नव्हे, तर अहिल्यादेवींच्या मूर्तीही तोडल्या गेल्या. हजारो मूर्ती खंडित झाल्या, शेकडो मूर्तींचे भंगार बाजारामध्ये मिळाले. अहिल्यादेवींचे वंशज यशवंतराव होळकर घाटावर जाऊन तुटलेल्या मूर्ती कायद्याने ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत. समाजमाध्यमांत घाटाच्या विध्वंसाचे हजारो - लाखो व्हिडीओ आणि फोटो फिरत आहेत. पण हे सर्व कशासाठी केले जात आहे? तर जी माहिती मिळतेय त्यानुसार सरकारला मणिकर्णिका घाटावर व्यावसायिक कॉरिडॉर बांधायचे आहे. त्यासाठी हिंदू धर्माच्या आध्यात्मिक राजधानीचा विध्वंस सुरू आहे.

भाजप सरकार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे ३०० वे जन्मशताब्दी वर्ष मोठ्या गाजावाजा करून साजरे करत आहे. या निमित्ताने त्यांच्या स्मरणार्थ नाणे जारी करण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर महाराष्ट्रातील भाजप सरकारने शासनाच्या अधिकृत लेटरहेडवरही अहिल्यादेवींचा फोटो छापला आहे. ज्या अहिल्यादेवी होळकरांचे नाव घेऊन भाजप राजकारण करते, त्याच अहिल्यादेवींच्या कार्यावर बुलडोझर चालवून भाजप सरकारने अहिल्यादेवींचा अपमान केला आहे.

### दिखाऊ हिंदुत्व आणि प्रत्यक्ष विध्वंस

स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेणारे नरेंद्र मोदी आणि योगी आदित्यनाथ यांचे सरकार आज हिंदूंच्या आध्यात्मिक राजधानीचा आत्मा नष्ट करत आहे. एकीकडे मंदिर उद्घाटनाचे कार्यक्रम, धार्मिक भाषणे, प्रतीकात्मक पूजा आणि दुसरीकडे प्रत्यक्षात मंदिरे पाडणे, घाट तोडणे, श्रद्धास्थानांचे व्यावसायिकीकरण आणि व्यापारीकरण करणे हा विरोधाभास सर्वांच्या लक्षात येऊ लागला आहे. हिंदू धर्म आणि हिंदुत्व हे भाजपसाठी फक्त राजकीय फायद्याची शिडी आहे. पण हिंदुत्व म्हणजे परंपरेचे रक्षण, श्रद्धेचा सन्मान आणि सांस्कृतिक वारसा जपणे होय. जर विकासाच्या नावाखाली हा धार्मिक वारसा नष्ट होत असेल, तर असा विकास हा हिंदुत्वविरोधीच ठरतो.

### 'पुनर्स्थापना'चा फसवा दावा

काशीमधील विध्वंसावर देशभरातून संताप व्यक्त केल्यानंतर काशीचे प्रशासन तोडलेल्या मूर्ती, अवशेष 'नंतर पुन्हा बसवले जातील' असे सांगत आहे. पण काढले तोडलेल्या, बुलडोझरखाली चिरडलेल्या मूर्ती पुन्हा मूळ स्वरूपात उभ्या राहू शकत नाहीत हे सत्य आहे. त्यामुळे प्रशासनाचा दावा तांत्रिकदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्याही फसवा आहे. जागतिक पातळीवर शहरांकडे पाहिले तर लक्षात येते की, तेथे जुन्या रचनेचे जतन केले जाते. व्हेनिस, रोम, क्योटो, जपान कुठेही ऐतिहासिक वास्तू उद्ध्वस्त करून सौंदर्यीकरण केले जात नाही. मग काशीमध्येच असे का केले जात आहे?

### काशीचा आत्मा विक्रीस काढला जात आहे

आज काशीमध्ये जे घडते आहे, ते केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक - आर्थिक संकटही आहे. छोट्या मंडईसारख्या पारंपरिक बाजारपेठा उद्ध्वस्त केल्या जात आहेत. हजारो कुटुंबांचे रोजगार धोक्यात आले आहेत. पुनर्वसनाच्या कोणत्याही योजना नाहीत. श्रद्धा, रोजगार आणि परंपरा या तिन्ही गोष्टी एकाच वेळी उद्ध्वस्त केल्या जात आहेत. हे सगळे पाहता प्रश्न उभा राहतो, काशी कोणासाठी बदलली जात आहे? काशीवासीयांसाठी की कॉर्पोरेट पर्यटनासाठी? का सरकारच्या मर्जीतील कंत्राटदारांच्या फायद्यासाठी?

### काशी शांत बसणार नाही

काशी नगरी प्रत्येक आक्रमणानंतर उभी राहिली. इतिहास याचा साक्षी आहे. ती आजही उभी राहील. मात्र हा प्रश्न केवळ काशीपुरता मर्यादित नाही तो भारताच्या सांस्कृतिक दिशेचा आहे. काशीचा आत्मा विकाऊ नाही. तो श्रद्धेत आहे. तो कोणत्याही बुलडोझरने पाडता येत नाही, एवढी किमान समज सत्ताधाऱ्यांना लाभावी, हीच अपेक्षा.

# आर्थिक रणनीती व नेतृत्वाच्या कसोटीवर न उतरणारा अर्थसंकल्प



खा. पी. चिदम्बरम,
माजी केंद्रीय अर्थमंत्री

**आज संसदेत अर्थमंत्र्यांच्या भाषणात जे काही ऐकायला मिळाले, त्याने प्रत्येक अर्थसंकल्प - भाष्यकार, लेखक, तसेच अर्थशास्त्राचे विद्यार्थी, यांना नक्कीच धक्का बसला असणार. अर्थसंकल्प हा फक्त वार्षिक महसूल आणि खर्चाचे विवरण सांगणारा अहवाल नसतो. तर अर्थसंकल्पातून सध्याच्या आव्हानांवर एक स्पष्ट दृष्टिकोन मांडायला हवा. काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या सन २०२५ - २६ च्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये ज्या बाबींचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला होता, त्यावर अर्थसंकल्पीय भाषणामध्ये चर्चा करणे गरजेचे होते. यावरून सरकार आणि अर्थमंत्र्यांनी आर्थिक पाहणी अहवाल वाचला आहे की नाही याबद्दल माझ्या मनात शंका उपस्थित होत आहे. मला असे वाटते की त्यांनी सन २०२५ - २६ च्या आर्थिक पाहणी अहवालाला पूर्णपणे बाजूला सारले आहे. त्याऐवजी लोकांवर शब्दांचा मारा करणे आणि भाषण रेटून नेणे हा त्यांचा आवडता छंद त्यांनी जोपासला असल्याचे दिसून येत आहे.**

आर्थिक पाहणी अहवालाच्या माध्यमातून तसेच जाणकार तज्ज्ञांनी अधोरेखित केली आहेत अशा किमान १० आव्हानांचा उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात व्हायला पाहिजे होता हे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. ती आव्हाने खालील प्रमाणे आहेत.

१. अमेरिकेद्वारे लादलेले दंडात्मक शुल्क (Tariffs): त्यामुळे उत्पादक आणि निर्यातदारांवर दबाव निर्माण झाला आहे.

२. व्यापार संघर्ष: प्रदीर्घ काळ सुरू असलेला व्यापारीक संघर्ष, ज्यामुळे गुंतवणुकीवर ओढ निर्माण होऊ शकते.

३. व्यापार तूट: विशेषतः

चीनसोबतची वाढती व्यापार तूट.

४. **भांडवली गुंतवणूक:** सकल स्थिर भांडवल निर्मितीचा भारात खालावलेला भाग (सुमारे ३० टक्के) आणि खाजगी क्षेत्राची गुंतवणूक करण्यामागील अनास्था.

५. **गुंतवणुकीतील अनिश्चितता:** भारतात थेट परकीय गुंतवणुकीच्या (FDI) प्रवाहाबाबत अनिश्चित असलेला दृष्टिकोन आणि गेल्या अनेक महिन्यांपासून परकीय पोर्टफोलिओ गुंतवणुकीचा भारताच्या बाहेर जाणारा ओघ.

६. **राजकोषीय स्थिती :** राजकोषीय ठामेची (Fiscal Consolidation) अपेक्षेपेक्षा मंद गती आणि FRBM कायद्याच्या विरुद्ध सातत्याने उच्च राजकोषीय तूट आणि महसूल तूट.

७. **महागाईचा फरक :** अधिकृतपणे जाहीर केलेली महागाईची आकडेवारी आणि घरगुती खर्च, शिक्षण, आरोग्य आणि वाहतुकीची वास्तविक किंमत यात पडत जाणारा फरक.

८. **सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवरील संकट:** लाखो सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSMEs) बंद होणे आणि उरलेल्या उद्योगांचा अस्तित्वासाठी सुरू असलेला संघर्ष.

९. **बेरोजगारी:** रोजगाराची अस्थिर स्थिती, विशेषतः तरुणांमधील बेरोजगारी.

१०. **खालावलेली शहरी पायाभूत सुविधा:** वाढते शहरीकरण आणि शहरी भागातील खालावलेली पायाभूत सुविधा.

अर्थमंत्र्यांच्या भाषणात यांपैकी कोणत्याही मुद्द्यावर भाष्य करण्यात आलेले नाही. त्यांच्या भाषणाच्या वेळी वाजलेल्या टाळ्या या केवळ औपचारिक होत्या. विशेष म्हणजे त्यावेळी बहुतेक बाकांवर तशा टाळ्या देखील नव्हत्या. अगदी 'संसद टीव्ही'चे प्रसारण देखील अनेक वेळा बंद पडले होते.

आपण जर अकाउंटन्सीच्या निकषावरून पाहिले तर, २०२५-२६ मधील वित्त व्यवस्थापनाचा हा एक अतिशय खराब लेखा - जोखा असे त्याला म्हणता येईल. तपशीलवार पहायचे झाले तर महसूल प्राप्ती ७८,०८६ कोटी रुपयांनी कमी झाली. एकूण खर्च १,००,५०३ कोटी रुपयांनी कमी झाला. भांडवली खर्चामध्ये १,४४,२२५ कोटी रुपयांची कपात करण्यात आली (केंद्र २५,३३५ कोटी आणि राज्य १,१९,०४१ कोटी रुपये). या दयनीय कामगिरीचे स्पष्टीकरण देण्यासाठी अर्थमंत्र्यांनी एक शब्दही खर्च केला नाही. केंद्राचा २०२४-२५ मधील भांडवली खर्च हा GDP च्या ३.२ टक्क्यांवरून कमी होऊन तो २०२५ - २६ मध्ये ३.१ टक्के झाला आहे. दुसरीकडे महसुली खर्चातील कपातीचा फटका सर्वसामान्य लोकांशी संबंधित अशा योजनांना बसला आहे.

सर्वसामान्य लोकांशी संबंधित अशा महत्त्वाच्या क्षेत्रांमधील कपात:

- ग्रामीण विकास: रु. ५३,०६७ कोटी रुपये
- शहरी विकास: रु. ३९,५७३ कोटी रुपये
- सामाजिक कल्याण: रु. ९,९९९ कोटी रुपये
- कृषी : रु.६,९८५ कोटी रुपये
- शिक्षण: रु.६,७०१ कोटी रुपये
- आरोग्य: रु.३,६८६ कोटी रुपये

निर्दयपणे केलेली बाब म्हणजे बहुचर्चित अशा 'जल जीवन मिशन' वरील खर्च ६७,००० कोटी रुपयांवरून कमी करून तो केवळ १७,००० कोटी रुपये करण्यात आला आहे. सन २०२६ - २७ साठी तो वाढवून ६७,६७० कोटी केला असला तरी मागचा अनुभव पाहता, या आकड्यांवर किती विश्वास ठेवावा? असा प्रश्न पडतो.

राजकोषीय तूट आणि कर : राजकोषीय तूट (Fiscal Deficit) ही ४.४ टक्क्यांवरच स्थिर राहिली असून सन २०२६ - २७ मध्ये ती केवळ ०.१ टक्क्याने कमी होईल असा अंदाज आहे. तर महसुली तूट ही १.५ टक्क्यांवर स्थिर राहील असे सांगण्यात आले असले तरी आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने हे समाधानकारक मानले जात नाही.

अर्थसंकल्पीय भाषणावर होत असलेली सर्वात मोठी टीका ही आहे की, अर्थमंत्री या केवळ योजना, कार्यक्रम, मिशन, संस्था आणि निधींची संख्या वाढवताना दिसत आहेत. मी त्यांच्या किमान २४ अशा नव्या घोषणा मोजल्या. उद्देश त्यातील किती पुढच्या वर्षापर्यंत टिकतील याची कल्पना न केलेली बरी.

भाषणातील 'भाग-बी' अर्थात कर प्रस्तावाबद्दल बोलायचे तर, १ एप्रिल २०२६ पासून लागू होणारा आयकर कायदा-२०२६ हा मंजूर झाल्यानंतरच्या काही महिन्यांतच अधिकाऱ्यांनी त्यातील दरांमध्ये किरकोळ बदल केले आहेत. या बदलांची तपासणी करावी लागेल, परंतु हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की बहुसंख्य जनतेचा आयकराशी काहीही संबंध नाही. अप्रत्यक्ष करांच्या बाबतीत बोलायचे झाले तर सर्वसामान्य माणूस केवळ कलम १५९, १६० आणि १६१ मधील तरतुदींशी संबंधित असतो. त्या अंतर्गत देण्यात आलेल्या छोट्या सवलतींचे मी स्वागत करतो.

एकंदर पाहता, अर्थमंत्र्यांचे अर्थसंकल्पीय भाषण आणि अर्थसंकल्प हा अर्थसंकल्पातील आर्थिक रणनीती व आर्थिक नेतृत्वाच्या कसोटीवर उतरत नाही.

# मोदी सरकारच्या अर्थसंकल्पात फक्त मोठे आकडे आणि पोकळ आश्वासने प्रत्यक्षात जनतेच्या हाती तुरी : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई** : केंद्रातील मोदी सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प हा मागील अर्थसंकल्पापेक्षा काहीही वेगळा नाही. हा अर्थसंकल्प कोणत्याही समस्यांचे समाधान करणारा नसून केवळ मोठे आकडे आणि दावे मांडण्यापुरताच मर्यादित आहे. अर्थसंकल्पात आकड्यांची जुमलेबाजी करण्यात आली असून तो पूर्णतः दिशाहीन आहे, अशी तीव्र टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

देशात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीसाठी ठोस धोरण आखण्याची गरज असताना या अर्थसंकल्पात रोजगार निर्मितीसाठी कोणतीही स्पष्ट दिशा दिसत नाही. शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणतीही भरीव तरतूद करण्यात आलेली नाही. आयकर भरणाऱ्या नोकरीपेशा वर्गाला आणि मध्यमवर्गालाही कोणताही दिलासा देण्यात आलेला नाही. जाहीर करण्यात आलेली विकासदराची उद्दिष्टे गाठणेही अशक्यप्राय असून केंद्र सरकारचा हा अर्थसंकल्प केवळ घोषणाबाजीपुरताच मर्यादित आहे, असे सपकाळ म्हणाले.

अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना त्यांनी सांगितले की, नोटबंदी आणि जीएसटीमुळे देशातील लघु, मध्यम आणि छोटे उद्योग अक्षरशः मोडकळीस आले आहेत. या क्षेत्राला अद्यापही उभारी मिळालेली नाही आणि या अर्थसंकल्पातूनही त्यांना कोणताही ठोस आधार मिळालेला नाही. देशात सर्वाधिक रोजगार निर्मिती याच क्षेत्रातून होतेय मात्र सरकारने या वास्तवाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. मोदी सरकारच्या काळात बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली असून त्यांच्या आकडेवारीनुसार दोन पदवीधरांपैकी एक बेरोजगार आहे. भारतीय बेरोजगारीचे प्रमाण ५८ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीच्या बाबतीत मोदी सरकार पूर्णतः अपयशी ठरले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

भारत हा कृषीप्रधान देश असतानाही या अर्थसंकल्पाने शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट गेल्या १२ वर्षांत पूर्ण झालेले नाही. उलट शेतीवरील खर्च दुप्पट झाला आहे. शेतमालाला योग्य दर मिळत नाही. हमीभावाबाबत कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही आणि शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. या गंभीर प्रश्नावर अर्थसंकल्पात कोणतीही ठोस तरतूद नाही. वर्षाला ६ हजार रुपये देऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत, हे सरकारने लक्षात घ्यावे, असे सपकाळ म्हणाले.

सरकार १० वर्षांत २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर येतील असा दावा करत आहे; परंतु प्रत्यक्षात ८० कोटी जनतेला पाच किलो धान्य द्यावे लागत आहे. मग २५ कोटी लोकांची गरिबी कशी संपली, हा मोठा प्रश्न आहे. ही संपूर्ण आकडेमोड फसवणूक करणारी आहे. सोन्याचा दर दोन लाख रुपये तोळा आणि चांदीचा दर चार लाख रुपये किलोपर्यंत पोहोचला असतानाही या किमतींवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारकडे कोणतीही योजना नाही. महागाई आटोक्यात आणण्यासाठीही कोणतेही ठोस धोरण दिसत नाही.

केंद्र सरकार कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहे. कर्ज काढून योजना राबवल्या जात आहेत पण लोकांच्या जीवनमानात यामुळे काही बदल झालेला दिसत नाही.

आज भारतात उत्पन्न आणि संपत्तीची विषमता ऐतिहासिक पातळीवर पोहोचली आहे. देशाच्या उत्पन्नातील जवळपास ५८ टक्के हिस्सा वरच्या १० टक्के लोकांकडे, तर खालच्या ५० टक्क्यांच्या वाट्याला केवळ १५ टक्के उत्पन्न आहे. देशाच्या एकूण संपत्तीपैकी सुमारे ४० टक्के संपत्ती फक्त वरच्या १ टक्क्यांकडे एकवटली आहे. ही केवळ आकडेवारी नसून देशाच्या आर्थिक रचनेतील गंभीर असंतुलन दर्शवणारी स्थिती आहे. ही असमानता दूर करण्याबाबत या अर्थसंकल्पात एक शब्द ही नाही असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले.

# अर्थसंकल्पीय तुटीचे ''स्मार्ट'' व्यवस्थापन कोणाच्या जीवावर ?

अर्थसंकल्प'' या शब्दात 'संकल्प' आहे. म्हणजे तो ठेवलेल्या वित्त अर्थात पूर्णत्वाला नेणे अपेक्षित असते. साहजिकच अर्थसंकल्प मांडून झाल्यावर सान्या चर्चा पुढच्या बारा महिन्यात केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या विविध योजना, तरतुदी यावर झडू लागतात. त्या केल्या देखील पाहिजेत. पण सरकारचे हेतू कसे तपासणार ?

त्यासाठी अर्थसंकल्पीय कागदपत्रामध्ये मागच्या वर्षी मांडलेल्या अर्थसंकल्पातील प्रस्तावांचे आणि तरतुदींचे नक्की काय झाले हे मदत करते. ती मूर्त आणि ठोस असते. संकल्प म्हटले तर अमूर्त असतात. त्यातून राज्यकर्ते पक्ष त्याने केलेले कोणते संकल्प पाहीला नेतो आणि कोणते संकल्प दिरंगाईने टाळतो ते पुढे येते.

त्या प्रकाशात मग आता मांडलेले प्रस्ताव अधिक वस्तुनिष्ठ पणे समजा येऊ शकतात.

काल मांडलेल्या अर्थसंकल्पाकडे येऊया. त्यात मागच्या वर्षी विविध हेतूसाठी, योजनांसाठी केलेल्या तरतुदी पैकी नक्की किती खर्च झाले याची आकडेवारी आहे.

त्यावरून हे दिसते की भांडवल मत्ता प्रकल्पांसाठी केलेल्या तरतुदी (Capital Expenditures) गाठीला नेल्या आहेत आणि अनेक सामाजिक क्षेत्रांसाठी (सोशल सेक्टर), योजनांना मात्र कात्री लावली गेली आहे.

उदा मागच्या वर्षी मांडलेले खर्चांसाठी ११.२ लाख कोटी रुपयांची तरतूद (Budget Estimates) होती त्यापैकी जवळपास ११ लाख कोटी मार्च अखेरीस खर्च होतील. (Revised Estimates)

तर केंद्र सरकारच्या प्रायोजित योजनांसाठी



– संजीव चांदोरकर,

अर्थतज्ञ

(Centrally sponsored schemes) मधून ५.४२ लाख कोटी रुपयांची तरतूद होती (Budget Estimates) त्यावर ४.२ लाख कोटी रुपये खर्च होतील (Revised Estimates).

म्हणजे फक्त एका हेड खाली केंद्र सरकारचे १.२ लाख कोटी रुपये कमी खर्च झाले. (याला बचत म्हणायची का ते मी वाचकांवर सोपवतो). एक नक्की की हे खर्च झाले असते तर अर्थसंकल्पीय तूट जी ४.४ टक्के मान्य केली यासाठी शासनाची घेतली जाते ती कदाचित वाढली असती. तुमची शासनाची better informed करी असून की येथे एकाच योजनेचे उदाहरण पुरेसे आहे. जल जीवन मिशन ही केंद्र सरकार प्रायोजित योजना असून देशातील कुटुंबांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवणे आहे. मागच्या वर्षी या साठी ६७,००० कोटी रुपयांची तरतूद (Budget Estimates) केली होती त्यापैकी फक्त १७,००० कोटी रुपये मार्च अखेरीस खर्च (Revised Estimates) होणार आहेत.

अशा अनेक योजना आहेत. शहर आणि ग्रामीण भागातील गरिबांसाठी घरे, कौशल्य विकास इत्यादी.

आपला मुद्दा लक्षात घ्या. या सर्व सोशल सेक्टर योजनांचे लाभार्थी बॉटम ऑफ पिरॅमिड मधील देशातील कोट्यवधी कुटुंबे असतात. ज्यांच्या नावावर प्रत्येक राज्यकर्ता पक्ष राज्य करत असतो.

तरतुदी तर कागदावर असतात. त्या आपोआप प्रत्यक्षात उतरत नाहीत. त्या उतरवण्यासाठी त्यामागे राजकीय ताकद लावावी लागते. ज्यांच्या कडे ती आहे त्या लॉबीज हे बघतात की तरतुदीप्रमाणे शासन खर्च करेल.

अर्थसंकल्प यामध्ये एक राजकीय विधान असते. आधी प्रस्तावांमध्ये देखील त्याचे प्रतिबिंब पडलेले असते. पण खरा अर्थ कळतो ते मागे वळताना वित्तीय वर्षाच्या आकडेवारी बघून.

तरुणांसाठी:-

मुख्य प्रवाहातील मिडिया वाचा, बघा. पण त्याचे राजकीय अन्वयार्थ लावण्यासाठी वेगळे मित्र विकसित करावे लागेल. ते नसेल तर मुख्य प्रवाहातील प्रवक्ते तुम्हाला दोन्ही डिपवून टाकणारे नक्की. ते केले नाही तर तुमची टीका देखील Rhetoric मध्ये अडकेल. कदाचित ती अडकली आहे. त्यामुळे लोक convinced होत नाहीत.

(२ फेब्रुवारी २०२६)

#UnionBudget2026

# काँग्रेसचा विचार तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी 'प्रतिभा शोध' अभियानात भाग घ्या : हरी शंकर गुप्ता

मुंबई : काँग्रेस पक्ष संघटन मजबूत करण्याच्या अनुषंगाने काँग्रेसचा विचार, इतिहासाची माहिती असणारे, लोकशाही व संविधानवादी लोकांना एक व्यासपीठ देण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्षाने सुरु केला आहे. राज्यातील सर्व स्तरातील लोकांना यात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न असून त्यासाठी प्रतिभा शोध अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन दिल्लीचे माजी आमदार व या अभियानाचे महाराष्ट्र प्रभारी हरी शंकर गुप्ता यांनी केले आहे.




प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत प्रतिभा शोध अभियानाची माहिती देताना हरी शंकर गुप्ता पुढे म्हणाले की, जिल्हा जिल्ह्यात विविध विषयाचे उत्तम ज्ञान असलेले अनेक लोक आहेत, त्यांना काँग्रेस पक्षाशी जोडण्यासाठी हे अभियान हाती घेण्यात आले आहे. यात निवड झालेल्यांना संशोधन विश्लेषक, प्रवक्ते तसेच काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागात काम करण्याची संधी देण्यात येईल. तीन टप्प्यात हा कार्यक्रम होणार असून या अभियानासाठी १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज दाखल करायचे आहेत, त्यानंतर त्या अर्जांची छाननी केली जाईल. काँग्रेसचे वरिष्ठ नेते, पत्रकार, इतिहास तज्ञ यांच्यासह विविध क्षेत्रातील तज्ञांची समिती छाननी झालेल्यांची मुलाखत घेतील व त्यातून अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अंतिम निवड करेल. देशभरात हे अभियान सुरु असून उत्तर प्रदेशातून ५५० जणांनी यासाठी नाव नोंदणी केली आहे तर जम्मू काश्मीर मधून १०० लोकांनी नोंदणी केली आहे. झारखंड, ओडीशा या राज्यातूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे, असेही हरी शंकर गुप्ता म्हणाले.




यावेळी प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, मुंबई काँग्रेसचे प्रवक्ते सुरेश राजहंस उपस्थित होते.

यावेळी वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले की, राजकारणात येण्याची अनेकांची इच्छा असते पण मार्ग नसतो, समाजातील अतिसामान्य लोकांच्या प्रतिभेला चालना देण्याचा काँग्रेस पक्ष प्रयत्न करत आहे. हा एक पारदर्शक कार्यक्रम आहे. लवकरच राज्याच्या सहाही भागात पत्रकार परिषद घेऊन या कार्यक्रमाची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न आहे.

आर्थिक सर्वेक्षणावर विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना अतुल लोंढे म्हणाले की, देशाची अर्थव्यवस्था डबघाईला गेली आहे हे आम्ही सातत्याने सांगत आहोत, तेच या आर्थिक सर्वेक्षणात मांडले आहे. मेक इन इंडिया अपयशी झाले आहे, आयात वाढली आहे. केंद्रापेक्षा राज्य सरकारांनी जास्त कर्ज काढल्याचे दिसत असून हे कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागत आहे. विकास योजनांचा खर्च कमी करावा लागत आहे असे अतुल लोंढे म्हणाले.

या पत्रकार परिषदेला मुंबई काँग्रेसचे प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस उपस्थित होते.

# मोदी सरकार व कॉर्पोरेट भांडवलदारांचे षडयंत्र!

## विदेशी भांडवलदारांना आर्थिक क्षेत्र हवाली करून टाकणे हा भारतीय सार्वभौमत्वावर हल्ला!



– विश्वास उटगी,
अध्यक्ष, असंघटित विभाग,
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बँक राष्ट्रीयीकरण करण्याचा वटहुकूम १९ जुलै १९६९ रोजी काढला व कायद्यामध्ये कार्यान्वित १९७० मध्ये झाले. Rs. ५० कोटी हून अधिक ठेवी असणाऱ्या १४ खाजगी बँका केंद्र सरकारने राष्ट्रीयमालकीच्या झाल्या हे जाहीर केले. १९८० मध्ये पुन्हा सत्ता मिळाल्यावर इंदिरा गांधी वटहुकूम काढून सहा खाजगी बँकांचे बँका देशाच्या मालकीच्या केल्या.

एकूण बँकींग व्यवसायाच्या ९४ टक्के व्यवसाय या वीस बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर भारत सरकारचा अंगिकृत व्यवसाय झाला, असे म्हणता येईल. हे देश हिताचे झाले।

१९७० व १९८०च्या संसदेने मंजूर केलेल्या कायद्यानुसार बँका जनतेच्या मालकीच्या आहेत व संसदेने मंजूर केलेल्या धोरणा नुसार बँकींग नियामक (Regulator) रिझर्व्ह बँक यांची जबाबदारी अधोरेखित केली आहे.

बँकांमध्ये एकूण जमा ठेवींमधील ४० टक्के ठेवी अग्रक्रमाने दिली जाणारे कर्ज (Priority Sector Lending) हे बँक राष्ट्रीयीकरणाचे वैशिष्ट्य आहेत.

संविधानात SC/ ST करिता रिझर्व्हेशन चे महत्व सामाजिक व आर्थिकदृष्ट्या समतुल्य वातावरण संधी उपलब्ध करून देण्यासाठी आहे तसेच बँका राष्ट्रीयकरण झाल्या नंतर जनतेच्या बँक ठेवींचा वापर शेती व उद्योग व्यवसाय करणाऱ्या घटकांना अग्रक्रम ओळखून पतपुरवठा करणे हे क्रांतिकारी धोरण आहे व राष्ट्रीयकृत बँक व्यवसायाचे ते व्यावसायिक लक्षण आहे.!

समाजाच्या फार मोठ्या उत्पादक समुदायाला पतपुरवठा जाणीव पूर्वक उपलब्ध केला नाही तर समाजाचे आर्थिक मागास पण दूर कसे होणार? हे केंद्र सरकार धोरणाने रिझर्व्ह बँकेने Directed credit करण्यासाठी व कुणाच्या हितासाठी याची धोरण निश्चिती केली। देशातील हरीत क्रांती व श्वेत क्रांती यामुळे यशस्वी झाली। रिझर्व्ह बँकेने आपल्या बँकींग व्यवस्थेत सर्वच निर्णय करण्यासाठी, तसेच जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी अनेक उपाययोजना नियमबद्ध करण्यात आल्या।

बँकांच्या ठेवींपैकी २१ टक्के (Statutory Liquidator Ratio) म्हणजे रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करण्यात येतील ४ टक्के ठेवी (Cash Reserve Ratio) करिता रिझर्व्ह बँकेच्या खात्यात जमा करण्यात येतील।

या मुळे बँकांना सर्वच लाभ झाले व बँकांतून जमा होणाऱ्या ठेवींचा ओघ वाढला व साहजिकच देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्यास योगदान देणारे शेती व उद्योग तसेच सेवा क्षेत्रातील शासकीय व खाजगी व्यवस्थेला देशांत मोठ्या पतपुरवठा उपलब्ध झाला.

पंचवार्षिक योजनांमधून भारताला मिळालेल्या हरीत क्रांती व श्वेत क्रांतीच्या सर्व कार्यक्रमाला बँकांनी मोठा हातभार लावला सहकारी क्षेत्राला व स्वयंम रोजगाराला तसेच लघु उत्पादन व्यवस्थेला उत्तेजन मिळाले.

बँक राष्ट्रीयीकरण या सामाजिक उद्दिष्टाने केले यामुळे विकासाच्या वाटा गाव खेडे ते शहर असा नियोजन बद्ध आर्थिक विकास या धोरणावर अंमलात गेला.

२०१४-२०१५ या काळात नियोजन आयोग (Planning Commission) रद्द करण्यात येऊन नीति आयोग हा काही प्रशासन अधिकारी पद स्थापन केला गेला. त्यावरून काही मूठभर कॉरपोरेट कंपनींच्या हितासाठी देशाची संपत्ती वापरता येईल हे नीति आयोगाचे सकल्प पाहिल्यास स्पष्ट होते।

### उदारीकरणाचा कालखंड

१९६९ ते १९९१ हा एक टप्पा बँक राष्ट्रीयीकृत व्यवसाय वाढले पण बरोबर भांडवल पुरवठा करिता सरकार काम करते हे महत्त्वाचे होते।

१९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्था उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. नाही तर आंतरराष्ट्रीय भारताची कोंडी झाली असती.

यांचा बँकींग व्यवस्थेतील परिणाम समजून घ्यायचा। Switzerland मध्ये BASEL हे एक RHINE नदी जवळ एक निसर्गरम्य ठिकाण आहे! आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रत्येक देशांतील सेंट्रल बँक म्हणजेच आपल्या रिझर्व्ह बँक सारख्या सर्व देशातील मध्यवर्ती बँकेच्या प्रमुखांच्या बैठका दरवर्षी होतात. बँकींग व्यवस्थेत सर्वच व सुरक्षितता तसेच भांडवलाचे प्रमाण, कर्ज व गुंतवणूक या विषयी नियम करून सर्व सदस्य देशांना ही "बेसल नियमावली" बंधनकारक करण्याचा निर्णय १९८९ पासून सुरुवात झाली. 'Basel Norms' असे त्याचे नामकरण झाले.

१९९१ मध्ये भारत सरकारने जागतिकीकरणाची धोरण स्वीकारले. पण

मुख्यत: सर्व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग व सेवा क्षेत्र यात उदारीकरणाचे धोरण टप्पा टप्प्याने अंमलात आणणे हा निर्णय केला. या धोरण खाजगीकरण कुठे असावे व कुठे नसावे या विषयावर धोरण निश्चित केले. ।

उदारीकरण काळातील काही प्रश्न?

सध्याच्या काळातील सर्व मोठ्या दिलेल्या कर्जांची वसुली हा महत्त्वाचा मुद्दा बँकांना भेडसावतो. मागील दोन दशकात मोठ्या कॉर्पोरेट उद्योग घरी घराण्यांनी हजारो कोटींची कर्जे थकविली. परिणामी ती वसूल न झाल्यामुळे बँकांच्या ताळेबंदावर विपरीत परिणाम दिसू लागले. सरकारी बँकांची कर्जे वसूल झाली नाहीत तर आंतरराष्ट्रीय नियमांनुसार थकीत कर्जे वाटपाच्या १२ टक्के भांडवल असले पाहिजे. भांडवल निधी उपलब्ध करणे यासाठी केंद्र सरकारला बजेट मध्ये यासाठी दरवर्षी हजारो कोटींची रक्कम तरतूद करावी लागते व करदात्यांचा पैसा तोट्यातील सरकारी बँकांवर का खर्च करावा यासाठीच बँक खाजगीकरणाचे पुरस्कर्ते प्रश्न उठवू लागले. हा राजकीय प्रश्न देखील बनतो।

पण प्रत्यक्षात काय होत आहे ? मागील काही वर्षांत रु १६ लाख कोटी थकीत कर्जे बुडवली गेली व त्याच्या वसुलीचे प्रयत्न करून मग राईट ऑफ करण्याऐवजी रिझर्व्ह बँकेच्या नवीन धोरणा नुसार २०१५ पासून बँकांच्या संचालक मंडळात ही थकीत कर्जे राईट ऑफ करणे असे हजारो प्रस्ताव आले व मंजूर झाले.

मोठ्या प्रमाणात राईट ऑफ झालेली प्रकरणे बहुत उद्योजकांची आहेत. ही मंडळी सत्ताधारी वर्ग व पक्ष यांचे तारणहार आहेत. !

यांची नांवे विजय माल्ल्यापासून नीरव मोदी ही आता जनतेला माहीत आहेत. पण मोठी उद्योग घराणी यांना याचा फायदा झाला।

पण राईट ऑफ झालेल्या कर्जांमुळे बँकांच्या ताळेबंदातून ही बुडीत रक्कम नाहीशी होते. राष्ट्रीयकृत बँकांच्या पैशाच्या सुरक्षिततेमुळे अर्थमंत्र्यांनी आपल्या लाखो कोटी रुपयांची घोषणा केली आहे. मोठ्यां कंपन्यांची मोठी कर्जे राईट ऑफ केल्याच्या मार्गाने सन २००८ ची शेतकऱ्यांची कर्जे माफ करणे हा एकमेव मोठा निर्णय डॉ मनमोहन सिंग सरकारने केला.

या कर्ज माफीमुळे राष्ट्रीयकृत बँकांना केंद्र सरकारने ७३ हजार कोटी निधी दिला. यात बँकांची वसुली झाली. पण पुन्हा असा की रु १६ लाख कोटी बुडीत कर्जे बँकांनी वसूल न करता राईट ऑफ केली यात बँक ठेवीदारांचे व देशातील जनतेचे प्रचंड नुकसान आहे या बद्दल कुणी बोलणार नाही ?

ताळेबंदातून ही मोठी कर्जे एक धोरण म्हणून राईट ऑफ केली असे चित्र आहे. बँकांना या करिता प्रचंड तरतुदी कराव्या लागतात हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. जनतेच्या ठेवीतूनच ही बँकांच्या ताळेबंदात ही तरतूद PROVISION झाली आहे ।

बँकांचे ताळेबंद असा SCAM पध्दतीने स्वच्छ करणे हे धोरण मोठ्या भांडवलदारांना अनुकूल पाहिजे करण्यासाठी आहे. हा एक मिलीभगतचा भाग आहे (BANKER BORROWER NEXUS). एक राजकीय निर्णय, अर्थ कारणांचा कसा बेजबाबदार उद्दाम अंमलात येतो याचे हे उदाहरण आहे।

२०१६ ते २०२५ या काळात रु १६ लाख कोटी राईट ऑफ झाल्यानंतर २०२४ ते आता पर्यंत नव्याने सुमारे १० लाख कोटी थकीत कर्जे रिझर्व्ह बँक अहवालात दिसत आहे ! हे कुणाचे पाप? हेच निष्कर्षी उद्योगपतीत व सरकारी कायदा किंवा इन्सॉल्व्हन्सी बँकींग कोड या माध्यमातून बहुत कंपन्या बँकांना पुन्हा लावून, मुख्यत: बाहेर पडून नवीन धंदा करण्यासाठी याच बँकांकडून कर्जे पुनर्गठनाकरीता नवीन कर्ज उभारत होता. बँकांच्या एकूण कर्ज वसुली त ८५ टक्के "हेअर कट" घेऊन कायदेशीर प्रक्रियेत बँकांना तोटा व कॉर्पोरेट या कायदा करणारे किंवा मुक्त (Exit path) करणारे हजारो प्रकार व प्रकरणे २०१६ ते २०२४ या काळात झाले आहेत.

आता बँका प्रचंड नफ्यात आहेत याचे कारण लाखो कोटी रुपयांची तरतूद सर्व बुडीत कर्जे राईट ऑफ केलेली असल्याने ताळेबंद स्वच्छ झाले. तरतुदीचा पैसा भांडवल निर्मितीत वापरला जातो. त्याचप्रमाणे सर्व बँका १० ते १५ टक्के ठेव वृद्धी साध्य केल्यात व दोन अंकी कर्ज वृद्धी आहेत. पण सामान्य शेतकरी व छोटे उद्योगांना विशेष मदत केली नाही तर ते कर्ज विळख्यातून बाहेर कसे ? मोदी सरकार व बँका हे करीत नाहीत।

कर्जांवरील वाढते व्याजदर व ठेवी वरील कमी व्याज दर यातील फरक बँकांच्या नेट इंटरेस्ट मार्जिन वाढविण्यासाठी उपयोग होतो. मुख्यत्वेकरून खातेदारांना अधिकाधिक डिजिटल बँकिंग करणे बँकांचे व्यवहार वाढवून आणणे हे धोरण बनले. सेवा खर्च वेळेत सवलती सह ग्राहक सेवा शुल्क वाढवून बँक उत्पन्न वाढीसाठी ठेवीदारांच्या वेठीस धरण्यात येत आहे.

जनतेच्या ठेवींमध्ये संघटित व असंघटित कामगार वर्ग व मध्यमवर्गीय जनतेचा मोठा हिस्सा आहे ! पण ? बँकांचे राष्ट्रीयीकरण असा निर्णय खिळखिळा असलेल्या आणण्यात मोदी सरकारने भांडवलशाहीतील सर्व नवीन कायदे, रिझर्व्ह बँक, सेबी, कंपनी कायदा, इन्कम टॅक्स कायदा, चार्टर्ड अकाउंटंट व cost अकाउंट यांच्या संस्था वापरल्या. सरकारी आदेशानुसार आपल्या स्वतंत्र व स्वायत्त धोरण बाबतची विश्वासार्हता गमावली सरकार समोर नतमस्तक झाल्या ! बँक राष्ट्रीयीकरण रद्द करण्याच्या हालचाली मोदी सरकारने सुरू केल्या। बँक राष्ट्रीयीकरण रद्द करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. या २०१४ नंतरी.

२०१६ मध्ये डॉक्टर पुणे येथील नॅशनल इन्स्टिट्यूट बँक मॅनेजमेंट यांच्या परिषद पंतप्रधान देशाचे पंतप्रधान, अर्थमंत्री, सर्व नियामक संस्था (रिझर्व्ह बँक, सेबी, IRDA BSE, NSE, इत्यादि) यांचे प्रमुख, सरकारी बँकांचे चेअरमन व खाजगी बँकांचे चेअरमन व अर्थात केंद्रीय अर्थखात्याचा हालचाली पाहणारे अर्थ सचिव हेमुख्य अधिकारी सहित संपूर्ण नोकरशाही यांचे संमेलन झाले.

बँकींग व वित्त क्षेत्रात जागतिक बँक,

यांचे मिश्र व आंतरराष्ट्रीय बँकींग धोरण ठरविणारे केवळ नियम अंमलात आणणे. बँकांची सुधारणा (Reform) या संज्ञेखाली बँकांची मालकी केंद्र सरकार कडून कशा पध्दतीने २६ टक्के पर्यंत खाली आणणे व बँका व विमा व्यवसायाचे खाजगीकरण करणे हा अजेंडा निश्चित झाला.

मोदी सरकारने त्याला "ज्ञान संगम" असे नांव देऊन एक खास सल्ला कार्यक्रम जाहीर केला त्याला "इंद्र धनुष्य" असे नामकरण केले.

हा मोदी सरकारचा हा "ज्ञानसंगम कार्यक्रम "अंतर्गत"इंद्र धनुष्य हा बँक सुधारणा कार्यक्रम" वस्तुत: बँक राष्ट्रीयीकरणाची उद्दिष्टे बदलून जनतेचा पैसा काही मुठभर कॉरपोरेट घराण्यांना उपलब्ध करणे व सरकारची मालकी संपविणे या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे यासाठी आहे!

मागील १० वर्षात हेच घडले आहे. भारत सरकार रिझर्व्ह बँक, सेबी व विमा कंपनीना या करिता कार्यान्वित करण्यात आले आहे. खाजगीकरण सुलभ करणे याकरिता केंद्र सरकार विविध नोटीफिकेशन काढतात.

२०१४ नंतर विलिनीकरणाच्या प्रक्रियेत स्टेट बँकेकडे त्यांच्या सर्व सहयोगी बँका विलीन करण्यात आल्या. युनायटेड बँक ऑफ इंडिया आणि ओरिएंटल बँक ऑफ इंडिया या दोन राष्ट्रीयकृत झालेल्या बँका पंजाब नॅशनल बँकेत विलीन करण्यात आल्या.

सिंडिकेट बँक, कॅनरा बँकेत विलिन झाली तर दक्षिणेकडील विजया बँक मुंबईतील देना बँक, बँक ऑफ बडोदा बँकेत विलीन झाल्या.

आंध्र बँक व कॉरपोरेशन बँक या दोन बँका युनियन बँक ऑफइंडिया मध्ये विलीन झाल्या.

याचा अर्थ आयडीबीआय IDBI व्यतिरिक्त भारत सरकारच्या १२ बँका आहेत। आता २०२६ मध्ये या पूर्ण प्रक्रियेला गती दिली जात आहे १२ बँकांचे परिवर्तन चार मोठ्या बँकात करणे हा एक अजेंडा व IDBI बँक विकणे हा दुसरा अजेंडा स्पष्ट दिसतो।

याचे भवितव्य काय हा काळीचा सवाल आहे? काय घडणार आहे ते लक्षात घ्या। जपान ची एक बँक सुमिटोमो मित्सुबिशी हे त्यांचे नांव. येस बँकेतील स्टेट बँक व अन्य आठ खाजगी बँकांच्या मालकी एकूण हिस्सा जवळजवळ २० टक्के सुमिटोमो ने SEBI च्या व RBI च्या मदतीने हस्तगत केली. अजून १० हजार कोटी टाकून शेअर बाजारातील येस बँक चे शेअर घेतले की येस बँक संचालक मंडळ स्टेट बँकेकडून आपल्या ताब्यात घेईल.

रिझर्व्ह बँक आता नियम यासाठी मुठमुठीत कसे होईल हे बघत आहे. हे ठेक औचर रिझर्व्ह बँक व भारत सरकार यांच्या मदतीने नियम शिथिल करून "नियमात बसविले" जाईल कारण यामागे कोण आहेत हे महत्त्वाचे आहे!

विदेशी कंपनी व भारत बीओबीआय वर ताबा मिळवला आहे तसा बँकांवर ताबा मिळविण्यासाठी नियम वाकवले जात राजकीय शक्ती काम करीत आहेत. दीप पहुन वाटेवर ते डिसेंबर २०२५, या काळात केंद्र सरकारने निर्णय केलेली IDBI बँक एमिरेटस नॅशनल बँक ऑफ दुबई NBD कडे हस्तांतरित होणार हा धोका दिसतो. संसदेला अंधारात ठेवून देशाची एक महत्त्वाची सार्वजनिक क्षेत्रातील बँक संपविणे हे कारस्थान बँक राष्ट्रीयीकरण संपविण्यात आहे काय? विदेशी भांडवल विरोध करून बँकींग क्षेत्रात धोकादायक मानले जाते. देशाच्या भारताच पैसा च्या संदर्भात हे विचार आहे। पैसाकेंद्र हातात असणारे लोक आता भारतीय अर्थव्यवस्था हाताळणार आहेत.

केवळ कुणासाठी या देशात काम करतो व कुणाचे हितसंबंध जोपासले जात याकडे भारतीय नागरिकांच देशहिताच्या दृष्टीने लक्ष दिले पाहिजे।

बँक राष्ट्रीयीकरण जतन करणं हे आपले कर्तव्य आहे. पण राष्ट्रीय करण विरोधी शक्ती आता जोमात काम करीत आहेत. त्यांना रोखणे यांची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.

राष्ट्रीयीकरणातून - विदेशी हस्तांतरणा :

भारतीय बँकिंगचे उघड उघड खाजगीकरण काम करीत आहे?

भारतीय बँकिंग व्यवस्थेवर आक्रमकपणे एक नवे संकट घडत आहे - परकीय सरकारांच्या नियंत्रणाखाली भारतीय बँका देण्याचे। भारतातील बँकींग व्यवस्थेतील राष्ट्रीयकृत सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी क्षेत्रातील बँका, रिजनल रूरल बँका व सहकारी क्षेत्रातील बँकांतील हिस्से बदल देश हिताचे आहेत.

केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँक यांच्या धोरणामुळे भारतीय बँकिंग व्यवस्था हळूहळू केवळ परकीय भांडवल नाही तर परकीय सरकारांच्या ही प्रभावाखाली जात आहे।

नोव्हेंबर २०२० - तमिळनाडूतील लक्ष्मी विलास बँक एक खाजगी बँक. थेट सिंगापूरच्या डेव्हलपमेंट बँक ऑफ सिंगापूर (DBS) बँकेत विलीन. भागधारकांना बाहेरच्या आत. कर्मचारी कंत्राटदार बनले. पैसा व्यवस्था संपुष्टात आली!

कॅथोलिक सिरियन बँक - कॅनडास्थित Fairfax गुपच्या ताब्यात. आणि सर्वात मोठा धक्का - YES बँक प्रकरण.

केंद्र सरकारने स्टेट बँक ऑफ इंडिया च्या मदतीने YES बँक वाचवली; पण मे २०२५ च्या महिन्यात जपानच्या SMBC (सुमिटोमो मित्सुबिशी बँकींग कार्पोरेशन) बँकेने २४.२ टक्के हिस्सा घेतला. भारतीय करदात्यांनी वाचवलेली YES बँक शेवटी परकीय नियंत्रणाच्या दिशेने वाटचाल करीत आहे आता SMBC बँक ५१ टक्के मालकी हिस्सा ताब्यात घेणार आहे त्या करिता बाजारातून ३०००० कोटींचे शेअर्स घेतले जातील. RBI व SEBI यांचा पाठिंबा आहे पण नियम बाह्य व्यवहार मात्र लपत आहेत!

ही काही अगमाती प्रकरणे आहेत. हा एक नवा धोकादायक मार्ग आहे - भारतीय बँकांच्या दारात परकीय अर्थशक्तीला थेट प्रवेश देण्याचा।

आता RBL बँक : थेट दुबई सरकारचा ६० टक्के हिस्सा? ८१ वर्षांचे रत्नाकर बँक लिमिटेड कोल्हापूर आताची RBL बँक - रु. २.०७ लाख कोटींचा व्यवसाय,

५,२०० शाखा, ११०+BC केंद्रे, कोणताही प्रमोटर नाही, कोणतीही खराब आर्थिक स्थिती नाही, सार्वजनिक गुंतवणूकदारांची बँक.

पण आता दुबई सरकारच्या मालकीची Emirates NBD (एमिरेटस नॅशनल बँक ऑफ दुबई) बँक ने RBL मधील ६० टक्के इक्विटी हिस्सा घेतला.

१२ डिसेंबर २०२५ रोजी कोल्हापूर येथे भागधारकांच्या सभेत हा ठराव मंजूर झाला. हे RBI व सरकारच्या मान्यते शिवाय शक्य आहे? ही फक्त विदेशी बँकेची गुंतवणूक नाही. ही नियंत्रण हस्तांतरणाची प्रक्रिया आहे! विदेशी बँकेकडे मतदान हक्क २६ टक्केच ठेवण्याचा नियम असला तरी, भोगमान हुशारीने बदल करून व्यवस्थापन, कर्ज धोरण, डेटा नियंत्रण परकीय हाती देणे काही अवघड नाही!

हा Foreign Direct Investment प्रकार नाही - हा आर्थिक सार्वभौमत्वाचा हस्तांतर करार आहे. आज RBL, उद्या दुसरी बँक आणि मग? भारतीय जनता खातेदार, पण निर्णय दुबई किंवा टोकियोतून?

म्हणून ऐका! पुढील धोका! देशाच्या संसदेत व न्यायालयात IDBI बँक विक्री विरोधात आवाज उठायला हवा! मुंबई उच्च न्यायालयात 6 FEBRUARY 2026 रोजी IDBI बँक विक्री विरोधात ऑल इंडिया बँक ऑफिसर्स असोसिएशन (AIBOA) व विश्वास उटगी अध्यक्ष, अर्थशास्त्र विभाग MPCC यांचा रिट अर्ज सुनावणी करिता येत आहे!

या रिटचा गोषवारा या लेखात देणे आवश्यक आहे असे मला वाटते, तो पुढील प्रमाणे : ऑल इंडिया बँक ऑफिसर्स असोसिएशन व श्री. विश्वास उटगी एक अनुभवी बँकर आणि आयडीबीआय बँकेचे भागधारक यांनी मुंबईत मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. (L) 2048 of 2026 दाखल केली आहे.

सदर रिट याचिकेमध्ये पुढील तथ्ये मांडण्यात आली आहेत :

१. १९६४ साली संसदेने Industrial Development Bank of India Act हा कायदा संमत केला आणि त्यानुसार Industrial Development Bank of India ही विकास वित्तीय संस्था (Development Financial Institution) अस्तित्वात आली.

२. २००३ साली संसदेने Industrial Development Bank (Transfer of Undertaking and Repeal) Act, 2003 २००३ हा कायदा संमत केला. त्या वेळी भारत सरकारने, विशेषतः भारत सरकारचे बहुसंख्य शेअरहोल्डिंग या मुद्द्यावर संसदेत चर्चा व मतदान टाळण्यासाठी, संसदेला काही आश्वासने व वचने दिली.

केंद्र सरकारची ही वचने व आश्वासने संसदीय चर्चांमध्ये नोंदवलेली व वस्तुनिष्ठपणे नोंदवलेली आहेत.

या आश्वासनांच्या आधारे संबंधित मुद्द्यांवर पुढील चर्चा व मतदान झाले नाही आणि परिणामी २००३ चा रद्द कायदा (Repeal Act) मंजूर झाला.

३. दिनांक २७.०९.२००४ रोजी, वरील रद्द कायदा Repeal Act 2003 च्या आधारे IDBI Bank Ltd.ची कंपनी कायद्यानुसार स्थापना करण्यात आली.

स्थापनेच्या वेळी भारत सरकारकडे ५०,००० इक्विटी शेअर्स होते, तर LIC कडे फक्त १ इक्विटी शेअर होता, हे येथे नमूद करणे महत्त्वाचे आहे.

४. दिनांक ०७.११.२०१८ रोजी IDBI Bank Ltd. ने ठराव मंजूर करून आपल्या Articles of Association मधील शेअर कॅपिटल संदर्भातील पुढील तरतूद हटवली -

"केंद्र सरकार, कंपनीचा शेअरहोल्डर म्हणून, कंपनीच्या जारी भांडवलातील किमान ५१ टक्के हिस्सा कायमस्वरूपी राखून ठेवेल."

हा बदल RBI च्या २१.०१.२०१९ पासून लागू झालेल्या निर्देशानुसार LIC कडून ५१ टक्के हिस्सा संपादन करण्यासाठी करण्यात आला. हे विशेष लक्षात घेण्यासारखे आहे की २०१८/२०१९ मध्ये हा ठराव मंजूर होताना LIC कडे केवळ १ इक्विटी शेअर होता.

वरील तथ्यांमधून पुढील कायदेशीर प्रश्न उपस्थित होतात :

I. २००३ चा रद्द कायदा संमत करताना संसदेत चर्चा व मतदान टाळण्यासाठी सरकारने संसदेला आश्वासन व वचन दिले होते काय?

II. संसदेला दिलेले वचन व आश्वासन सरकार कार्यकारी कृतींद्वारे किंवा अन्य मार्गाने मोडू शकते काय?

III. संसदेला दिलेल्या वचनांपासून कोणताही बदल किंवा विचलन करायचा असल्यास, सरकारवर संसदेकडे जाऊन पुन्हा चर्चा व मतदान करून घेण्याची जबाबदारी आहे काय?

IV. संसदेला वचन देऊन नंतर ते मोडणे हे भारतीय संविधानाच्या उद्देशांना व तत्त्वांना - विशेषतः संविधानाच्या प्रस्तावनेतील "लोकशाही" व "प्रजासत्ताक" या शब्दांच्या अर्थाला - धक्का देणारे कृत्य ठरते काय?

V. सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांच्या निर्गुंतवणुकीच्या (disinvestment) संदर्भात, संविधानाच्या प्रस्तावनेतील "समाजवादी" या तत्त्वांपासून सरकार विचलित होऊ शकते काय?

VI. २७.०९.२००४ रोजी IDBI Ltd च्या स्थापनेवेळी असलेल्या मूळ ID मध्ये, संसदेला दिलेल्या वचनांशी सुसंगत अशी, केंद्र सरकार किमान ५१ टक्के शेअरहोल्डिंग कायम ठेवेल अशी तरतूद होती काय?

VII. दिनांक ०७.११.२०१८ रोजी पोस्टल बॅलेटद्वारे मंजूर केलेल्या ठरावाद्वारे वरील ५१ टक्के शेअरहोल्डिंगची तरतूद हटवणे, हे संसदेला दिलेल्या वचनांचे उल्लंघन ठरते काय?


२८ जानेवारी २०२६ पासून सुरू होणाऱ्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात, सदर याचिकेमध्ये उपस्थित केलेले मुद्दे संसदेत मांडावेत, हे अपेक्षा व्यक्त करावीच लागेल.

# हा तर भ्रष्टाचाराचा एक्सप्रेसवे !

मुंबई : मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवरील आडोशी बोगद्याजवळ गॅस टँकर उलटून तब्बल ३० तास वाहतूक ठप्प राहिली. या कोंडीमुळे विशेषतः महिला, लहान मुले, वृद्ध आणि रुग्णांचे हाल झाले. धक्कादायक बाब म्हणजे घटनेला पाच दिवस उलटूनही वाहतूक अद्याप पूर्णपणे सुरळीत झालेली नाही.

या घटनेतून एक्सप्रेसवेवरील आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणेचे पूर्ण अपयश समोर आले असून, अशा प्रसंगी जबाबदारी नेमकी राज्य सरकारची की, टोल कंपनीची, हे स्पष्ट व्हायला हवे, अशी ठाम मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ प्रवक्ते व माजी आमदार अनंत गाडगीळ यांनी केली आहे.

एक्सप्रेसवेवर नियमित प्रवास करणारे आणि सुमारे वीस वर्षांपूर्वी याच महामार्गावरील एका भीषण अपघातातून चमत्कारिकरित्या बचावलेले गाडगीळ यांनी, प्रसिद्ध केलेल्या पत्रकात, एक्सप्रेसवेवरील अंदाधुंदी, निष्काळजीपणा आणि व्यवस्थेच्या कोलमडलेल्या स्थितीवर सडकून टीका केली आहे.



– अनंत गाडगीळ,
ज्येष्ठ प्रवक्ते व माजी आमदार

गाडगीळ यांनी उपस्थित केलेले गंभीर मुद्दे :

१) अवजड वाहनांचा बिनधास्त वावर

नियमानुसार ट्रक व टँकरसारख्या अवजड वाहनांना उजव्या व मधल्या लेनमधून प्रवासास मनाई असतानाही, हीच वाहने सर्रास या लेन अडवून चालतात. परिणामी, वेगात असलेल्या मोटारींचे भीषण अपघात सातत्याने घडत आहेत. या वाहनांना रोखण्यासाठी एकही वाहतूक पोलीस पुढे येत नसल्याने दररोज वाहतूक कोंडी हेच वास्तव बनले आहे.

२) वेगमर्यादेतील गोंधळ आणि दंडाच्या सापळा

एक्सप्रेसवेवर मोटारींसाठी सामान्य १०० किमी वेगमर्यादा असताना, घाट विभाग वगळता अनेक ठिकाणी ४०, ६० आणि १०० किमीचे फलक अंतराअंतरावर अनियमितपणे बदलतात.

या विसंगतीमुळे वाहनचालकांचा गोंधळ उडतो आणि नेमक्या अशाच ठिकाणी पोलीस दंड आकारतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर असल्याचे गाडगीळ यांनी नमूद केले.

३) कोंडीच्या ठिकाणी पोलीस गायब, टोल नाक्यांवर गर्दी

शिग्रोबा देवळाजवळ व लोणावळा फाट्याजवळ १-२ ठिकाणे वगळता, संपूर्ण एक्सप्रेसवेवर वाहतूक कोंडी असतानाही बहुतेकवेळा एकही वाहतूक पोलीस दिसत नाही.

मात्र दोन्ही टोल नाक्यांवर किमान २० वाहतूक पोलीस 'सिग्नलिंगच्या' शोधात उभे असतात, असा आरोप गाडगीळ यांनी केला. इतकेच नव्हे, तर या टोल नाक्यांवर एकाही पोलीस उपनिरीक्षक वा वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक नसल्याची माहितीही त्यांनी उघड केली.

४) मोबाईल फोटोद्वारे बेकायदेशीर दंड

स्वतःच्या मोबाईलवर घेतलेल्या फोटोच्या आधारे दंड आकारू नये, असे स्पष्ट आदेश असतानाही, एक्सप्रेसवेवर अनेक वाहतूक पोलीस मोबाईलवर फोटो काढून वाहन चालकांना वेठीस धरत असल्याच्या असंख्य तक्रारी आहेत.

यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, दर महिन्याला ठराविक 'टार्गेट' दिले जाते, त्यामुळे दंड केल्याशिवाय पर्याय नसल्याची कबुली काही वाहतूक पोलीस खासगीत देत असल्याचे गाडगीळ यांचे म्हणणे आहे.

५) पोलीस चौक्या गायब, व्यवस्था कोलमडलेली

काही वर्षांपूर्वी विधानपरिषदेत गाडगीळ यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर, तत्कालीन पोलीस महासंचालकांनी घाट विभागात दर २-३ किमीवर लहान पोलीस चौक्या उभारल्या होत्या.

मात्र कालांतराने त्या चौक्यांमधील पोलीसच नव्हे, तर आता त्या चौक्याच पूर्णपणे गायब झाल्या आहेत, हे वास्तव गाडगीळ यांनी उघड केले.




"स्मार्ट सिटीच्या बाहिरातीं सोडून द्या, पण पुणे सरकारने निदान किमान एक्सप्रेसवे तरी स्मार्ट करावा," असा उपरोधिक टोमणा लगावत गाडगीळ यांनी सरकारच्या 'विकासाच्या' दाव्यांची पोल खोल केली आहे.


# अर्थसंकल्पात सामाजिक न्यायाची भूमिका हरपली : हर्षवर्धन सपकाळ

### अमेरिकेच्या टॅरिफचे भारतावर गंभीर परिणाम, अगदी ५० वर्षांत घडले नाही ते घडत असून ही फक्त सुरुवात : संजीव चांदोरकर

### [illegible] शेतकरी [illegible] तरुणांची चिंता : [illegible]

### [illegible] : के. [illegible]





मुंबई : पूर्वी अर्थसंकल्पावर मोठ मोठ्या चर्चा होत असत व ते समजावून सांगितले जात असे पण आता बजेटच निरर्थक होत चालले आहे, बजेटची उत्सुकताच राहिलेली नाही आणि हे निराशाजनक व चिंताजनक आहे. राहुल गांधी यांनी बजेटचा हलवा कोणत्या समाज घटकाला मिळतो हे दाखवून दिले, ती सामाजिक न्यायाची टीपणी होती. ही सामाजिक न्यायाची भूमिका अर्थसंकल्पातून दूर गेली असून केवळ पैसा फेक तमाशा देख असे चित्र दिसत आहे असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

टिळक भवन येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली अर्थसंकल्पावर विशेष चर्चासत्र झाले. त्यात अर्थतज्ज्ञ अजित जोशी, संजीव चांदोरकर, एस. नागराजन, विश्वास उटगी, माजी खासदार कुमार केतकर यांनी भाग घेतला.

यावेळी सपकाळ म्हणाले की, अर्थसंकल्पात भारताच्या वार्षिक प्रगतीचा व आपल्या जिवनावर होणाऱ्या परिणामाचा लेखाजोखा मांडला जातो पण मागील काही वर्षात मात्र बजेटबद्दल सरकार व सर्वसामान्य जनतेमध्ये फारसे गांभीर्य दिसत नाही हे निराशाजनक चित्र आहे. अर्थव्यवस्थेकडे आपण जर अंधभक्त म्हणून पाहू लागलो तर काळ आपल्याला माफ करणार नाही. शेतकरी, बेरोजगारी या विषयावर आंदोलने होत असतात आता अर्थसंकल्पावरही आंदोलन करावी लागेल. पूर्वी ग्रामीण भागातील नेतृत्वाच्या प्रशासन व ध्येय धोरणे ठरवण्यावर पकड



अल्पायची व यामध्ये सामाजिक न्याय राखला जात होता पण हे चित्रही आता बदलेले आहे. याबाबही पकड सैल झाल्याचे दिसत आहे. डॉ. मनमोहनसिंह यांच्या नंतर देशातील चित्र बदलले व वेगळेच लोक पुढे आले आहेत. ग्रामीण भागाचा वाटा होता तो संपला आहे. बहुजनांचा वाटाही संपला व त्यांची जागा व या सर्वांवर दलालांची पकड मजबूत होत गेली ही चिंतेची बाब आहे.

नुकत्याच नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या आणि या निवडणुकीत प्रचंड पैसा व गुंडगिरीचा वापर केला गेला, हा दलालांनी सोडलेला पैसा पहता त्याचे परिणाम किती गंभीर होतील याचे कोणालाच गांभीर्य नाही. आज भारतातील प्रत्येक माणूस चिंतेत आहे, एक वेळचा घासही होता तोही जात आहे, कोणालाही नाहीत. देशातील प्रचंड परिस्थिती पाहता एखादी घटना होऊन ज्वालामुखीसारखा तो बाहेर येईल असे भीती वाटते असे सपकाळ म्हणाले.

अर्थतज्ञ संजय वाकेकर यावेळी म्हणाले की, वित्तीय साधनसामुग्री व त्याचे वाटप हे अर्थसंकल्पात मांडले जाते. मोदी सरकार ११ वर्षे सत्तेत असून या अर्थसंकल्पाकडे एका वर्षाचे म्हणून पाहता येणार नाही तर त्यांच्या सरकारने मांडलेल्या सर्व अर्थसंकल्पाकडे पहावे लागतील. या ११ वर्षांमध्ये त्यांच्या आर्थिक धोरणात एक सातत्यपूर्ण धागा आहे. त्याचा एक एक अर्थसंकल्प न पहाता संपूर्ण आर्थिक नीतिचे आकलन करायचे असल्यास ते समग्रपणे बघावे लागेल. या अर्थसंकल्पाकडे मागील वर्षी अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आले आणि त्याचे परिणाम भारतावर होऊ लागले आहेत. जे मागील ४० वर्षात जगात घडले नाही त्याला मागील वर्षापासून वेगळे वळण लागले आहे. ही घडी आता विस्कटत चालली असून ही सुरुवात आहे.

अनिश्चिततेच्या काळात आपली अर्थव्यवस्था मजबूत करावी लागणार आहे. निर्यातीही आयात झाले तर त्याचा कमीत कमी दुष्परिणाम व्हायला पाहिजे याची काळजी घ्यावी लागणार आहे. अर्थव्यवस्था अधिक व्यापक असायला हवी पण तसे झालेले नाही.

आपल्या अर्थसंकल्पात शेतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. शेती क्षेत्रातील वाढीचा वाटा घसरत १५ टक्क्यांवर आला आहे. शेती क्षेत्राने कोरोना काळात सर्वांना तारले आहे. पण शेतीक्षेत्राकडे दुर्लक्ष केलेले दिसत आहे. कर्जाचे आकडे वाढत आहेत. ११ लाख कोटी रुपये हे केवळ कर्जाच्या परतफेडीसाठी द्यावे लागणार आहेत. कर्ज काढून कर्ज फेडले जात आहे. भारताला विकसित राष्ट्र करायचे आहे अशा घोषणा केल्या जात आहेत. पण त्यासाठी वित्तीय स्रोतांची आखणी करावी लागते. श्रीमंतांच्या खिशात हात घालावा लागतो. आर्थिक समन्याय साधावा लागतो, पण आपल्या देशात ती राजकीय इच्छाशक्तीचा अभाव



अंकातील सर्व छायाचित्रे
वसंत राठोड

दिसते.

प्रशांत गावंडे म्हणाले की, केंद्रीय अर्थसंकल्पात शेतकरी हरवलेला आहे, त्याकडे कोणताच मुख्य प्रवाहातील माध्यमानेही लक्ष दिलेले नाही. या बजेटमध्ये शेती संशोधनावर भर दिलेला नाही, सिंचनावर भर दिलेला नाही व शेतीसाठीही भरीव तरतूद केलेली नाही. अत्यंत तुटपुंजी तरतूद केली आहे. सोयाबीन, कापूस, ज्वारी, बाजरी, मोहरी, अशी पिके महत्त्वाची आहेत. देशात आज ५५८ साखर कारखाने आहेत आणि त्यातील बहुतांश डबघाईला आले आहेत. या शेतीवर कोट्यवधी शेतकरी अवलंबून आहेत. ग्रामीण भागातील लोकांची बँकांतील गुंतवणूक कमी झाली आहे आणि ते ग्रामीण भागासाठी गंभीर आहे.


भारतात छोटे व मध्यम शेतकरी ९२ टक्के आहेत. त्यांच्याकडे २ ते ८ एकर शेती आहे तर अमेरिकेतील छोट्या शेतकऱ्याकडे किमान २ हजार एकर शेती आहे. त्याला छोटा शेतकरी समजतात. आता यात स्पर्धा होणार आहे. त्यासाठी भारत सरकारचा पाठिंबा असायला हवा पण तो नाही. शेतीत मानवी जास्त हाताला काम मिळते. आजच्या बजेटमध्ये शेतकरी शोधावा लागतो. सरकारचे शेती धोरण पाहता आगामी काळात शेतकरी आत्महत्या वाढतील अशी भीती गावंडे यांनी व्यक्त केली.

**भारतातील विमा क्षेत्रात येणारी परकीय गुंतवणूक धोकादायक...**

बँकिंग तज्ञ के. विठ्ठल म्हणाले की, काँग्रेस सरकारच्या काळात बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यानंतर सर्वसामान्य जनतेला त्याचे फायदे मिळाले. शेतकऱ्यांना कृषी कर्ज व इतर सुविधा दिल्या जातात त्या या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांतूनच दिल्या जातात. खाजगी बँकांतून ते होत नाही. आता बँकांमध्ये थेट परकीय गुंतवणुकीचा वाटा वाढत आहे. आयडीबीआयसारखी मोठी बँक खाजगी क्षेत्राच्या हाती देण्याचा घाट घातला जात आहे. बँकीय क्षेत्र परकीय शक्तींच्या हाती गेले तर भारतासाठी ते धोकादायक आहे. भारत पुन्हा एकदा ईस्ट इंडिया कंपनीला आमंत्रण देत आहे, अशी शंका वाटते. परकीय व खाजगी क्षेत्राच्या हाती देशातील बँक क्षेत्र जाण्याचा धोका दिसत आहे.

डॉ. अजित जोशी म्हणाले की, देशात आज छोट्या उद्योगात भांडवलाची मोठी गरज आहे पण ती होत नाही. कोरोना, नोटबंदी व जीएसटीमुळे रोजगाराचे क्षेत्र धोक्यात आहे. देशात फक्त आर्थिक विषमताच आहे असे नाही तर विविध क्षेत्रात विषमता आहे. जसे की स्त्री-पुरुष, उत्तर - दक्षिण, ग्रामीण - शहरी, रोजगाराची विषमता आहे. देशात नोकरीची उपलब्धता नाही असे तरुणपिढीला वाटत आहे म्हणून ते परदेशात जात आहेत. कर रचना गुंतागुंतीची आहे ती सुटसुटीत करायला हवी.

माजी खासदार कुमार केतकर म्हणाले की, पूर्वी बजेटच्या आधी महिनाभर वृत्तपत्रात विविध क्षेत्रातून बजेटमधून काय अपेक्षा आहेत, हे मुलाखती व लेख लिहिले जात व बजेटमध्ये या अपेक्षा पूर्ण झाल्या का हे लिहिले जात असे, पण आता ते होत नाही. देशात सध्या प्रजासत्ताक राज्य नाही. आता आपल्यावर आपल्यासारखे अमेरिका व युरोपचे राज्य आहे. ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली त्यावेळी काही हजार लोकांनी त्यावेळच्या २०-२५ कोटी लोकसंख्येवर राज्य केले. तेच आजही होत आहे. मोदी व त्यांचे काही मोजके उद्योगपती मित्र यांचेच राज्य आहे. शिक्षण आरोग्याचा मुद्दा महत्त्वाचा असूनही देशात आता हिंदू - मुस्लीम द्वेष प्रचंड वाढलेला दिसत आहे असे केतकर म्हणाले..



१५ फेब्रुवारी
संतश्रेष्ठ, क्रांतीसिंह, समाजसुधारक,
जगतगुरु श्री सेवालाल महाराज यांच्या
२८७ व्या जयंतीनिमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा...
आ. राजेश राठोड
मा. आ. प्राचार्य
पंढीरामजी राठोड

# ALL INDIA CONGRESS COMMITTEE

## (MEDIA DEPARTMENT)

## MAHARASHTRA PRADESH CONGRESS COMMITTEE

# TALENT HUNT

ARE YOU ARTICULATE, MEDIA-SAVVY AND PASSIONATE ABOUT INDIA?

**JOIN THE NATIONAL TALENT HUNT**
**AN INITIATIVE TO:**

**IDENTIFY - TRAIN - EMPOWER**

**CONGRESS'S NEXT-GEN VOICES**

**FOR:**

**MEDIA - DEBATES - PUBLIC DISCOURSE**


JUST SCAN THE QR CODE TO REGISTER!

**APPLY NOW**

BE THE VOICE OF CHANGE AND SHAPE THE FUTURE.

RNI No. : MAHMAR/2010/33438

Postal Regd. No. MCW/273/2024-26
License to Post Without Prepayment under WPP License No.-MR/Tech/WPP-291/West/2024-26
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, G.P.O., Mumbai - 400 001.
Publishing Date - 1st of Every Month Posting Date - 6th & 7th of Every Month






प्रेषक : जनमानसाची शिदोरी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर (प.) मुंबई - ४०० ०२५.